
विश्व वैदूंचे


|| आयुर्वेद ||
Vision Statement
Gadchiroli district is replete with Vast forest resources
which have so far not been completely utilised.
If that is done Gadchiroli's development will
get a big push and it will establish as an important
center of Ayurvedic Medicine.

प्रकाशक

काव्यरत्न प्रकाशन



©



लेखक :- श्री. मिलिंद मधुकर उमरे

डॉ. आंबेडकर चौक, बाबुपेठ वॉर्ड क्र. २ त. जि. चंद्रपूर



प्रथम आवृत्ती :- चैत्र शुध्द एकादशी

शके १९३७ (गुढीपाडवा)

२१ मार्च २०१५

किंमत :- रू. १५० /—

अक्षर जुळणी व मांडणी :– श्री. मोहनीश चिपिये, गडचिरोली

मुद्रक :- वेदिका मुद्रणालय, नागपूर

प्रमुख वितरक :- गोंडवाना हर्बस् पब्लिकेशन, गडचिरोली

# अनुक्रमणिका


१) वैदूंचा इतिहास ..............................

२) वैदूंची वनसंरक्षणात भूमिका ..............................

३) वैदू आणि वनविभाग ..............................

४) संमेलनाची शक्ती ..............................

५) इथे साकारतेय विश्व ..............................

६) संवाद वैदूंशी ..............................

७) शिलेदारांच्या मुलाखती ..............................

८) काही अद्भुत वनौषधी ..............................

# अर्पण पत्रिका

निसर्गाच्या बिनभिंतीच्या हिरव्या शाळेत

आरोग्य शास्त्राचे अलौकिक ज्ञान संपादन करून

असंख्य रूग्णांना आरोग्य संजीवनी देत अलिप्तपणे

संघर्षमय जीवन जगणाऱ्या व्रतस्थ वैदूंना आणि

त्यांच्या कल्याणासाठी कार्यरत

सर्वांना समर्पित.....

मंत्री
महाराष्ट्र राज्य



मंत्री
वित्त, नियोजन व वने
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
www.maharashtra.gov.in

दिनांक : ३०.१.२०१५

## शुभेच्छा संदेश

'वैदूंचे विश्व' या पुस्तकात गडचिरोली सारख्या दुर्गम भागात अनेक समस्यांचा सामना करीत अविरत रूग्णसेवा करणाऱ्या वैदूंचं भावविश्व सर्वार्थानं प्रतिबिंबित झालं आहे. या पुस्तकाचे लेखक मिलिंद मधुकरराव उमरे मुळचे चंद्रपूर जिल्हयाचेच असून त्यांची पत्रकार, निसर्ग लेखक, कवी अशी सर्वत्र ओळख आहे. त्यांनी आपल्या पत्रकारीतेच्या कार्यकाळात वैदूंसारख्याच अनेक वंचित घटकांवर लेखन करून त्यांच्या समस्यांना वाचा फोडली आहे. सोबतच निसर्गलेखन करून नामशेष होणारे वन्यजीव, प्रदुषणाच्या समस्याही तळमळीने मांडल्या आहेत. त्याच तळमळीने त्यांनी या पुस्तकाचेही लेखन केलं आहे. वैदूंच्या विश्वात आकार देणारे मुख्य वनसंरक्षक टी.एस.रेड्डी, उप वनसंरक्षक श्रीलक्ष्मी अन्नाबत्तुला आणि आयुर्वेदाचार्य डॉ. प्रशांत भरणे यांच्या कार्याचेही विशेष कौतुक करायला हवं. एकीकडे वितभर समाजकार्य करताना हातभर दाखविण्याची प्रथा सर्वत्र दिसत असताना त्यांनी मूकपणे केलेले हे कार्य खरच कौतुकास्पद आहे. पण, अशा कार्याची नोंद होणे आवश्यक आहे. या पुस्तकाच्या रूपात ही नोंद असल्याने वैदूंच्या विश्वाची ओळख असंख्य व्यक्तींना होईल. वैदूंच पारंपारिक ज्ञान अतिशय महत्वाचं आहे. सध्याच्या काळात जग पुन्हा आयुर्वेदाकडे आशेने बघत असताना वैदूंच्या ज्ञानाच्या बळावरच या वैदूंचा विकास घडविण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी सुरू असलेला संघर्ष सर्वांनाच प्रेरणादायक आहे. पुस्तकात वैदूंच्या ज्ञानासह त्यांच्या वेदनाही टिपण्यात आल्या आहेत. आजच्या युगातही असाध्य मानल्या जाणाऱ्या आजारावर लिलया उपचार करणाऱ्या गडचिरोलीतील वैदूंची माहिती वाचतांना वाचक थक्क होतील या वैदूंचे ज्ञान आणि कार्य खरच थोर आहे. या पुस्तकामुळे वैदूंबद्दलचा सर्वांचाच दृष्टीकोन बदलेल असा विश्वास वाटतो. या पुस्तकाच्या माध्यमातुन वैदूंच्या विश्वाबद्दल सर्वांना जिव्हाळा निर्माण व्हावा व अशा महत्वपुर्ण विषयांवर आणखी लिखान व्हावं. वैदूंच्या विकासासाठी शासनस्तरावर निश्चितच प्रयत्न करण्यात येतील. या पुस्तकाने संघर्षरत समाजघटकाच्या समस्यांवर भाष्य करणाऱ्या साहित्याच्या दालनात आपलं अढळ स्थान निर्माण करावं, हिच मनोमन शुभेच्छा !

स्नेहांकित

(सुधीर मुनगंटीवार)

# गोंडवाना हर्बस् प्रकल्पातील काही बोलकी छायाचित्रे











# प्रास्ताविक

'वैदूंचे विश्व' या पुस्तक वैदूंच्या विश्वाची छानशी सफर घडवून आणणारं आहे. समाजातील प्रत्येक घटकांसाठी शासनाचे विविध विभाग कार्यरत असतात. वनविभागही याला अपवाद नाही. वनसंरक्षणासोबतच वनांशी निगडीत समाजसमुहाच्या कल्याणासाठी सदैव तत्पर राहणे वनविभागाला आवश्यक आहे. याच अनुषंगाने आम्ही वनसंरक्षणासह नागरिकांसाठी विविध योजना शासनस्तरावर राबवित असतो. पण, शासकीय चौकटीत काम करताना मानवी मुल्यांची जपणूक करत समाजभान जागरूक करणंही आवश्यक असतं. वैदूंसाठी वनविभागानं केलेलं कार्य या पातळीवर अधिक वैशिष्ट्यपूर्ण आहे. वैदूंच्या अमुल्य ज्ञानाचा लाभ अनेकांना व्हावा सोबतच वैदूंचाही सर्वांगीण विकास व्हावा या दुहेरी उद्देशाने आम्ही कार्याची सुरवात केली होती. वैदूंसाठी आम्ही केलेल्या कार्याने फार मोठी समाजक्रांती घडली किंवा घडणार आहे, असा दावा मी मुळीच करणार नाही. सामाजिक बदल ही एक दीर्घकालीन प्रक्रीया असते. त्यामुळे हे कार्य या बदलाची एक छोटी सुरवात असच म्हणता येईल. वनविभागाच्या प्रयत्नांची या पुस्तकाव्दारे नोंद होत असल्याने पुढील कार्यासाठी ही प्रेरणादायी बाब राहणार आहे. पण, या पुस्तकात केवळ वनविभागाच्या कार्याचा उहापोह नाही. वैदूंच्या इतिहासाचं, त्यांच्या सद्यस्थितीचं आणि पुढील भवितव्याचं एकूणच त्यांच्या भूत, भविष्य आणि वर्तमानकाळाचं शब्दचित्र रेखण्यात आलं आहे. हे पुस्तक सर्वतोपरी वैदूंना वाहिलेलं आहे. यातील प्रत्येक शब्द वैदूंच्या कल्याणाचा विचार करणार आहे. वैदूंच्या विश्वाची ओळख करून देताना यात वैदूंच्या इतिहासाला स्पर्श करताना प्राचीन ते आधुनिक भारतातील शैक्षणिक, सामाजिक बदलांचाही धावता आढावा घेण्यात आला आहे. वैदूंची परंपरा, त्यांचं ज्ञान, त्यांच्या उपचार पध्दती, त्यांची वैशिष्ट्ये सांगातानांच त्यांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांचीही मांडणी कौशल्यानं करण्यात आली आहे. रानावनातील अलिप्त अगतिकतेतून वैदूंनी संघटीत होत नव्या विश्वाचं रूप घेत औद्योगिक विश्वात टाकलेलं पहिलं पाऊल हा साराच प्रवास थक्क करणारा आहे. वैदूंच्या विश्वाचं चित्रण करताना त्यांचा व्यापक परीघ, त्यांच्या जीवनशैलीतील विविध कंगोरे उलगडण्यात आले आहेत. हे पुस्तक केवळ वैदूंचीच कथा सांगणारं नाही, तर प्राचीन भारतीय आयुर्वेदाची ओळख करून देणारंही आहे. वाचकांना हे पुस्तक उपयोगी व्हावं म्हणून पुस्तकात विविध आयुर्वेदिक वनौषधी व त्यांच्या उपयोगांचाही समावेश करण्यात आला आहे. वैदूंच्या मुलाखतीदरम्यान अनेक वैदूंनी सांगितलेले खास उपचार वाचकांना निश्चितच उपयोगी पडतील. या सर्वांसोबतच गडचिरोली जिल्ह्यातील देशभक्त आदिवासी विरांच्या शौर्यगाथेचा समावेश करून मागास समजल्या जाणाऱ्या गडचिरोली जिल्ह्याचे वेगळे वैभवशाली दर्शन घडविण्यात आले आहे. पुस्तकात काही चमत्कारिक वनौषधींचा उल्लेख असला, तरी त्यातील काही अंधश्रध दा व अतिशयोक्तीचा भागही प्रकर्षानं मांडण्यात आला आहे. आपलं परंपरागत ज्ञान जपण्याची व त्या ज्ञानाचा उपयोग लोककल्याणासाठी करण्याची वैदूंची धडपड, त्यात वनविभागानं केलेली मदत व या

सहप्रवासातून निर्माण झालेलं वैदूंचं एक आगळं विश्व या पुस्तकातून नजरेसमोर उभं राहतं. या पुस्तकाच्या माध्यमातून वैदूंचं महत्त्व सर्वदूर पोहचणार आहे. वनविभागानं वैदूंसाठी प्रारंभ केलेल्या उपक्रमाचं नेतृत्व करताना मला वैदूंचं विश्व अगदी जवळून अनुभवता आलं. या उपक्रमाच्या माध्यमातून अनेक अविस्मरणीय आठवणींचा खजिना मला मिळालां. हे पुस्तक वाचताना पुन्हा एकदा त्याच आठवणीत रममाण झालो. पुनः प्रत्ययाचा आनंद मिळाला. गडचिरोलीसारख्या जिल्ह्यात असलेल्या वैदूंचं प्रचंड ज्ञान सर्वदूर पोहचावं, त्यांच्याबद्दलचा दृष्टीकोन बदलावा, त्यांच्या कार्यापासून इतरांनी प्रेरणा घ्यावी, यासाठीच या पुस्तकाचा जन्म झाला आहे. अलिकडे आयुर्वेदाला पुन्हा महत्त्व प्राप्त होत आहे. पण, ज्याप्रमाणे प्राचीन भारतीय योगशास्त्राचं परदेशातून आल्यानंतर 'योगा' झालं तसचं काहीसं आयुर्वेदशास्त्राचं होऊ नये. ही शास्त्रे फॅशन म्हणून वापरायची नाहीत. ती आपल्या भारतीय जीवनशैलीचा भाग आहेत. वैदूंच्या जीवनशैलीतून याचा प्रत्यय आपण घेऊ शकतो. म्हणून ज्यांनी फॅशन म्हणून नव्हे, पैसे कमविण्याचं साधन म्हणून नव्हे, तर जीवनाचा एक भाग म्हणून आयुर्वेदिक ज्ञान जपलं आणि त्यात आपल्या निसर्गज्ञानाची भर घातली ते वैदू खरचं महान आहेत. अजुन वैदूंना बराच मोठा प्रगतीचा टप्पा गाठायचा आहे. अद्याप बरच कार्य शिल्लक आहे. पण, या कार्याच्या सुरवातीपासून आपण सोबत आहोत, याचं मनस्वी समाधान वाटतं. या पुस्तकाचं वाचन केल्यानंतर प्रत्येकजण वैदूंच्या विश्वाच्या विस्तारासाठी कटीबध्द होईल, ही अपेक्षा नाही विश्वास आहे. शेवटी वैदूंसाठी एवढचं सांगावसं वाटतं.

**''हौसलों का इम्तिहान अभी बाकी है**
**सारा जहाँ अभी बाकी है**
**अभी तो नापी है मुठ्ठी भर जमीन**
**सारा आसमान अभी बाकी है''**



**श्री. टी.एस.के.रेड्डी**
**मुख्य वनसंरक्षक**
**गडचिरोली**



# लेखकाचा परीचय

**नाव :–** मिलिंद मधुकरराव उमरे

**शिक्षण :–** एम.ए. (इतिहास), बी.एम.सी. (बॅचलर ऑफ मास कम्युनिकेशन), बी.एड. ( बॅचलर ऑफ एज्युकेशन)

**अनुभव :–** जवळपास 12 वर्षांपासून पत्रकारितेच्या क्षेत्रात कार्यरत. हिंदी वृत्तपत्र दैनिक नवभारत, मराठी प्रादेशिक वृत्तपत्र दैनिक सकाळ, दैनिक लोकमत आदी वृत्तपत्रांमध्ये जिल्हा प्रतिनिधी तथा बातमीदार म्हणून कार्य. सर्च टिव्ही, लाईव्ह चंद्रपूर या वृत्तवाहिन्यांमध्ये संपादक म्हणून कार्य. चंद्रपूर आकाशवाणी केंद्रावर निर्मीती सहाय्यक व निवेदक म्हणून कार्य. विविध वृत्तपत्रे, दिवाळी अंक, मासिकां मध्ये अनेक विषयांवर विशेषतः निसर्गविषयक असंख्य लेख प्रकाशित. दैनिक लोकमतमध्ये 'जंगलातील वाटा', दैनिक सकाळमध्ये 'निसर्गायन' हे सदर प्रकाशित. दैनिक देशोन्नती मध्ये 'जंगल डायरी' हे सदर सुरू आहे. याशिवाय निसर्ग निरिक्षण शिबिरांचे आयोजक व शाळा, महाविद्यालयामध्ये निसर्गविषयक व्याख्याने देतात. अनेक कविसंमेलनातून काव्यवाचन, कविसंमेलन, गीतांच्या मैफीली, सांस्कृतिक व अन्य कार्यक्रमांचे सुत्रसंचालन करतात. केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालयातर्फे देण्यात येणाऱ्या फेलोशिपसाठी निवड. या फेलोशिपअंतर्गत गोंड, माडीया आदिवासींच्या लोकगीतांवर संशोधन सुरू आहे.

**पुस्तक :–** 'अमेय प्रकाशन' या पूणे येथील प्रतिष्ठित प्रकाशन संस्थेकडून 'कलेक्टिव्ह एनर्जी' हे पुस्तक प्रकाशित. 'चांदणचुरा' हा प्रातिनिधिक काव्यसंग्रह प्रकाशित.

# लेखकाचे मनोगत

जवळपास 12 वर्ष मी दैनिक नवभारत या हिंदी वृत्तपत्रांसह दैनिक लोकमत, दैनिक सकाळ या आघाडीच्या वृत्तपत्रांमध्ये काम केलं. यासोबतच सर्च टिव्ही व लाईव्ह चंद्रपूर या चंद्रपुर जिल्ह्यातील दोन प्रमुख वृत्तवाहिन्या आणि चंद्रपूर आकाशवाणी केंद्रावरही काम केलं. एकुणच मुद्रीत माध्यम (वृत्तपत्रे), श्राव्य माध्यम (आकाशवाणी) आणि दृश्क-श्राव्य माध्यम (वृत्तवाहिन्या) या तिनही प्रसार माध्यमातून माझ्या 12 वर्षांच्या पत्रकारीतेचा संचार झाला. मागील जवळपास 15 वर्षांपासून मी विविध संस्थांच्या माध्यमातून निसर्ग निरिक्षण शिबिरांचे आयोजन करीत आहे. सोबतच शाळा, महाविद्यालयां मधून निसर्गविषयक व्याख्याने (अलिकडे या व्याख्यानांना पॉवर पॉईंट प्रेझेंटेशनची जोड दिली आहे) देत असतो. निसर्ग चळवळीत काम करीत असल्यानं गडचिरोलीच्या जंगलानं मला भुरळ घातली. माझी पत्रकारिता खऱ्या अर्थानं या जिल्ह्यातच फुलली. इथलं जंगल, वन्यजीवांना धोके, वनपर्यटनाच्या समस्यांसोबत, नक्षलवाद, आदिवासींचं जीवन, आणि समस्या, ऐतिहासिक वास्तू अशा अनेक विषयांवर बरच लिखाण झालं. या सर्वांसोबतच योग व आयुर्वेदशास्त्र माझ्या आवडीचे विषय. जंगलात वन्यजीवांचा अभ्यास करतानाच विविध ा वनौषधींचाही अभ्यास सुरू होता. अशातच मी दैनिक सकाळमध्येच कार्यरत असताना डॉ. प्रशांत भरणे एक दिवस माझ्या कार्यालयात एक बातमी घेऊन आले. दिवाळीतल्या अभ्यंग स्नानाची महती लोकांना कळावी म्हणून त्यांनी स्वतः उटणं तयार केलं होतं. मी त्यांच्यावर बातमी केली. नंतर त्यांच्या वैदूंविषयक कामाची माहितीही मिळाली. तोपर्यंत मी एक पत्रकार म्हणूनच त्यांच्या कार्याकडे बघत होतो. हळूहळू आमची चांगलीच मैत्री झाली. त्यांच्या संपर्कातले अनेक वैदूही माझे मित्र झाले. मग, वैदू संमेलनाच्या बातम्याही केल्या. वैदूंच्या दवाखान्यावर विशेष वृत्त लोकमतमधून प्रकाशीत झालं. पत्रकारितेच्या काळात मी अनेक विषय हाताळले. पण, एखाद्या विषयाचा पाठपुरावा करून संशोधन करून त्यावर सविस्तर लिहायची खुप दिवसांची इच्छा मनात होती. याच दरम्यान डॉ. भरणे यांनी एकदा सहज चर्चा करताना मला 'वैदूंवर पुस्तक लिहाल काय?' असा प्रश्न विचारला. एखाद्या विषयावर विस्तृत लिखाण करावं ही इच्छा होतीच. शिवाय त्यांनी उभारलेली वैदूंची चळवळ मी जवळून पाहिली होती. म्हणून लगेच होकार दिला. वनविभागाचे मुख्य वनसंरक्षक श्री. टी. एस.के. रेड्डी यांच्याशीही परीचय होताच. पण, हा परीचय एक पत्रकार आणि वनाधिकारी असाच होता. मी या पुस्तकानिमीत्त त्यांची मुलाखत घ्यायला गेलो तेव्हा जरा धाकधूक मनात होतीच. यापूर्वी बातमीनिमीत्त त्यांच्याशी एक, दोन भेटी आणि अधून मधून फोनवर बोलणं झालं होतं. पण, त्यांनी जणू जुना जिवलग मित्र भेटावा असच माझं स्वागत केलं. हातच काहीच राखून न ठेवता त्यांनी दिलखुलास मुलाखत दिली. उपवनसंरक्षक श्रीलक्ष्मी अन्नाबत्तुला यांचं वन्यजीव विषयक ज्ञान चांगलं आहे. त्यांनीही या पुस्तकासाठी सविस्तर मुलाखत देत खूप मदत केली. या पुस्तकाचं लिखाण करताना मला खूप शिकायला मिळालं. डॉ. विठ्ठल घोगरे, चामोर्शीचे वैद्य नंदाजी चलाख यांच्या मुलाखती तर, मी चक्क कार आणि ट्रॅव्हल्समध्ये प्रवास करताना घेतल्या. अनेक वैदूंचं कार्य आणि ज्ञान पाहून मी खरच भारावून गेलो. मध्यंतरी मोटारसायकलवरून पडल्यानं माझ्या पायाला फ्रॅक्चर झालं. खरतर ही इष्टापत्तीच म्हणायला हवी. एकतर या फ्रॅक्चरमुळे मला वैदूंच्या वनौषधींचा अनुभव घेता आला. श्री. दासरवार काकांनी दिलेल्या लेपामुळे माझ्या वेदना कमी होऊन पायाची सूजही पटकन उतरली. डॉ. मुनघाटेसुध्दा त्यांच्यासोबत आले. त्यांनीही आस्थेनं विचारपूस करताना वैदू आणि वनौषधींविषयी बरीच माहिती दिली. डॉक्टरांनी एक महिन्याचा सक्तीचा बेडरेस्ट सांगितल्यामुळे पुस्तकाच्या लिखाणासाठी वेळ मिळाला. वैदूंचा हा विषय मला इतका का भावला ? याविषयी मी विचार करत असताना लक्षात आलं

की, माझे आजोबा म्हणजे आईचे वडील दिवंगत विठ्ठल गोंडा ऊर्फ गोविंदा धोटे वैद्य होते. माझ्या जन्मापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. बालपणी आईनं मला त्यांच्याविषयी सांगितलं होतं. या पुस्तकाच्या निमीत्तानं पुन्हा त्यांच्या आठवणींना उजाळा मिळाला. ते स्वतः भट्टी लावून विविध औषधी, काढे, अवलेह, अरीष्ट तयार करायचे. माझ्या आईकडे त्यांनी मृत्यूपूर्वी हेमगर्भ या औषधीच्या गोळ्या दिल्या होत्या. त्या आजही तिने जपून ठेवल्या आहेत. कदाचित हा वारसा मला त्यांच्याकडून मिळाला असावा. या पुस्तकानं मला खुप समाधान दिलं. अनेक जिवाभावाची माणसं दिली. खरतर वैदूंच्या मुलाखती घेताना मला प्रत्येक वैदू एक स्वतंत्र पुस्तक आहे, असं जाणवत होतं. लेखन मर्यादेमुळे प्रत्येकालाच न्याय देता येणं शक्य नाही. पण, पुढे या विषयावर अधिक लेखन नक्की करीन. या पुस्तकात वाचकांना उपयोगी पडावं म्हणून वैदूंनी सांगितलेल्या विविध रोगांवरच्या उपायांचा समावेश केला आहे. तसेच वैदू वापरत असलेल्या काही वनौषधी व त्यांचा उपयोगही दिला आहे. नवभारत या वृत्तपत्रात जिल्हा प्रतिनिधी म्हणून कार्यरत असतांना माझे सहकारी राहिलेले श्री. मोहनीश चिपिये यांनी या पुस्ताकाच्या अक्षर जुळणी पासून मुद्रित पर्यंत सर्व प्रक्रियेवर परिश्रम पूर्वक लक्ष ठेवलं. तसेच माझे मित्र साहित्यिक श्री. आशिष देव यांनी मुद्रित शोधन करून महत्वपूर्ण सूचना केल्या. त्यामुळेच हे पुस्तक अधिक सुंदर व समर्पक होवू शकलं. दैनिक सकाळ वृत्तपत्राचे उपवृत्त संपादक श्री. प्रमोद काळबांडे व झी 24 तास वृत्त वाहिनीचे प्रतिनिधी श्री. आशिष अंबाडे तसेच मा. श्री. सुधिरभाउु मुनगंटीवार; मंत्री, वित्त, नियोजन व वने यांचे स्वीय सचिव श्री. अजय धवने यांचं मार्गदर्शन व सूचना खुप उपयुक्त ठरल्या. या पुस्तकाच्या निर्मितीसाठी सहकार्य करणा-या सर्वच व्यक्तींचा मी आजन्म आभारी आहे. वैदूंचं विश्व मला प्रत्यक्ष साकार होताना बघता आलं, अनुभवता आलं. या विश्वाचं मला जे दर्शन झालं त्यालाच शब्दरूप देण्याचा प्रयत्न मी पुस्तकात केला आहे. वाचक या पुस्तकाचं स्वागत करतील आणि वैदूंच्या विश्वाच्या विकासासाठी आपल्यापरीनं सहकार्य करतील ही अपेक्षा आहे.

0000000000000000000000000000000000000000000000000000000000000000000000000000000

# प्रकरण १

# वैदूंचा इतिहास

वैदू हा भारतीय संस्कृतीचा अभिन्न भाग आहे. वैदूंच्या इतिहासाचा विचार करता वैदू या शब्दाची उत्पत्ती शोधणे आवश्यक आहे. वैदू हा शब्द संस्कृत किंवा प्रमाण मराठी भाषेतील वैद्य या शब्दातून निर्माण झाला आहे. खरतर वैद्य या शब्दाचा ग्रामीण बोलीत झालेला अपभ्रंश म्हणजेच वैदू हा शब्द होय. वैदू नावाची स्वतंत्र जमातसुध्दा आहे. पण, या पुस्तकात वैदू हा शब्द कोणत्याही विशिष्ट जाती, जमाती किंवा समाजासंदर्भात नसून दुर्गम, अतिदुर्गम भागात, ग्रामीण क्षेत्रात विविध आजारांवर उपचार करणाऱ्या उपचारकांसाठी व्यापक अर्थाने वापरण्यात आला आहे. देशातील काही राज्यात व आदिवासी समाजात वैदूंना बैगा, भुमिया किंवा जाणता म्हणजे जाणणारा असेही संबोधण्यात येते. मंत्र—तंत्र करणाऱ्यांनाही वैदू असा शब्द प्रचलित आहे. पण, येथे मंत्र—तंत्र किंवा अंधश्रध्देशी संबंधित वैदूंच्या संदर्भात लिहिलेले नाही. फक्त ग्रामीण भागात वनौषधीव्दारे उपचार करणाऱ्या वैद्यांसाठीच वैदू हा शब्द वापरण्यात आला आहे, हे सुज्ञ वाचकांनी लक्षात घ्यावे. वैदू हा शब्द 'वैदिक' या शब्दाशी साधर्म्य साधणारा असल्याने वैदूंच्या अस्तीत्वाचा संदर्भ थेट वैदिक संस्कृतीपर्यंत नेता येईल. आपलं प्राचीन भारतीय वैद्यकशास्त्र अतिशय पुरातन व समृध्द आहे. पण, मध्यंतरीच्या काळात आपण हातचं सोडून पळत्याच्या मागे लागलो. आधुनिक काळातील ॲलोपॅथीच्या नादात आपलं आयुर्वेद नष्ट होईल की, काय इथपर्यंत परिस्थिती निर्माण झाली होती. पण, मागील काही वर्षात आधुनिक ॲलोपॅथीच्या मर्यादा स्पष्ट झाल्याने आपण पुन्हा आयुर्वेदाकडे सकारात्मक दृष्टीने बघत आहोत. पण, आयुर्वेदाकडे सकारात्मक दृष्टीने बघताना ज्यांनी या आयुर्वेदशास्त्राच्या विनाशाच्या काळात आपल्या परंपरागत ज्ञानाच्या माध्यमातून हे शास्त्र जपलं, त्या वैदूंकडे सदैव नकारात्मक दृष्टीनेच पाहिलं. चार वेदांमध्ये पाचवा वेद मानल्या गेलेल्या आयुर्वेदातील संस्कृत किंवा तत्सम ग्रंथांचा अभ्यास करून औषधोपचार करणाऱ्या वैद्यांना आपण बरेच महत्त्व देतो. पण, खेड्यापाड्यात, डोंगर दऱ्यात जिथे आजही शासनाच्या आरोग्य सुविधा पोहचू शकत नाहीत तिथे निसर्गातून प्राप्त पिढीजात ज्ञानाच्या बळावर अनेकांना व्याधीमूक्त करणाऱ्या वैदूंकडे महत्तवहीन या दृष्टीनेच बघण्यात येते. आपल्या दृष्टीने हे वैदू अडाणी असतील, अशिक्षित असतील. पण, दगडी भितींच्या शाळेत न शिकलेले हे वैदू निसर्गाच्या हिरव्या शाळेत चिकाटीने शिकले आहेत. यातील अनेकांना अक्षर ओळख नसेल, पण, रानातील वनौषधीरूपी अक्षरे ते बरोबर ओळखतात. कोणती वनस्पती कोणत्या ऋतूत तोडावी, कोणत्या नक्षत्रात लावावी, तिचा उपयोग कसा करावा याची माहिती त्यांना नेमकी असते. केवळ त्यांनी शालेय शिक्षण घेतलं नाही, संस्कृत ग्रंथ अभ्यासले नाहीत किंवा वैद्यकीयशास्त्राची पदवी संपादन केली नाही म्हणून त्यांना कमी लेखता येणार नाही. आजही जिथे ॲलोपॅथी, आधुनिक वैद्यकशास्त्र गुडघे टेकतं अशा महाभयंकर रोगांचाही आपल्या वनौषधींच्या बळावर लीलया नायनाट करणारे अनेक वैदू आहेत. असाध्य विकार दूर करणाऱ्या अनेक धन्वंतरींना आपल्याला रानावनातच शोधावं लागेल. विचार करा, चरक, सुश्रृतसारखे महान आयुर्वेदिक तज्ज्ञ रानावनातच आश्रम स्थापन करून राहत होते. वैदूंच्या रूपात हे धन्वंतरी आजही कार्यरत आहेत. वैदिक कालखंडात आपले वैद्यकशास्त्र बरेच प्रगत होते. त्यानंतर भारतात हळूहळू वर्णाश्रम पध्दती रूढ होऊ लागली. जातीव्यवस्थेचं प्राबल्य वाढलं. या प्रक्रीयेतून संस्कृतातील ज्ञान विशिष्ट वर्गापर्यंतच मर्यादीत झालं. त्यातही रानावनातील मानवीवस्तीपर्यंत हे ज्ञान पोहचलं नव्हतं. अशा काळात ग्रामीण भागातील, रानावनातील व उच्च शास्त्रांचे ज्ञान नाकारण्यात आलेल्या तत्कालीन खालच्या वर्गातील तीक्ष्ण बुध्दीच्या लोकांनी नवनवे उपचार शोधून काढले. हे ज्ञान त्यांना निसर्गातूनच मिळालं. त्यामुळे वैदूंमध्ये आपल्याला सारीच अठरापगड जाती, जमातीची माणसं दिसतात. पूर्वी वैद्यांच्या रूपातच कार्यरत उपचारक पुढे रानावनात विखुरले जाऊन आज वैदूंच्या रूपात जगत आहेत, असंही म्हणता येईल. मात्र, या वैदूंनीच

भारतातील आरोग्यज्ञान प्राणपणानं जपलं आहे. पूर्वीचं ज्ञान आत्मसात करताना नवनवीन प्रयोग करून नवं ज्ञानही प्राप्त केलं आहे. पण, आधुनिक काळात त्यांच्याकडे संशयाच्या दृष्टीनेच पाहण्यात आलं. त्यातून त्यांची नाळ हळूहळू समाजमनाशी तुटत गेली. ॲलोपॅथीच्या लाटेत ते अधिकच दुरावले. काळ कुणसाठीही थांबत नसतो. तो झपाझप पावलं टाकत पुढं निघून जातो. वैदूंना या काळाच्या गतीसोबत आपली पावलं टाकता आली नाही. समाजमनापासून तुटणाऱ्या वैदूंना पुन्हा समाजाशी, प्रगतीच्या नव्या वाटांशी जोडणारा कोणताही दुवा निर्माण झाला नाही. ते दुवेसुध्दा कालप्रवाहात वाहून गेले. त्यामुळे प्रभावी ज्ञान असूनही आरोग्यक्षेत्रातील आधुनिक बदलांपासून अनभिज्ञ असल्यामुळं निबिड अरण्यातील अंधारमय वातावरणातच वैदूंचं विश्व अवगुंठीत झालं. कोणतीही उपचार पध्दती मग ती ॲलोपॅथी असो, युनानी, होमियोपॅथी असो आयुर्वेद असो किंवा त्याचेच एक रूप असलेले वैदूंचे उपचार असोत, प्रत्येक पॅथीला एक मर्यादा आहे. म्हणून सर्वच पॅथींचा सन्मान करणं आपलं कर्तव्य आहे. हाच नियम वैदूंच्या बाबतीतही लागू होतो. निदान आतातरी वैदूंकडे आपण सकारात्मक दृष्टीने बघणं आवश्यक आहे. आरोग्यविश्वात वैदूंनी अनेकदा इतिहास घडविलाही असेल. पण, शिक्षणाअभावी तो इतिहास त्यांना लिहून ठेवता आला नाही. तरीही त्यांच्या पारंपरिक लोकगीतांतून, कथांमधून, वृध्दांच्या चर्चेतून असे अनेक दाखले पुढे येतात. आजही आधुनिक उपचार घेऊन थकलेल्या व आजाराने बेजार व्यक्तीला एखादी व्यक्ती सांगते अमूक अमूक गावात तो वैदू आहे, त्याच्याकडे जाऊन या, काहीशा अविश्वासानेच ती व्यक्ती जाते. पण, जडीबुटी, वनौषधीच्या माध्यमातून चमत्कारिक गुण येत ती व्यक्ती बरी झाल्यावर त्या वैदूच्या ज्ञानाचा प्रत्यय येतो. अगदी मुत्रपिंडाविकारापासून कर्करोगापर्यंतच्या विकारांवर प्रभावी उपचार करणाऱ्या या वैदूंच्या इतिहासापेक्षा त्यांचे सध्याचे वर्तमान आणि पुढील भविष्याचा विचार करणे आवश्यक आहे. आपण त्यांना कायम दुर्लक्षित ठेवून त्यांचा इतिहास झाकोळून टाकला आणि वर्तमान अंधकारमय केले. पण, आता त्यांना उज्वल भविष्याचं आश्वासन देणं आपल्या हातात आहे. त्यांना संघटीत करून, त्यांच्या ज्ञानाचा मानवजातीसाठी सदुपयोग करून घेताना त्यांनाही विकासाची वाट दाखविणं गरजेचं आहे. त्यासाठीच वनविभाग प्रयत्न करीत आहे. गडचिरोलीचे मुख्य वनसंरक्षक टी.एस.के. रेड्डी, आयुर्वेदाचार्य डॉ. प्रशांत भरणे, उपवनसंरक्षक श्रीलक्ष्मी अन्नाबत्तुला यांच्या कुशल नेतृत्वात आता या प्रयत्नांनी गडचिरोलीत चांगलच बाळसं धरलं आहे. गडचिरोलीसारख्या वनसमृध्द जिल्ह्यात वैदूंची संख्या मोठी आहे. पण, आजवर त्यांच्याकडे कुणीच लक्ष दिलं नाही. आता गडचिरोली वनविभागाने त्यांच्याशी हितगुज साधत त्यांच्या गुढरम्य विश्वात अलवार प्रवेश मिळविला आहे. आजपर्यंत वनविभागाकडे काहीशा संशयाने व अविश्वासाने बघणारे वैदूही आपले पूर्वग्रह सोडून या अनोख्या चळवळीचा भाग होत आहेत. गडचिरोली जिल्ह्याच्या निर्मीतीपासूनच या जिल्ह्यातील जनतेला मोठ मोठी स्वप्ने दाखविण्यात आली. मोठे कारखाने, मोठी धरणे आणि सारेच काही मोठे पण, अशा मोठेपणाच्या नादाला लागून त्याचाच जुळा जिल्हा अर्थात चंद्रपूर जिल्हा प्रदूषणाच्या किती यातना झेलतोय हे आता कळू लागलं आहे. उद्योगांचा अतिरेक आणि अजस्त्र धरणे बांधून केलेली नद्यांची अडवणूक म्हणजे विकासाच्या नावाखाली स्वत:चीच फसवणूक आहे. त्याऐवजी आता वेळ आली आहे स्वत:ची शक्तीस्थळे ओळखण्याची. एरवी राज्यातील सर्वात गरीब व मागास म्हणून ओळख असलेला गडचिरोली जिल्हा तसा मुळीच नाही. अनमोल खजिन्याच्या ढिगावर लक्तरे घालून बसलेल्या उपाशी गरीबासारखी आपली स्थिती आहे. कारण, श्रीमंती आपण बसलेल्या ठिकाणीच आहे, याचा आपल्याला अद्याप मागमूस नाही. गडचिरोली जिल्ह्याला लाभलेला वनदेवतेचा वरदहस्तच लक्ष्मीच्या वरदहस्तात रूपांतरीत होऊ शकतो. गरीबी, निरक्षरता, अनारोग्य, कुपोषण, मुलभूत सुविधांचा अभाव या अनेक समस्यांनी गांजलेल्या या जिल्ह्यला आपण केवळ वनाच्याच भरवशावर वैभव प्राप्त करून देऊ शकतो. पण, त्यासाठी जंगले कापत सुटण्याची गरज नाही. अन्यथा सोन्याची अंडी देणाऱ्या कोंबडीची कत्तल करण्यासारखं होईल. वनाधारीत शाश्वत विकास हिच संकल्पना गडचिरोली जिल्ह्यासाठी तंतोतंत लागू होणारी आहे. आपली जंगलं नष्ट न करता त्याचा उपयोग आपल्या विकासासाठी करणे. या दिशेने वैदूंच्या माध्यमातून वनविभागाने उचललेलं पाऊल निश्चितच कौतुकास्पद आहे. रानावनात राहणाऱ्या वैदूंच्या मौखिक ज्ञानाचं संकलन करणं, त्यांनी सांगितलेल्या वनौषधींचं संवर्धन

करणं व वैदूंची संघटन शक्ती तयार करून त्यांनाच वैद्यकीय उद्योगासाठी प्रोत्साहित करणं हेच वनविभागाचे ध्येय आहे. आज आरोग्यक्षेत्रात वनौषधींपासून निर्मीत औषधींना विलक्षण महत्त्व प्राप्त झालं आहे. वैदूंना वनौषधींचं ज्ञान असलं तरी ते संघटित नाहीत. तसंच सध्या त्यांना औषध निर्मीतीची आधुनिक पध्दती व यंत्रांची माहिती नसल्यानं त्यांच्या औषधी निर्मीतीची क्षमता कमी आहे. औद्योगिक क्षेत्राचाही फारसा परीचय किंवा अनुभव नाही. म्हणूनच वनविभाग त्यांना विविध चूर्ण, आसव, अरीष्ट व काढे तयार करण्यासाठी यंत्रे उपलब्ध करून देत आहे. वैदू संमेलनाच्या माध्यमातून वैदूंची संघटन शक्ती एकवटली असतानाच आता त्याला यंत्रशक्तीची जोड मिळत असल्यानं त्यांची प्रगतीच्या दिशेनं घोडदौड सुरू झाली आहे. 'एकमेकां साह्य करू, अवघे धरू सुपंथ' या जगद्गुरू तुकाराम महाराजांच्या अभंग ओळीप्रमाणे एकमेकांना सहकार्य करीत काम सुरू झालं आहे. इतिहासातून प्रेरणा घेत, मागील चुकांमधून शिकत, नव्या भविष्याचा सुवर्णवेध घेण्यासाठी वनविभागाच्या सोबतीने वैदूंचं विश्व साकारू लागलं आहे. वैदूंचा वनौषधी ज्ञानाचा वारसा, वनविभागाची व्यापक यंत्रणा, प्रशासकीय ज्ञान, बाजारपेठ शोधण्याची व तिथपर्यंत वैदूंना जोडून देण्याची क्षमता तसेच डॉ. प्रशांत भरणे यांच्यासारखी आयुर्वेदिक ज्ञानासोबत समाजभान असलेली व्यक्ती यामुळे वैदूंचं हे नवं विश्व दिवसेंदिवस प्रगतीकडे झेपावत जाईल हे निश्चित.

# प्रकरण २

# वनसंरक्षणात वैदूंची भूमिका

वैदूंचा आणि वनांचा अनन्यसाधारण संबंध आहे. विविध प्रकारच्या वनौषधी हे वैदू वनांतूनच प्राप्त करीत असतात. त्यांचा हा संबंध वनविभागाच्याही पूर्वीपासूनचा आहे. जेव्हा वनविभाग अस्तित्वातच नव्हता तेव्हापासून वैदू जंगलात भटकून वनौषधी गोळा करीत आहेत. आजच्या आघाडीच्या वनस्पती शास्त्रज्ञालाही नसेल एवढे वनस्पती विषयक ज्ञान अनेक वैदूंकडे आहे. या ज्ञानाचा उपयोग करून ते अनेक आजार बरे करत असतात. पण, खेड्यापाड्यातील वैदूंना आजच्या आधुनिक आजारांची फारशी माहिती नाही. जर त्यांना माहित असलेल्या वनौषधींवर संशोधन झाले तर आजच्या काळातील अनेक असाध्य महाभयंकर आजारांवर प्रभावी औषध मिळू शकेल. त्यासाठीच वैदूंकडे सकारात्मक दृष्टीकोनातून पाहणे आवश्यक आहे. वैदूंना वनांतूनच आवश्यक वनौषधी मिळत असल्याने त्यांनी पिढ्यान्‌पिढ्या या वनांचे रक्षण केले आहे. वैदूंमध्ये अनेक जाती, धर्माचे लोक आहेत. त्यापैकी आदिवासी वैदूंच्या धर्मात कुळ, गोत्रानुसार प्रतिके (टोटेम) देण्याची परंपरा आहेत. ही प्रतिके प्राणी, पशू आणि वृक्षाची असतात. त्यांना तो कुलप्राणी, कुलपक्षी व कुलवृक्ष नष्ट करता येत नाही. आदिवासी धर्माचे संस्थापक पहांदी पारी कुपार लिंगो यांच्या या कल्पक व विज्ञाननिष्ठ कल्पनेमुळे आदिवासी समाजाकडून अनेक दुर्मिळ पक्षी, प्राणी आणि वृक्ष व वनस्पतींचं जतन झालं आहे. गोरगरीबांवर उपचार करणाऱ्या वैदूंनी आपल्या विद्येचा उपयोग पैसे कमविण्यासाठी कधीच केला नाही. अन्यथा शहरातील डॉक्टर्सप्रमाणे त्यांचेही मोठ मोठे बंगले असते. त्यामुळे ते त्यांच्या रूग्णांप्रमाणेच गरीब राहिले. आपल्या प्राप्त ज्ञानातून उपचार करणे व रूग्ण देईल त्याचा स्विकार करणे हेच ते आपले इतिकर्तव्य मानतात. काही वैदूंमध्ये तर रूग्णांकडून पैसे घेतल्यानं आपली विद्या नष्ट होईल, अशीही एक भाबडी भिती असते, म्हणून ते पैसे स्विकारत नाहीत. मात्र, या वैदूंचा वनांचा अभ्यास आश्चर्यचकित करणारा आहे. रस्सेल, कनिंगहॅम, जिम कार्बेट, रूडयार्ड किपलिंग अशा अनेक इंग्रजी लेखक, संशोधकांनी या वैदूंच्या सहवासातून वृक्ष व वन्यजीवांचे ज्ञान प्राप्त केलं आहे. जंगल बुक पुस्तकाव्दारे जगभरात प्रसिध्द झालेले रूडयार्ड किपलिंग ज्या नदिच्या काठी फिरले ती वैनगंगा नदी आपल्या या गडचिरोली जिल्ह्यातूनही वाहते. त्यामुळे या नदीच्या खोऱ्यात वास्तव्य करणाऱ्या वैदूंशी त्यांचा संबंध आलाच होता. म्हणून त्यांच्या पुस्तकातूनही वन व वन्यजीव विषयक अप्रतिम माहिती मिळते. भारताच्या इतिहासाचा मागोवा घेतला असता असे लक्षात येईल की, सेल्युकस निकेटर, सम्राट अलेक्झांडर द ग्रेट ( सिकंदर), याशिवाय हुन, पोतुर्गीज, डच, अरब, मोगल, फ्रेंच, ब्रिटीश असे अनेकांचे या देशावर आक्रमण झाले. हे आक्रमण 'सोने की चीडियां' म्हणून प्रसिध्द असलेल्या या देशातील अमाप संपत्तीच्या लुटीसाठी, तर होतेच पण, येथील विविध शास्त्र, कला व अन्य ज्ञानाच्या लुटीसाठीही होते. तैमुरलंगसारखे रक्तपिपासून आक्रमक येथील धनदौलत लुटून निघून गेले. तर, मोगलांसारखे आक्रमक आपल्या पुढच्या पिढ्यात वाढवत इथेच रमले. इतिहासाचा एक सिध्दांत असं सांगतो की, जेते आणि जित यांच्या सततच्या संघर्षांमध्ये जेव्हा जेते जितांवर राज्य करू लागतात तेव्हा त्यांच्यातील माहितीचेही आदानप्रदानही होते. त्यातूनच इजिप्त, मिस्त्र, युनानची युनानी चिकित्सा पध्दती भारतात मुळ धरू लागली. पण, ती काहीशी आयुर्वेदाशीच मिळती जुळती होती. तोवर देशी चिकित्सा पध्दतीला फार धोका नव्हता. पण, मध्ययुगात युरोपात विज्ञानचक्र वेगानं फिरू लागलं आणि ॲलोपॅथी ही रसायन औषधांची विधी बाळसं धरू लागली. इंग्रजांसोबत ही उपचार पध्दती भारतात रूजली. इंग्रजांनी भारतावर आपली पकड मजबुत केल्यानंतर त्यांच्या प्रत्येकच गोष्टीचा भारतीय जनमानसावर जबरदस्त प्रभाव पडू लागला. इंग्रजांच्या अधिन असलेल्या संस्थानिकांनाही राजवैद्यांच्या आयुर्वेदिक काढे व पथ्यपाणी, आहार विहार सांभाळण्याच्या कटकटीऐवजी कोणताही आजार इवल्याशा गोळीने तात्काळ बरे करणाऱ्या ॲलोपॅथी औषधाने भुरळ पाडली. त्यामुळे अस्सल भारतीय आयुर्वेद चिकित्सा पध्दती पिछाडीवर जाऊ लागली.

पुढे मेकॉलेप्रणीत शिक्षण पध्दती भारतात सुरू झाल्यानंतर परदेशी ज्ञान तेव्हढे सरस आणि भारतीय ज्ञान बुरसटलेले अशी मानसिकता तयार होऊ लागली. इथले आयुर्वेदाचे दुर्मिळ ग्रंथ लुटून आपल्या देशात त्याचा अभ्यास करणाऱ्या इंग्रजांनी आयुर्वेदविरोधी वातावरण आपल्या देशात पध्दतशीर निर्माण केलं. या मानसिकतेचा पगडा या देशाच्या लोकमानसावर असा पडला की, इंग्रज देश सोडून गेल्यानंतरही तो सुटला नाही. ॲलोपॅथीच्या नादी लागलेल्या ब्रिटीशधार्जिण्यांची आयुर्वेदाला थोतांड लेखण्यापर्यंत मजल गेली. एकेकाळी राजश्रय असलेल्या आयुर्वेदिक राजवैद्यांची ही अवस्था झाली तिथे रानावनातून वनौषधी आणून गोरगरीबांवर उपचार करणाऱ्या वैदूंची काय कथा. आयुर्वेदाचा राजाश्रय हरविल्यानंतर अनेक गुणी राजवैद्य व आयुर्वेद तज्ञही पुन्हा सर्वसामान्यांची नाडी चाचपडू लागले होते. खरंतर या सर्व प्रक्रीयेत आयुर्वेदिक ज्ञानाची पिछेहाट होत असली, तरी वैदूंचे ज्ञान त्यांनी सुरक्षित जपले होते. ते अधिक विकसित होत होते. वैदूंची नाळ भारताच्या वैभवशाली आयुर्वेदिक इतिहासाशी अशी जोडलेली आहे. त्याच प्रकारे त्यांची नाळ या देशातील समृध्द वनांशी जोडलेली आहे. म्हणूनच वनसंरक्षणात वैदूंची भूमिका अतिशय महत्त्वाची आहे. आज अनिर्बंध जंगलतोड, वन्यजीव तस्करी, अतिरेकी औद्योगिकीकरण यामुळे जंगले नष्ट होत आहेत. अनेक दुर्मिळ वनौषधी नष्ट होत आहेत. मानवजातीचे असाध्य आजार बरे करणाऱ्या नेमक्या कोणत्या वनौषधी नष्ट होत आहेत ते येथील वैदूंना चांगले माहित आहे. त्यांच्या या ज्ञानाचा लाभ घेऊन अनेक दुर्मिळ वृक्ष व वनौषधींचं संरक्षण, संवर्धन करणं शक्य आहे. याशिवाय वन्यजीवांच्या शिकारीही मोठ्या संख्येने होत असतात. जंगलात वनौषधींसाठी फिरणाऱ्या वैदूंना रानावाटांची पक्की माहिती असते. त्याचं जंगलातील वृक्षवल्लींवर, पशूपक्ष्यांवर प्रेम असतं. कोणत्याही तरबेज शिकाऱ्यापेक्षा त्यांची अरण्यविद्या खचितच प्रभावी असते. त्यामुळे अवैध वृक्षतोड, वनतस्करी करणारे तस्कर तसेच वन्यजीवांची शिकार करणाऱ्यांवर लक्ष ठेवण्यासाठी त्यांची निश्चितच चांगली मदत होईल. वनकर्मचारी कितीही दक्ष असले तरी त्यांच्याही काही मर्यादा आहेत. ते जंगलात दिवसरात्र गस्त घालू शकत नाहीत. वैदूंना वनौषधी गोळा करण्यासाठी रानभ्रमंती सतत करावी लागते. त्यामुळे त्यांच्या माध्यमातून वनविभाग जंगलातील अवैध हालचालींवर लक्ष ठेवू शकतो. वनविभागाकडे असलेल्या अनेक समस्यांपैकी वन्यजीवांच्या आरोग्याचीही एक समस्या आहे. जंगलात पाळीव गुरे चरत असल्याने या गुरांना असलेल्या आजारांचा संसर्ग वन्यजीवांना होतो. गोंदिया जिल्ह्यातील नवेगाव बांध परीसरातील जंगलात पाळीव प्राण्यांमुळे रानगव्यांना खुरांचा विशिष्ट रोग झाला होता. तेव्हा तेथील अरण्यपुत्र म्हणून प्रसिध्द स्व.माधवराव पाटील डोंगरवार यांनी या गव्यांच्या पाणी पिण्याच्या वाटांवर औषधी शिंपडून हा रोग बरा केला होता. पाळीव प्राण्यांवर उपचार करणाऱ्या पशू वैद्यकांनाही वन्यजीवांवर उपचार करताना अनेक अडचणी येतात. चरकसंहिता, सश्रृत संहिता, निघंण्टू रत्नाकर, आरोग्य प्रदिपिका अशा अनेक आयुर्वेदिक ग्रथांमध्ये मानवांसोबतच वन्यजीवांच्या उपचारांची माहितीही देण्यात आली आहे. वन्यजीवांवर कशाप्रकारे उपचार करायचे याची बरीचशी माहिती वैदूंना आहे. याशिवाय एक महत्त्वाची समस्या म्हणजे जंगलात लागणारे कृत्रिम वणवे. विशेषत: तेंदूपत्त्याच्या हंगामात या वणव्यांचे प्रमाण वाढते. वैदूंच्या मदतीने ही समस्या आटोक्यात आणता येऊ शकते. मागील काही वर्षात मानव व वन्यजीव संघर्षही वाढला आहे. अवैध वृक्षतोडीमुळे वने आक्रसत आहेत. बेसुमार शिकारीमुळे प्राण्यांची संख्या कमी होत आहे. जंगलातील वनस्पतींअभावी चितळ, सांबर, नीलगाय, रानडुकरे जंगलालगतच्या गावातील शेतांमध्ये धुडगुस घालतात. त्यामुळे ग्रामस्थ वैतागून त्यांचा कल या प्राण्यांच्या हत्येकडे वाढतो. सततच्या शिकारीमुळे तृणभक्षी प्राण्यांची संख्या कमी झाल्याने वाघ, बिबट आदी मांसाहारी प्राण्यांचा जंगलालगतच्या मानवीवस्तींमध्ये संचार वाढू लागला आहे. यातून मानव व वन्यजीव संघर्ष विकोपाला जात आहे. अनेक प्रकरणामध्ये गावातील नागरिकांचे वनविभागाशी वारंवार खटके उडतात. गावातील वैदूंना गावात बराच मान असतो. मानव–वन्यजीव संघर्षांच्या प्रकरणामध्ये वनविभाग व नागरिकांमध्ये दुवा म्हणून वैदू निश्चितच प्रभावी भूमिका वठवू शकतात. त्यामुळे वन्यजीव रक्षणातही वैदूंची महत्त्वपूर्ण मदत मिळू शकते. गडचिरोलीचे मुख्य वनसंरक्षक श्री. टि.एस.के. रेड्डी यांच्या मार्गदर्शनात व आयुर्वेदाचार्य डॉ. प्रशांत भरणे, उपवनसंरक्षक श्रीलक्ष्मी अन्नाबत्तुला यांच्या कल्पक नेतृत्वात जेव्हा जिल्ह्यतील वैदूंची तीन संमेलने घेण्यात

आली तेव्हा त्या संमेलनातून हाच विचार पुढे आला. या पुस्तकाचं लेखन सुरू असताना नुकतच २९ व ३० डिसेंबर २०१४ रोजी वैदूंचं चौथं संमेलनही थाटात पार पडलं. वैदूंनी वनविभागाला दुर्मिळ वृक्षांची, वनौषधींची माहिती द्यावी व वनविभागाने त्या प्रजातींची लागवड करावी किंवा त्या प्रजाती जिथे आहेत तेथील जंगल विशेषत्वाने राखावे, काही विशिष्ट अटींवर वैदूंना जंगलात वनौषधी व वनोपज गोळा करण्याची परवानगी द्यावी तसेच वैदूंनी वनात फिरताना तेथील अवैध हालचालींची वनविभागाला माहिती द्यावी, वनगुन्हे रोखण्यात, वन व वन्यजीवांची काळजी घेण्यात वनविभागाला मदत करावी या भूमिकेतून वनसंरक्षणाच्या नव्या अभियानपर्वाला सुरवात झाली. आतापर्यंत वनविभागाच्या व जनसामान्यांच्याही लेखी काहीसे गुढ, आपले ज्ञान आपल्यापूरतेच मर्यादीत ठेवणारे व वनकायदे तोडणारे वैदू बिनकामाचे होते. पण, मुख्य वनसंरक्षक रेड्डी यांच्या संपूर्ण टिमने त्यांना समजून घेतल्यानंतर हेच वैदू वनसंरक्षणातील बिनीचे शिलेदार झाले आहेत. ही फक्त सुरवात आहे. वैदूवर्ग आता कुठे वनसंरक्षणात महत्त्वाची भूमिका बजावायला सज्ज झाला आहे. यापूर्वी ते वनसंरक्षण करीत नव्हते असे नाही. पण, ते नकळत केले जात होते. आता त्यांचे परंपरागत ज्ञान व आधुनिक ज्ञानाच्या संगमातून त्यांची ताकद वाढली आहे. आता जाणीवपूर्वक वनसंरक्षण कसं करायचं हे वैदू शिकत आहेत.

# प्रकरण ३
# वैदू आणि वनविभाग

वैदू आणि वनविभागाचा अतिशय निकटचा संबंध आहे. गंमत बघा दोन्ही शब्द 'व' याच अक्षरापासून प्रारंभ होतात. वैदूंची वनसंरक्षणातील भूमिका यापूर्वी मांडण्यात आली आहेच. वैदूंचा जसा वनांशी अनोन्य संबंध तसाच वनविभागाशीही आहे. पूर्वीच्या काळात वनविभाग अस्तीत्वात नसताना रानावनात फिरणाऱ्या वैदूंनी वनांची सेवा वनविभागाप्रमाणेच केली आहे. ब्रिटीश राजसत्तेच्या काळात अनेक वनाधिकारीही जंगलात भटकताना वैदूंची मदत घ्यायचे. राजे, महाराजे, संस्थानिक जंगलात शिकारीवर जायचे तेव्हा विविध आजाराच्या प्रसंगी किंवा वन्यप्राणी, जंगलातील दरोडेखोरांच्या हल्ल्यात जखमी झाल्यावर जंगलातील गावांमध्ये राहणारे वैदूच त्यांच्यावर औषधोपचार करायचे. इंग्रजांच्या काळात वनविभागाने आकार घेतल्यानंतर देशातील अनेक दुर्गम भागात ब्रिटीश वनाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या व्हायच्या. इंग्रजांनी गडचिरोली जिल्ह्यातील अहेरी, सिरोंचा अशा दुर्गम भागात सागवानांची लागवड करून मोठ मोठी काष्ठ आगारे स्थापन केली होती. ती आजही कायम आहेत. समुद्र पार करून भारतात येणारे अनेक इंग्रज अधिकारी अशा दुर्गम भागात नोकरीवर यायचे. येथील हवामान मानवत नसल्याने आजारी पडायचे. अशा भागात डॉक्टर्सची सोय नसायची. तेव्हा हे वैदूच त्यांनाही बरे करायचे. अनेक इंग्रजांनी आपल्या जिल्ह्यातील अनेक वैदूंकडून त्यांचे निसर्गज्ञान प्राप्त करून घेतले. पण, तरीही आपण भारतीयांपेक्षा श्रेष्ठ आहोत हे दाखविण्याची संधी इंग्रज कधीही सोडत नसत. आय.ए.एस. ( इंडीयन ॲडमिनिस्ट्रेटिव्ह सर्व्हिस), आय.पी.एस. (इंडीयन पोलिस सर्व्हिस), आय.एफ.एस. ( इंडीयन फॉरेस्ट सर्व्हीस ) या प्रशासकीय सेवेतील अधिकारी इंग्रजांना 'यु बॉर्न फॉर रूल ऑन पिपल्स' म्हणजे तुमचा जन्मच लोकांवर राज्य करण्यासाठी झाला, असे शिकविण्यात येई. त्यामुळे ते राज्यकर्त्यांच्याच भूमिकेतून वागत. इंग्रज गेले, तरी मेकॉलेप्रणीत शिक्षणप्रणाली आणि इंग्रजांची ही प्रशासकीय व्यवस्था अद्यापही काही प्रमाणात कायम आहे. आपल्या भारतीय कायद्यांमध्ये ब्रिटीशकालीन कायद्यांचे बरेच अंश आहेत. वनकायदाही याला अपवाद नाही. मेकॉलेने एक सिध्दांत मांडला होता. याला झिरपण्याचा सिध्दांत म्हणतात. पाणी ज्याप्रमाणे वरच्या पातळीवरून खालच्या पातळीवर झिरपत जाते तद्वतच ज्ञानही वरच्या पातळीवरून खालच्या पातळीवर झिरपते, अशी मेकॉलेच्या धारणा होती. म्हणूनच याच झिरपण्याच्या सिध्दांतावर आधारीत शिक्षणप्रणाली त्याने भारतात रूजविली. प्रशासकीय व्यवस्थेतही ही शिक्षणप्रणाली रूढ झाली. परीणामत: वरच्या अधिकाऱ्यांना मिळणारी लोकांवर राज्य करण्याची शिकवण या झिरपण्याच्या सिध्दांतामुळे खालच्या अधिकारी, कर्मचारी वर्गातही झिरपू लागली. सर्वसामान्यांना तुच्छ लेखण्याच्या या रूढीमुळेच प्रशासन आणि सर्वसामान्यांमध्ये मोठ्याप्रमाणात गैरसमज निर्माण झाले. वनकायद्याचे पालन करताना वनकर्मचाऱ्यांकडून काही प्रमाणात याच पध्दतीचा अवलंब झाला. जंगलात वनौषधी संकलित करायला जाणाऱ्या वैदूंना याचा त्रास सहन करावा लागला. त्यामुळेच वैदूंचे वनविभागाशी संबंध दुरावत गेले. पण, आता वैदूंचे महत्त्व कळू लागल्यानंतर वनविभाग स्वत: पुढाकार घेऊन वैदूंशी मैत्रीचा धागा जोडत आहे. वनसंरक्षणाच्या इतिहासाचा अभ्यास करताना असे लक्षात येईल की, पूर्वी वनासाठी मानव घातक असल्याने माणसाला वनापासून तोडल्यास वनांचा झपाट्याने विकास होईल, असे सिध्दांत मांडण्यात आले. पण, अधिक संशोधनानंतर निसर्गात मानवाचेही अढळ स्थान असून जंगलाचा विकास त्या जंगलात राहणाऱ्या स्थानिक नागरिकांच्या मदतीनेच होऊ शकतो हे वास्तव समोर आले. त्यातूनच स्थानिक सहभागातून वनाधारीत शाश्वत विकास ही संकल्पना रूजू पहात आहे. संयुक्त वनव्यवस्थापन समिती, जैव विविधता समिती आदी उपक्रम याच संकल्पनेवर आधारीत आहेत. गडचिरोली वनविभागाने यापुढे जात आता वैदूंच्या आधारे वनाधारीत शाश्वत विकासाचं स्वप्न रूजवलं आहे. आजच्या काळात आरोग्य क्षेत्र ही जगातील सर्वात मोठी बाजारपेठ आहे. या बाजारपेठेत आपण सक्षमपणे उभे राहिल्यास विकासाची दारे आपसूकच मोकळी

होतील. आपल्या वनौषधीय ज्ञानाच्या माध्यमातून जगाला आरोग्यसंपदा बहाल केल्यास वैदूंच्या दारात धनसंपदा नांदेल असा विश्वास वनविभागाने वैदूंमध्ये निर्माण केला आहे. विशेष म्हणजे हे स्वप्न वनसंपदेचं मुळीच नुकसान न करता साकार करायचं आहे. पूर्वीच्या काळापासून चालत आलेली वैदूंची वनसंरक्षणाची परंपरा आणि आता त्याला मिळणारी वनविभागाची भक्कम साथ यातून वैदूंच्या विश्वाचा हा प्रवास अधिक सुखकर होणार आहे. आजवर वनात राहणाऱ्या स्थानिक नागरिकांचा विकास साधण्यासाठी अनेक योजना राबविण्यात आल्या. पण, या योजनांमध्ये सुक्ष्म निरिक्षण व नियोजनाचा बराच अभाव दिसून आला. 'सब घोडे बारा टक्के' या म्हणीप्रमाणे सरधोपट योजना राबविण्यात आल्या. पण, आता स्थानिकांतील विविध घटकांचा वेगळा अभ्यास करून त्यातील प्रत्येक घटकाचे वैशिष्ट्य जाणून घेत सुक्ष्म स्तरावर योजना राबविण्यास प्रारंभ झाला आहे. म्हणूनच स्थानिकांमधील वैदूंचा घटक अभ्यासून, त्यांच्या गुणवैशिष्ट्यांचा विचार करून त्या अनुषंगाने वैदूंचा विकास व पर्यायाने वनांचं संरक्षण असा दुहेरी प्रगतीमार्ग आखण्यात आला आहे. वनविभागाच्या अनेक अधिकारी, कर्मचाऱ्यांना कामानिमीत्त ग्रामीण भागात वास्तव्य करावं लागतं. यातूनच त्यांचा वैदूंशी नित्य संबंध येतो. आता या संबंधाला आखीव रेखीव रूप देत वैदूंचा विकास करण्याचे प्रयत्न होत आहेत. वनविभागाकडे संशयाच्या दृष्टीने बघणाऱ्या वैदूंचा दृष्टीकोनही बदलू लागला आहे. आपली विद्या गुढ म्हणून किंवा गुरूची आज्ञा म्हणून माहिती न देणारे वैदूही वनविभागात जाऊन माहिती देत आहेत. या प्रक्रीयेत वैद्यक विश्वातील नव्या ज्ञानाचा परीयचही त्यांना होत आहे. वैद्यक विश्वातील नवे बदल आणि वैदूंचे प्राचीन ज्ञान यांना सांधणारा दुवा म्हणून वनविभाग काम करत आहे. हत्तीवर स्वतंत्र ग्रंथ लिहिणारे पालकाप्य मुनी, तृणावर उपजिविका करीत कांचनमृगासोबत राहणारे शातकर्णी ऋशी, पशू पक्षी व इतर वन्यजीवांच्या आचरणावर शास्त्रीयदृष्ट्या प्रकाश टाकणारे वराहमिहीर, मृगपक्षिशास्त्र लिहिणारे हंसदेव जैनमुनी, शैनिकशास्त्राची रचना करणारा राजा रूद्रदेव, आयुर्वेद ग्रंथावर भाष्य करताना पशु, पक्ष्यांची आशयघन वैशिष्ट्ये सांगणारे डल्हणाचार्य अशा अनेक ऋशी मुनींनी प्राचीन भारतीय ज्ञान सातत्याने वृध्दींगत केलं. आजचे रानावनातील वैदूही याच ज्ञानाचा वारसा जपत आहेत. वैद्यकशास्त्राचे चालते बोलते ज्ञानकोश असलेल्या या वैदूंना आज प्रकाशात आणणे आवश्यक झाले आहे. ही जबाबदारी गडचिरोलीच्या वनविभागाने आपल्या खांद्यावर घेतली. विशेष म्हणजे वनविभाग हे शिवधनुश्य लिलया पेलत आहे. वैदूंचं वनविभागाशी जुळलेलं हे नातं असचं बहरत राहिल्यास वैदूंच्या माध्यमातून वनविभागातील अधिकारी, कर्मचाऱ्यांना रानातील हिरव्या वाटांची ओळख होईल आणि वैदूंना नव्या जगाच्या प्रगतीचा प्रकाश दिसेल, यात संशय नाही.

# प्रकरण ४

# संमेलनाची शक्ती

आपण लहानपणी ऐकलेल्या बालकथांमध्ये एक खुप सुंदर कथा होती. 'एकीचं बळ' असं त्या कथेचं नाव होतं. एका शेतकऱ्याला चार मुलं असतात. तो शेतकरी मरणासन्न अवस्थेत असताना आपल्या चारही मुलांना बोलवतो. त्यांच्या हातात एक एक काठी देतो आणि मोडायला सांगतो. मुलं ती काठी सहज मोडतात. मग, शेतकरी त्यांच्याकडील चारही काठ्या एकत्र करायला सांगतो. आता त्या एकत्र झालेल्या चारही काठ्यांची मोळी मोडायला सांगतो. चारही मुलं एका मागून एक प्रयत्न करतात. पण, कुणीच ती मोळी तोडू शकत नाही. मग, शेतकरी मुलांना म्हणतो, 'बाळांनो एकतेत खुप मोठी शक्ती असते. म्हणून चारही भाऊ सदैव एकत्र रहा. तरच तुम्हाला प्रत्येक कार्यात यश मिळेल.' ही छोटीशी कथा आजच्या काळातही लागू आहे. जोपर्यंत आपण संघटीत होत नाहीत तोपर्यंत प्रगती शक्य नाही. वैदूंच्या बाबतीत तळमळीनं काम करणारे आयुर्वेदाचार्य डॉ. प्रशांत भरणे, मुख्य वनसंरक्षक टी.एस.के. रेड्डी यांनाही ही बाब जाणवत होती. रानावनात राहून प्राचीन आयुर्वेदशास्त्राला जगविण्याचा एकाकी लढा लढणाऱ्या या वैदूंना एकत्र आणणं आवश्यक होतं. त्यांना एकत्र आणण्याचा विडा डॉ. भरणे यांनी उचलला. अलिकडे आपण बी.ए.एम.एस. (बॅचलर ऑफ आयुर्वेद मेडीसिन अॅन्ड सर्जरी) ही आधुनिक आयुर्वेदशास्त्राची पदवी घेऊनही परदेशी अॅलोपॅथीची प्रॅक्टीस करणारे अनेक डॉक्टर्स बघतो. पण, डॉ. भरणे यांनी आयुर्वेद चिकित्साशास्त्राची पदवीच मुळात या क्षेत्रात कार्य करण्यासाठी घेतली. त्यांचे पणजोबा अप्पाजी नारायण सोनार ( भरणे ) निष्णात वैद्य होते. आपल्या पणजोबांनी जपलेला वैद्यकीचा वारसा पुढे नेण्याचं स्वप्न त्यांनी उराशी बाळगलं होतं. केवळ महाविद्यालयाच्या शिक्षणावर अवलंबून न राहता. आपल्या पणजोबांची व त्यांच्या समकालीन असलेल्या वैद्यांची चिकित्सा पध्दती त्यांनी अभ्यासली. पणजोबांच्या अनमोल ग्रंथ संपदेतून ज्ञानाचे मोती गोळा केले. मी सुशिक्षित, वैद्यकीय पदवीप्राप्त डॉक्टर असा अहंभाव न बाळगता रानावनातील निरक्षर वैदूंचं शिष्यत्व पत्करून मधमाशीच्या निष्ठेनं त्यांच्याकडूनही त्यांनी ज्ञान संपादन केलं. याच कार्यातून जिल्हाभरातील व जिल्ह्याबाहेरील असंख्य वैदूंशी त्यांचा परीचय झाला. पहिल्या भेटीतच इतरांना आपलसं करण्याची क्षमता त्यांच्या व्यक्तिमत्वात असल्यानं एरवी इतरांना आपली विद्या शिकविण्यास टाळाटाळ करणारे वैदू त्यांचे गुरूच नव्हे, तर जिवाला जीव देणारे मित्र झाले. डॉ. भरणे यांनीही कोणताच स्वार्थ मनात ठेऊन त्यांच्याशी ओळख वाढवली नाही. सुरवातीला त्यांच्याजवळील परंपरागत ज्ञानाचा ठेवा संकलित व्हावा, त्याचा जनसामान्यांसाठी उपयोग करता यावा हा त्यांचा हेतू होता. पण, वैदूंच्या विश्वात प्रवेश केल्यानंतर इतरांचे आजार लीलया बरे करणाऱ्या वैदूंना त्यांनी गरीबी, उपेक्षितता, अवहेलना या सामाजिक आजारांनी ग्रस्त असलेलं पाहिलं. मानवजातीच्या आरोग्याची काळजी वाहणाऱ्या वैदूंची काळजी कुणालाच नव्हती. म्हणून या वैदूंना आर्थिकदृष्ट्या सबल करून त्यांना सन्मानाचं जीवन प्राप्त करून देण्याचा प्रण त्यांनी केला. वैदूंमध्ये जागृती आणण्यासह त्यांना आपला व्यवसाय वाढविण्यासाठी विविध शासकीय योजना मिळवून देणं, बँकांकडून कर्ज मिळवून देणं आदी उपक्रम त्यांनी सुरू केले. या उपक्रमांमुळेच त्यांच्या संपर्कात अनेक वैदू आले. वनविभागाने पुढाकार घेतल्यानंतर त्यांनी जिल्हाभरात दौरे करीत या वैदूंना एकत्र आणण्यास सुरवात केली. सुरवातीला अनेक वैदूंचा विश्वासच बसला नाही. पण, त्यांनी वनविभागाची भूमिका समजावून सांगितल्यानंतर वैदू संमेलनाला येण्यास तयार झाले. वैदूंच्या विश्वाची पायाभरणी इथून प्रारंभ झाली होती. या पायाभरणीवरच पुढे वैदूंचं आगळं विश्व साकारणार होतं. गडचिरोलीतील सामाजिक न्याय भवनाच्या सभागृहात पहिल्या वैदू संमेलनाचं आयोजन करण्यात आलं. या संमेलनात जिल्हाभरातील १५० वैदू सहभागी झाले. हा पहिलाच प्रयत्न असल्यानं आयोजन व नियोजनात काही त्रूटी राहणं अपरीहार्य होतं. संमेलनाचा अवधी कमी असल्यानं केवळ तिनच वैदूंना आपलं मनोगत व्यक्त करता आलं. अनेक वैदू आपलं परंपरागत ज्ञान इतरांसह वाटण्यास तयार नसतात. त्यामुळे हे वैदू बोलतील कि नाही, अशी आयोजकांनाच शंका होती. पण, या पहिल्याच संमेलनात उलट अनुभव आला. अनेक वैदू बोलण्यास उत्सूक होते. संमेलनानंतर मुख्य वनसंरक्षक श्री. रेड्डी यांना भेटून आम्हाला बोलण्याची संधी मिळाली नाही, अशी प्रेमळ तक्रार अनेक वैदूंनी केली. मुख्य वनसंरक्षकांनीही त्यांच्या विनंतीला मान देत पुढच्याच महिन्यात दुसऱ्या वैदू संमेलनाची घोषणा केली. दुसरं वैदू संमेलन तब्बल दोन दिवस चाललं. या संमेलनादरम्यान सर्वच वैदूंना बोलण्याची संधी देण्यात आली. विशेष म्हणजे या वैदू

संमेलनाला तत्कालीन जिल्हाधिकारी अभिषेक कृष्णा यांच समर्थ प्रशासकीय सहकार्य मिळालं. तरूण धडाडीचे जिल्हाधिकारी कृष्णा यांनाही वैदूंच्या पारंपरिक ज्ञानाबद्दल आदर होता. याच भावनेतून त्यांनी आपल्याकडून सर्वतोपरी सहकार्य करण्याचं आश्वासन मुख्य वनसंरक्षक श्री.रेड्डी यांना दिलं. केवळ आश्वासन दिलचं नव्हे तर ते तंतोतंत पाळलंसुध्दा. पहिल्या संमेलनाच्या अनुभवातून आयोजकांना बरच काही शिकायला मिळालं होतं. त्यामुळे दुसऱ्या संमेलनाची तयारी करताना ते अधिक दक्ष होते. वैदूंना केवळ मनोगताचीच संधी न देता त्यांना आपले अनुभव कथन करताना अधिक आनंद व्हावा म्हणून वैदूंचे विविध गट तयार करून त्यांची गटचर्चा घेण्यात आली. यातून वैदू, वनविभाग व सामाजिक कार्यकर्त्यांमध्ये ज्ञानाचं आदानप्रदान झालं. त्यानंतर तिसरं संमेलनही धडाक्यात पार पडलं. प्रधान मुख्य वनसंरक्षक प्रवीण परदेशी यांनीही या उपक्रमाचं भरभरून कौतुक केलं. एकीकडे गडचिरोली जिल्ह्यात बदली म्हणजे काळ्या पाण्याची शिक्षा समजणाऱ्या अधिकाऱ्यांचा अनुभव असणाऱ्या प्रशासनाला मुख्य वनसंरक्षक टी.एस.के. रेड्डी यांनी सुखद आश्चर्याचा धक्काच दिला. गडचिरोलीसारख्या दुर्गम जिल्ह्यात बदली झाल्यानंतर आपली वनसंरक्षणाची जबाबदारी सक्षमतेनं पार पाडताना त्यांनी सेमाना येथे उत्कृष्ट उद्यान तयार केलं. खितपत आणि दुर्लक्षित पडलेल्या स्मृति उद्यानाला पुन्हा हिरवंगार करीत जिवंत केलं. देसाईगंजसारख्या व्यापारी शहरापासून घोट, आलापल्लीसारख्या दुर्गम भागात विविध आयुर्वेदिक, प्राचीन संकल्पनांवर आधारीत उद्यानं तयार केली. आता वैदूंच्या विश्वाला आकार देण्याचं कामही त्यांनी संमेलनाच्या माध्यमातून सुरू केलं होतं. त्यांच्या या उपक्रमांना सर्वच स्तरातून पाठींबा मिळू लागला. वैदूंच्या विश्वाला या तिनही संमेलनाच्या माध्यमातून खऱ्या अर्थानं नवी ऊर्जा व शक्ती मिळाली. संमेलनाची हिच शक्ती पुढे वैदूंच्या संघटन शक्तीत परावर्तीत होऊन वैदूंचं विश्व साकारणार होती. या संमेलनांच्या माध्यमातून केवळ चर्चाच झाली नाही, तर कृती कार्यक्रम ठरविण्यात आला. वैदू आणि वनविभागाच्या संबंधांवर सखोल चर्चा झाल्यानंतर या संबंधातील उणीवाही लक्षात आल्या. विविध वनस्पती गोळा करण्यासाठी जाणाऱ्या वैदूंना वनकर्मचाऱ्यांकडून अटकाव होत होता. यात कर्मचाऱ्यांचाही दोष नव्हताच. ते त्यांचं कर्तव्यच पार पाडत होते. या समस्येच्या चर्चेतूनच वैदूंच्या ओळखपत्राची कल्पना साकारली. आतापर्यंत वनविभागानं ३३० वैदूंना ओळखपत्रे दिली आहेत. या ओळखपत्रामुळे त्यांना वनांमध्ये सहज जाऊन आवश्यक ती वनस्पती संकलित करता येते. वैदूंच्या चर्चेतून अनेक उपयोगी वनस्पती वनातून नष्ट होत असल्याचा मुद्याही पटलावर आला. त्यावर उपाय म्हणून वनविभागानं जाहिर केलं की, वैदूंनी अशा दुर्मिळ होत असलेल्या वनस्पतींची माहिती द्यावी. म्हणजे वनविभाग या दुर्मिळ वनस्पतींची लागवड आपल्या रोपवाटीकां मधून करेल व त्या वनस्पती वैदूंना उपचारासाठी उपलब्ध करून देईल. ही भन्नाट कल्पना वैदूंनाही पसंत पडली. या तिनही संमेलनाची खरी फलश्रुती होती वैदूंची संघटना. याच संमेलनात जिल्हा वनौषधी वैद्य मंडळ, गडचिरोलीची स्थापना करण्यात आली. संमेलनाच्या शक्तीचं बळ मिळालेल्या जिल्हा वनौषधी मंडळातूनच 'गोंडवाना हर्ब्स' हा गडचिरोलीचा आगळावेगळा वनौषधी प्रकल्प उभा राहिला. सेमाना उद्यानात वैदूंचा छोटेखानी दवाखाना व पंचकर्म चिकित्सा केंद्राचा उपक्रम सुरू झाला. आजवर निबिड अरण्याच्या हिरव्या पडद्याआड आपली विद्या जोपासणाऱ्या वैदूंना या संमेलनांनी अभिव्यक्त होण्यासाठी व्यासपीठच दिलं नव्हे, तर त्यांचा प्रगतीचा मार्गही प्रशस्त केला. प्रत्येक वैदू म्हणजे एक विलक्षण व्यक्तिमत्व. प्रत्येकाचं ज्ञान निराळं, उपचार पध्दती निराळ्या, परंपरा निराळ्या, पण, या ज्ञानाबद्दलची तळमळ साऱ्यांची एकच. याच तळमळीनं त्यांना एकत्र आणलं. एकमेकांच्या औषधी, उपचार पध्दतीबद्दल त्यांना जाणून घेता आलं. सुख, दुःखाचे क्षण सांगता आले. आपण एकटे हे ज्ञान कुठे नेणार, कदाचित असच उपेक्षेचं जीवन जगत एक दिवस हे ज्ञान सोबत घेऊन जग सोडावं लागेल, कुणाला कधी या ज्ञानाची किंमत कळेल का, असे अनेक प्रश्न मनात असणाऱ्या वैदूंच्या साऱ्या प्रश्नांची उत्तरं या संमेलनांनी दिली. त्यांना जगण्याचं बळ दिलं, नवी आशा, उमेद देत नव्या विश्वाच्या निर्माणाचं स्वप्न त्यांच्या काळजात अलवार रूजवलं. २९ व ३० डिसेंबर २०१४ रोजी चौथं वैदू संमेलनही पार पडलं. त्यामुळे या चौथ्या संमेलनानं वैदूंच्या विश्वाला नवी उमेद, नवी शक्ती बहाल केली आहे.

# प्रकरण ५

# इथे साकारतेय विश्व

रानावनात वनौषधींव्दारे उपचार करणाऱ्या वैदूंना एकत्र आणण्याची धडपड आता हळूहळू यशस्वी होऊ पहात आहे. या वैदूंची मनं वळवून त्यांना एकत्र आणण्याचं काम संमेलनांव्दारे करण्यात आलं. संमेलनाच्या शक्तीव्दारे वैदूंचं संघटन मजबूत झालं असून आता वैदूंचं विश्व साकारत आहे. या वैदूंच्या विश्वाची पहिली झलक आपल्याला गडचिरोली उपवनसंरक्षक कार्यालयाच्या परिसरात बघायला मिळते. कार्यालयाच्या उजव्या बाजुला पायवाटेनं गेलं की, एक मोठ्या कारखान्यासारखी इमारत दिसते. या इमारतीच्या दारावरच वैद्य गणपती आशण्णा दासरवार आपलं स्वागत करतात. इथलं उत्पादन निर्मीतीचं काम ते बघतात. ही इमारत ९० बाय ३० चौरस फुट आहे. इमारतीत प्रवेश करताच उजव्या हाताला दिसते ती बायोडिझेल मशिन. या मशिनव्दारे करंज, जवस, तीळ आदी तेलबियांपासून तसेच ज्योतिष्मतीसारख्या वनौषधीपासून औषधी तेल निर्मीती होते. इथेच जिल्ह्यातून संकलित केलेला मधही ठेवलेला असतो. पुढे प्लास्टिकची मोठी पिंप आहेत. यात खसच्या मुळ्या, मेहंदी, कारले, नागरमोथा, पळसफुल, कंटकारी, हडजोड, गुळवेल, कडूनिंब पाने, जांभुळ, वड बी, अर्जुन, विजयसार, रोहतक, कुश्मांड, हिरडा, आवळा, बेहडा, पूनर्नवा, बिल्व, सत्यानाशी, भृंगराज (माका), अनंतमुळ, कोरफड, गोरखमुंडी, लाजाळू, साग बी अशा अनेक वनौषधी भरून ठेवलेल्या आहेत. या वनस्पती संकलित केल्यानंतर आधी सुकविण्यात येतात. त्यानंतर त्यांच चूर्ण, काढे, आसव आदी औषधींमध्ये रूपांतर करण्यात येतं. पावसाळ्यात वनस्पती लवकर सुकत नाहीत किंवा काही वनस्पती आर्द्रतेमुळे खराब होतात. म्हणून इथं खास हिटर असलेल्या खोलीचीही सुविधा आहे. इथून पुढच्या खोलीत गेलं की, चुर्णाची दोन यंत्रं दिसतात. इथही विविध वनस्पती पिंपातून साठविलेल्या आहेत. या यंत्रांवर हिरडा, नागरमोथा आणि विविध वनस्पतींची चूर्ण तयार होत असतात. या इमारतीतून बाहेर निघाल्यावर याला लागूनच एक प्रशस्त शेड आहे. इथं जंगलातून संकलित वनस्पती निवडणे, धुणे, स्वच्छ करणे व वाळविण्याची प्रक्रीया होते. इथ शरपुंखा, सहचर, तुळस, रोहण, केवकंद, ब्राम्ही, जलब्राम्ही, मंडूकपर्णी, काळमेघ (भुईनिंब), बला, अतिबला, महाबला, गुळवेल, गोंगल, विजयसार अशा विविध वनस्पती, औषधी गुणधर्म असलेल्या वृक्षांच्या मुळ्या, सालींचे ढिग असतात. कुठे गर काढलेल्या बेलांचा ढिग दिसतो, तर कुठे बहाव्याच्या शेंगा दिसतात तर लगतच कोरफड सुकवायला ठेवलेली दिसते. याच शेडला कल्पकतेनं लोखंडी जाळी बसवून एक स्टोअर रूमही करण्यात आली आहे. यात विविध वनस्पतीची फळे, मुळे, साली, फुलं साठवून ठेवलेली असतात. हा प्रवास इथच संपत नाही. या इमारतीच्या जवळच दोन खोल्या आहेत. यातून पॅकींग व लेबलिंगचं काम चालतं. वनौषधींसोबतच अन्य बाबींवरही वैदू विशेष लक्ष देत आहेत. जिल्ह्याच्या दुर्गम भागातून संकलित केलेला मध खरबी या गावाला शुध्दीकरणासाठी पाठवावा लागतो. त्यानंतर इथं त्याची तपासणी, चाचणी व पॅकींग केली जाते. पण, आता लवकरच गडचिरोली वनौषधी प्रकल्प (गडचिरोली हर्ब) ची स्वत:ची शुध्दीकरण यंत्रे येणार आहेत. सध्या बाजारात असलेल्या मच्छर अगरबत्त्या विविध रसायनं वापरून तयार होतात. त्यामुळे डास मरत असले, तरी आरोग्यावर वाईट परीणाम होतो. त्यामुळे वैदूंनी स्वत: संशोधन करून भेऱ्याची साल व अन्य वनौषधींपासून मच्छर अगरबत्तीचा अनोखा फार्म्युला तयार केला आहे. या हर्बल मच्छर अगरबत्तीने डास तर मरतीलच पण, घरात उंदीर, घुस, पाल, झुरळ यांचाही उपद्रव होणार नाही. सध्या या वनौषधींच्या मिश्रणापासून अगरबत्तीची कॉईल तयार करण्याचं यंत्र कारखान्यात दाखल झालं आहे. त्यावर कामही सुरू झालं आहे. या कारखान्याच्या परीसरातील काडीकचरा, झाडझुडपांची सफाई करताना वैदूंचं मार्गदर्शन घेतलं जातं. त्यामुळेच या कारखान्याच्या परीसरात अटई (मुरूडशेंग), बोदेल्याची वेल, इंद्रावण, पांढरा फेंडरा, पाटा, कुकुर्डा अशा अनेक वनस्पती राखून ठेवलेल्या दिसतात. हा प्रकल्प एवढाच मर्यादीत नाही. गडचिरोली—चामोर्शी मार्गावर असलेल्या सेमाना उद्यानात वैदूंचा दवाखानाही प्रारंभ झाला आहे.

या उद्यानात नक्षत्रवन, राशीवन, रोगानुसार वनस्पतींची लागवड, निसर्ग परीचय केंद्र, बालकांसाठी खेळणी असे अनेक कल्पक उपक्रम वनविभागानं अंमलात आणले आहेत. आता वैदूंचा दवाखानाही सुरू झाला आहे. या दवाखान्याचं वैशिष्ट्य म्हणजे ही छोटेखानी इमारत लोखंडाचा वापर न करता बांबूपासून तयार करण्यात आली आहे. या दवाखान्यात बसण्यासाठी वैदूंना दिवस वाटून देण्यात आले आहेत. येथे येणारे पर्यटक या दवाखान्यात वैदूंकडून आपली नाडी परीक्षा व आरोग्य तपासणी करतात. त्यांना आयुर्वेदिक औषधी दिली जाते. ही सुविधा नाममात्र दरात उपलब्ध आहे. असेच वैदूंचे दवाखाने जिल्ह्याच्या अन्य भागातही सुरू करण्याचा वनविभागाचा मानस आहे. याच परीसरात आता पंचकर्म चिकित्साही सुरू झाली आहे. वमन, विरेचन, स्नेहन, स्वेदन, बस्ती या पाच आयुर्वेदिय प्रक्रीयांव्दारा रोगाचा समुळ नाश करण्याची सुविधा पंचकर्म चिकित्सा केंद्राव्दारे मिळाली आहे. आज आयुर्वेदाची सर्वत्र प्रसिध्दी होत असताना पंचकर्म चिकित्सेची माहितीही अनेकांना झाली आहे. पण, चव्हेलासारख्या दुर्गम खेड्यातील हनुमंत नरोटेसारखे वैदू अनेक वर्षांपासून या चिकित्सेचा वापर करीत आहेत. पंचकर्मातील स्वेदन चिकित्सा अर्थात बाष्पस्नानाव्दारे त्यांनी अनेकांचे रोग दूर केले आहेत. आयुर्वेदिक पंचकर्म व वैदूंच्या अनोख्या वनौषधींच्या योगाने अनेकांना रोगमुक्त करण्यात येत आहे. गडचिरोली वनौषधी प्रकल्प (गडचिरोली हर्ब) ची स्थापना २७ मार्च २०१४ रोजी झाली. अवघ्या सहा महिन्याच्या या बाळानं आपले पाय पाळण्यातच दाखविण्यास सुरवात केली. आज जरी हा प्रकल्प चिमुकला दिसत असला, तरी पुढे याच प्रकल्पातून वैदूंचं प्रचंड विश्व साकारणार आहे. सध्या या प्रकल्पाला वनविभागाची भक्कम साथ आहे. वनविभागाने दहा वर्षांसाठी कारखान्याकरीता जमीन वैदू मंडळाला लीजवर दिली आहे. प्रकल्परूपी हे बाळ आज वनविभागाचा हात धरून चालत आहे. पण, पुढे प्रकल्पातून निर्मीत उत्पादने बाजारात आपले अस्तीत्व निर्माण करू लागल्यानंतर या प्रकल्पाचं स्वतंत्र अस्तित्वही सिध्द होईल. वनविभागरूपी आईच्या कडेवरून उतरून तिचा हात सोडून हे बाळ आपल्या दुडक्या चालीनं चालू लागेल आणि आर्थिक सक्षमतेनं पोषण झाल्यावर पुढं वेगानं धावू लागेल. सध्या या प्रवासाची सुरवातच आहे. आता कुठं हे वैदूंचं विश्व साकारत आहे. पण, प्रकल्पातील वनौषधींना आतापासूनच मोठ्यप्रमाणात मागणी येत आहे. नागपुर येथील श्री. काळे यांनी गोरखमुंडी, लाजाळू, तरोटा बिज, विजयसाल यांची तब्बल दहा टनाची ऑर्डर दिली आहे. या क्षेत्रातील काही व्यापारी व कंपन्यांकडून शंखपुष्पी व अन्य वनौषधींची मोठ्याप्रमाणात मागणी होत आहे. त्यामुळे या प्रकल्पात काम करणारे वैदू आणि कामगारांचा उत्साह वाढला आहे. केवळ राज्यातीलच नव्हे, तर देशभरातील तज्ज्ञ व आयुर्वेदशास्त्राचे प्राध्यापक, विद्यार्थी या प्रकल्पाला भेट देऊन प्रकल्पाचं कौतुक करीत आहेत. ज्येष्ठ समाजसेवक डॉ. अभय बंग यांच्यासह आयुर्वेद संस्थेचे मान्यवर, विविध विभागाच्या वरीष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रकल्पाला भेट देऊन कामाचे कौतुक करीत शुभेच्छा दिल्या. सध्या या कारखान्यात ९ लोकं काम करत आहेत. यात ५ पुरूष व ४ महिलांचा समावेश आहे. सध्या यंत्राव्दारे चूर्ण तयार होत असले, तरी पुढे या कारखान्याचं आधुनिकीकरण करण्यात येणार आहे. ॲलोपॅथीच्या प्रभावामुळे वैद्यांनी दिलेली चुर्णाची पुडी घ्यायला रूग्ण इच्छुक नसतात. त्यामुळे ॲलोपॅथीच्या गोळ्यांप्रमाणेच वनौषधींच्या गोळ्या तयार करणाऱ्या मशिन्स लवकरच या कारखान्यात दाखल होणार आहेत. या शिवाय सिरप, काढा तयार करणारी यंत्रेही वैदूंच्या पर्यायाने रूग्णांच्या सेवेत रूजू होतील. सध्या एकाच ठिकाणी हे काम सुरू आहे. पण, पुढे प्रकल्पाची वाढ झाल्यानंतर टॅबलेट, काढा, सिरप, मध या प्रत्येकाचे स्वतंत्र कक्ष तयार होतील. मागास आणि बेरोजगार म्हणविल्या जाणाऱ्या गडचिरोली जिल्ह्यातील हा प्रकल्प जिल्ह्याच्या माथ्यावर लागलेला मागासलेपणाचा कलंक पुसून जिल्हावासीयांना रोजगारही देईल. वैदूंची ही चळवळ म्हणजे केवळ आजाराविरूध्दचा लढा नाही. जिल्ह्याला अनेक वर्षांपासून पिडणाऱ्या निरक्षरता, दारीद्रय, कुपोषण, बेरोजगारी, उद्योगविहीनता अशा अनेक आजारांविरूध्दची ही लढाई आहे. वैदूंच्या या चळवळीच्या पाठीशी जनता जनार्दनाचं पाठबळ राहिल्यास ही चळवळ निश्चितच एका व्यापक लोकलढ्यात रूपांतरीत होऊ शकते. वैदूंच्या विश्वाला आता लोकांच्या प्रतिसादाची प्रतिक्षा आहे.

# गोंडवाना हर्बस् प्रकल्पात उपलब्ध वनौषधी व त्यांचा उपयोग

| अ. क्र. | चूर्णाचे नाव | लेटीन नाव | उपयोग |
|---|---|---|---|
| १ | बिल्व | Aegle marmelos | हगवण, अतिसारात गुणकारी आमांष व पोटदुखीवर व गुणकारी |
| २ | अडूळसा | Adhatoda vasica | खोकला, कफ, श्वास विकार, हृदयविकार |
| ३ | पळस | Butea monospasma | मुत्रविकार, कफ, वातशामक, फुलापासून शरबत तयार करतात. |
| ४ | निर्गुंडी | Vitex nigundo | यकृत विकार, प्लिहावृध्दीत गुणकारी, तेल वातविकारात गुणकारी. |
| ५ | आवळा | Embilca officinalis | पौष्टिक, उपयुक्त रसायन, मुत्रविकार, श्वेतप्रदर आदि गुणकारी. |
| ६ | मेहंदी | Lawsonia inermis | दाह कमी करण्यासाठी, केसांना रंगविण्यासाठी वापरतात. |
| ७ | नागरमोथा | Cyprus rotundus | तृष्णा शामक, थंड, जीर्णज्वर, आम्लपित्त विकारात गुणकारी. |
| ८ | वड | Ficus bengaliensis | त्वचा विकार, मासिक पाळीचे विकार, गर्भपात टाळण्यासाठी उपयुक्त. |
| ९ | बेहडा | Termanalia belerica | मलबध्दता, कफविकार, मुळव्याध, त्रिफळा चूर्णातील महत्वपूर्ण घटक. |
| १० | हिरडा | Termanalia chebula | नेत्रविकार, मलावरोध, पित्तविकारात गुणकारी. |
| ११ | पुनर्नवा | Boerhavia diffusa | यकृतविकार, मुत्रविकार, हृदयरोगावर गुणकारी, नेत्ररोगात लाभ |
| १२ | तुळस | Ocimum sanctum | वात, पित्तनाशक, जंतूनाशक, श्वासकासहर म्हणून उपयोगी. |
| १३ | भृंगराज | Ecplipta alba | व्रणातील दुष्टस्त्रवाचे शोधन रोपन, प्लिहारोग, केसविकारावर उपयोगी. |
| १४ | एरण्डमुळ | Ricinus Comminis | वातविकारात अत्यंत उपयोगी, आमवातावरील प्रमुख औषध |
| १५ | हडजोड | Cidrus quadrangularis | फ्रॅक्चर, कानातुन रक्तस्त्राव, अग्निमांद्य, अजिर्ण यावर गुणकारी. |
| १६ | अर्जुन | Teminalia Arjuna | हृदयविकार, रक्तधातू, धमणी काठीण्यावर गुणकारी, अस्थीपोषक. |
| १७ | कंटकारी | Solanum xantho | खोकल्यावर याच्या मुळाचा काढा किंवा चूर्ण मधासोबत देतात. |
| १८ | लाजाळू | Mimosa pudica | जखम, भगंदर, रक्तपित्त, प्रदर, कुष्ठरोग, सर्वांग सुज यावर उपयोगी |
| १९ | गुळवेल | Tinosopara cardifolia | जीर्णज्वर, कावीळ, त्वचाविकार, मातेच्या विकारावर उपयोगी. |
| २० | भूईआवळा | Phyllanthus urinaria | कफ, पित्त, अग्निमांद्य, रक्तपित्त इ. विकारावर उपयोगी. |
| २१ | कारले | Momardia chirantialinn | कृमिविकार, यकृतविकार, हृदयविकार, अरूचि यावर उपयोगी. |
| २२ | कुश्मांड | Benincasa hispida | पित्तशामक, वातशामक, दाह नष्ट करण्यासाठी उपयोगी. |
| २३ | कडूनिंब | Azadiractia Indica | जंतूविकारावर लाभदायक, रक्त शुध्दिकरणात लाभदायी. |
| २४ | रोहण | Tecomella undulate | रक्त विकार, त्वचारोगनाशक, लाल रक्तकण वृध्दी वर गुणकारी. |
| २५ | गोरखमुंडी | Sphacranthus indicus | स्थौल्य व मेदनाशक, मधुमेह, प्लिहा विकारावर गुणकारी. |
| २६ | रिठा | Sapandus mukorossi | आयुर्वेदिक शॉम्प म्हणून उपयोग, केस विकारावर उपयोगी |
| २७ | भेरा | Chloroxylon swietenia | सालीपासून मच्छर व कीटनाशक धूपकांडी बनविता येते. |
| २८ | सहचर | Barleria rioniti | संधिवात व संधिरोग यावर गुणकारी. |
| २९ | सत्यानाशी | Argemone Mexicana | मधुमेह, यकृतविकार यामध्ये उपयोगी. |
| ३० | बाहावा | Cassia fistula | मज्जाचूर्ण कृमी व मलबध्दतेवर गुणकारी आहे. |

# गोंडवाना हर्बस् मधील अन्य उपयुक्त वनौषधी

| | | | |
|---|---|---|---|
| अजमोदा फळ | मालकांगोणी | मंडूकपर्णी | शंखपूष्पी |
| विजयसार | लाख | अनंतमुळ | काळमेघ पंचांग |
| मुसळी काळी | शरपूंखा | भूई आवळा | अक्कलकाढा |
| अपामार्ग पंचांग | कपूरकचली | मुसळी पांढरी | शिकेकाई |
| कचोला | खड्डयांजन | बला मुळ | करंजसाल |
| पळस | शिवलिंगी बिज | अंबाडी फुल | गोरख छोटा |
| बावची बिया | कवच काळे | पाषाणभेद | स्वर्णाक्षरी |
| मोहफुल | जांभूळ बिज | भारंगी | कवच पांढरा |
| पहाडमुळ | तरोटा | कांचनार | मोह टोरी |
| ब्राम्ही | खदीर साल | पटोल | तालिमखाना |
| साग बिज | सुंठ | धायटी फुल | कुटज साल |
| पिंपळी | विदारी कंद | डिंक | जवस |
| गंभारी मुळ | कुष्ठ | पिंपळफळ | वावडींग |
| रान हळद | तिळ | इंद्रजव | कुटकी |
| सागरगोटी | वाराही कंद | कोरफड | मध |
| पानफुटी | पांढरा धोतरा | धायटी | मेडाशिंगी |
| कोरफड | सर्पगंधा | काळा कुडा | पुत्रंजिवा |
| रूई | डिकामाली | गोरख चिंच | काटेसावर |
| महाळुंग | मरूडशेंग | महारूख | चंदन |
| पान ओवा | रान गुलाब | कांचन | रिठा |
| गुग्गुळ | पिवळी कन्हेर | सुलतान चाफा | सिता अशोक |

# प्रकरण ६

# संवाद वैदूशी

या वैदूंच्या विश्वात रमताना या विश्वाचा पाया जे वैदू आहेत त्यांची माहिती व त्यांच्याशी संवाद होणं आवश्यक आहे. पुस्तकाची पृष्ठमर्यादा लक्षात घेता सर्वांचीच माहिती देणं शक्य नाही. म्हणूनच आम्ही काही निवडक वैदूंच्या मुलाखती येथे देत आहोत. जाणून घेऊया अशा काही खास वैदूंविषयी....

**हनुमंत विट्ठल नरोटे : -** गडचिरोली जिल्ह्याच्या धानोरा तालुक्यातील दुर्गम भागात असलेल्या चव्हेला या गावातील हनुमंत विट्ठल नरोटे पंचक्रोशीतच नव्हे, तर राज्याबाहेरसुध्दा गुणी वैदू म्हणून प्रसिध्द आहेत. मलेरिया, टॉईफॉईडपासून विविध प्रकारचे स्त्रीरोग तसेच कर्करोगावर सुध्दा ते यशस्वी उपचार करतात. त्यांच्या उपचाराचा विशेष म्हणजे आयुर्वेदशास्त्रातील पंचकर्म चिकित्सेत वर्णीलेल्या स्वेदन अर्थात बाष्पाव्दारे उपचारात त्यांचा हातखंडा आहे. या पध्दतीवर विविध प्रयोग व दीर्घ संशोधन करून त्यांनी स्वत:ची पध्दती विकसित केली आहे. २१ प्रकारच्या वनौषधींपासून तयार केलेल्या विशिष्ट जलाचे बाष्पस्नान देत ते अनेकांना रोगमुक्त करीत आहेत. चव्हेला गावचे सरपंचपदही त्यांनी सांभाळले आहे. खरतर त्यांचा सरपंचपदाचा कार्यकाळ पूर्ण झाला. पण, त्या पदावर दुसरा कोणताच व्यक्ती बसण्यास इच्छुक नसल्याने ग्रामस्थांनी खास विनंती करून त्यांना याच पदावर अद्याप ठेवले आहे. हनुमंत नरोटे यांचे पणजोबा वैद्य होते. आदिवासी जमातीत ३२ गावांचा एक इलाखा असतो. या संपूर्ण इलाख्यात त्यांना प्रचंड मान होता. पणजोबांची विद्या त्यांच्या आजोबांकडून त्यांच्या वडीलांकडे आणि वडीलांकडून त्यांच्याकडे आली. नरोटे यांचे वडील एका पायाने अपंग होते. त्यामुळे त्यांना जंगलात सतत फिरून वनौषधी गोळा करण्यास अडचणी येत होत्या. म्हणून बालपणापासूनच हनुमंत नरोटे स्वत: जंगलात जाऊन वडीलांसाठी वनौषधी आणायचे. रामायणातील हनुमंत ज्याप्रमाणे लक्ष्मणाचे प्राण वाचविण्यासाठी संजीवनी बुटी आणायला गेला त्याच प्रमाणे या हनुमंतानेही वडीलांची आज्ञा पाळत रानावनात भटकून अनेक संजीवक वनस्पती गोळा केल्या आणि कित्येकांचे प्राण वाचविले. अल्पशिक्षित असले, तरी वैद्यकीय ज्ञानाची ओढ त्यांच्यात उपजतच आहे. त्यांचा संपर्क बायफ मित्र या संस्थेसोबत झाल्यानंतर त्यांच्यासोबत त्यांनी काम केलं. विविध संस्थांच्या माध्यमातून गुजरात, पुणे, जळगाव अशा ठिकाणी वैद्यकीचं विशेष प्रशिक्षण घेतलं. नाशिक येथे आयुर्वेद विषयक कार्यशाळेत उपस्थित राहून आपलं ज्ञान वृध्दींगत केलं. अर्धांगवायू अर्थात लकवा या रोगाचे अनेक रूग्ण त्यांनी लीलया बरे केले. धानोरा येथे गंगा घोडाम नावाची एक भाजीपाला विक्रेती आहे. तिच्या मुलीला लकव्याच्या आजारामुळे फार त्रास सहन करावा लागत होता. तिचे दोन्ही हात आणि पाय बधीर झाले होते. आपल्या मुलीसाठी त्या गरीब महिलेने धानोरा, गडचिरोली, नागपुरची रूग्णालये पालथी घातली. आपल्याजवळचा होता नव्हता पैसा तिच्या आजारावर खर्च केला. पण, कुठेच आजार बरा झाला नाही. शेवटी नरोटे यांनी तिला तीन मंगळवार उपचारासाठी येण्यास सांगितले. आज ती मुलगी ठणठणीत बरी आहे. गावडे नावाच्या एका महिलेचीही अशीच व्यथा होती. अर्धांगवायुमुळे एक हात, एक पाय निकामी झाला होता. चार मंगळवार उपचार घेतल्याननंतर त्या आज स्वत:च्या पायावर चालत आहेत. येरकड गावच्या कोल्हेबाईंचं अर्धांगवायुमुळे हात, पाय आणि तोंडसुध्दा संवेदनाहीन झालं होतं. त्यांच्यावर नरोटे यांनी खास उपचार केल्याने त्याही ठणठणीत बऱ्या झाल्या आहेत. त्यांच्या वैद्यकीचा गुण सर्वदूर पोहचल्याने जपानहून तीन व्यक्ती त्यांना भेटायला आल्या. त्यांनी नरोटे यांच्याकडे मुक्काम करून त्यांच्या विद्येची माहिती घेतली. नरोटे यांना या बाबीचा अभिमान वाटण्याऐवजी खंत वाटते. कारण, आजही भारतात वनौषधी व वैदूंविषयी फारशी जागरूकता नाही. त्यामुळे जपान, जर्मनी, अमेरीका, इंग्लड अशा विकसित देशातील अनेकजण वैदूंकडून दुर्मिळ वनौषधींची माहिती घेतात व त्या औषधींची पेटंट घेतात. त्यामुळे आपले प्राचीन ज्ञान विदेशात चोरीस जात आहे. हे थांबविण्यासाठी वैदूंना योग्य तो मान देऊन त्यांचा विकास करणे आवश्यक असल्याचेही ते म्हणतात. वैदूंचं पारंपरिक ज्ञान बरचसं मौखिक रूपात आहे. ते

लिखित रूपात संग्रहित व्हावं अशी इच्छाही ते व्यक्त करतात. कारण, या मौखिक परंपरेमुळे पणजोबांना माहित असलेल्या अनेक दुर्मिळ वनस्पती आपल्यापासून दुरावल्याचं ते म्हणतात. पूर्वीचे वैदू आपल्या वारसांनाही काही औषधींची माहिती सांगत नव्हते. 'आजा मेला अन् घेऊन गेला' ही म्हण ग्रामीण भागात यामुळेच रूजली असावी. नरोटे यांना पाच मुलं आणि दोन मुली आहेत. आपल्या मुलांना ते आपलं वैद्यकीच ज्ञान देत आहेत. वैदू व्यवसाय करीत असले, तरी त्यांनी गृहरक्षकाचं प्रशिक्षणही घेतलं आहे. गोबरगॅस तयार करण्याचं कसबही त्यांना अवगत आहे. लाकुडकामही त्यांना उत्तमप्रकारे येतं. निसर्गाच्या शक्तीवर त्यांचा प्रचंड विश्वास आहे. कोणत्याही आजाराचा प्रसार होण्यापूर्वी निसर्ग त्यावरचं औषध तयार करतो, यावर त्यांचा ठाम विश्वास आहे. पहिला पाऊस पडतो तेव्हा जंगलात कुड्याची फुलं फुलू लागतात. तेव्हा या फुलांची भाजी खायला हवी. कारण, याच पावसाळ्यत मलेरियाची साथ सुरू होते. कुड्याची फुलं खाणाऱ्यांना मलेरियाच्या आजाराला बळी पडावं लागत नाही. तसचं बहावा फुलल्यानंतर घशाचे आजार सुरू होतात. म्हणून बहाव्याची भाजी खाल्यास घशाच्या विकारांपासून मुक्ती मिळते. पहिल्या पावसात जंगलात सफेद मुसळी मिळते. ही मुसळी शक्तीवर्धक असते. पूर्वी शेतकरी ही मुसळी खायचे. त्यामुळे त्यांना वर्षभर शेतीतील मेहनतीच्या कामासाठी शक्ती मिळायची. त्याचप्रमाणे पिंपळाचा बार बुध्दीवर्धक असल्याचं ते म्हणतात. निसर्गाच्या नियमाने चाललं तर, रोग होऊच शकत नाही, असं त्यांचं ठाम मत आहे. आदिवासी समाजात वनौषधींविषयीच ज्ञान चांगलं आहे. या वनौषधीप्रती कृतज्ञता म्हणून दरवर्षी २ जुलै रोजी आदिवासी पोलो पाळतात. या दिवशी ते वनस्पतीची पूजा करतात. प्रत्येकानेच वनौषधीप्रती आदरभाव ठेवावा, असेही ते म्हणतात. कॉलरा या आजारासाठी त्यांना खास उपायही सांगितला. कॉलराग्रस्त रूग्णला थोडे धने, थोडी सुंठ व तांदूळ बारीक करून एक ग्लास पाण्यात भिजवून ते पाणी दिवसातून तीन वेळ दिल्यास हा आजार बरा होतो, असं ते म्हणाले.

**गणपती आशण्णा दासरवार :-** गणपती दासरवार वैदूंच्या विश्वात 'दासरवार काका' म्हणून ओळखले जातात. वनौषधींच्या ज्ञानासोबतच आध्यात्मिक ज्ञानानेही ते संपन्न आहेत. त्यांच्याही घराण्यात वैद्यकीची परंपरा आहे. 'साधुचे कुळ आणि नदीचे मुळ ' विचारू नये म्हणतात. तरी आम्ही ही माहितीही घेतलीच. दासरवार काकांच्या वंशाचं मुळ आंध्रप्रदेशात आहे. त्यांचे आजोबा आंध्रप्रदेशात प्रसिध्द वैद्य होते. पोटापाण्यासाठी भटकंती करताना ते महाराष्ट्रात आले आणि इथेच स्थायिक झाले. त्यांनी गडचिरोली–चामोर्शी मार्गावर असलेल्या तळोधी (मोकासा) या गावात बिऱ्हाड थाटले. पण, त्यांच्या वडीलांचे आजोबांशी फार पटत नव्हते. त्यामुळे दासरवार काकांचे वडील आशण्णा यांनी एक दिवस घरच सोडलं. त्यांनाही आध्यात्माची ओढ होती. ते थेट उत्तर आसामला गेले. तिथे कामरूप कामाख्या मंदिर परीसरातच २० वर्षे राहिले. या काळात त्यांनी परंपरागत वैद्यकीच्या ज्ञानासोबतच त्या भागातील अनेक साधू, संतांकडूनही रोगोपचार, अध्यात्म साधनेचं ज्ञान मिळविलं. केवळ पोटापुरता विचार करण्याऐवजी त्यांनी देशाच्या स्वतंत्रतेसाठीही संघर्ष केला. असे कर्तबगार देशप्रेमी आशण्णा दासरवार दुर्दैवाने अल्पायुषी ठरले. गणपती दासरवार अवघ्या दोन वर्षांचे असतानाच त्यांचे पितृछत्र हरपले. पण, त्यांच्या आईने त्यांना मोठ्या प्रेमाने वाढविले. वडीलांकडून मिळालेली विद्या त्यांनी गणपती दासरवार यांना शिकविली. आज हिच परंपरागत विद्या आणि अध्यात्मिक ऊर्जेच्या बळावर ते अनेकांना रोगमुक्त करत आहेत. वयाची सात दशके उलटूनही दासरवार काका ठणठणीत आहेत. बालपणापासूनच एका डोळ्याने अधू असतानाही त्यांनी आपल्या व्यंगाचा बाऊ केला नाही. बालपणीच वडील वारल्यामुळे कोवळ्या वयातच त्यांना मोठ्या जबाबदाऱ्या पेलाव्या लागल्या. एकेकाळी गडचिरोली शहरात त्यांचचं मोठं हॉटेल होतं. १६ नोकर या हॉटेलात राबायचे. पण, काही संकटं आल्याने त्यांना हे हॉटेल बंद करावं लागलं. अन्य व्यवसाय करीत असतानाही त्यांनी आपल्या वैद्यकीय ज्ञानाव्दारे रोगमुक्तीचं कार्य सुरूच ठेवलं. बोथली गावातील मोटघरे नावाचा एक कंपांउडर मुळव्याध या आजाराने त्रस्त होता. खूप रक्त जायचं. अनेक ठिकाणी उपचार घेऊनही गुण येत नव्हता. शेवटी तो दासरवार काकांकडे आला. त्यांनी त्रिफळा चूर्ण, संधैव मिठ, रूईची फुलं यासोबत विविध वनौषधींचा वापर केला. सुरवातीला त्या रूग्णाचा वैदूंच्या औषधींवर विश्वासच नव्हता. पण, काही दिवसातच त्याचा असाध्य रोग

बरा होऊ लागल्याने त्याने सर्व नियमांचं पालन केलं. त्याचं यकृत कमजोर झालं होतं. ते मजबूत करण्यासाठी त्यांनी गोंगल वृक्षाच्या मुळ्यांचा वापर केला. आता हा रूग्ण पूर्ण बरा झाला आहे. असे अनेक रूग्ण दासरवार काकांनी रोगमुक्त केले. यासोबतच योगसाधना, योगसाधनेतील विविध प्रकारच्या मुद्रांचाही त्यांचा सखोल अभ्यास आहे. शिवाय स्पर्श चिकित्सेव्दारेही अनेक आजारांवर ते प्रभावी उपचार करतात. मलेरिया, टाईफॉईड व अन्य आजारांवर त्यांनी एक उपयुक्त घरगुती उपचार सुचविला. ११ मिरी, ११ तुळशी पाने कुटून एक कप पाण्यात उकळायचं. हे मिश्रण चहाचा एक चमचा इतकं शिल्लक राहिल्यावर ते रूग्णाला द्यायचं. त्यामुळे रूग्ण लवकर बरा होतो. शिवाय आजारात तोंड कडू होण्याची लक्षणेही कमी होतात. अपराजिताच्या बिजाचं चूर्ण कर्करोगाच्या रूग्णाला दिल्यास त्याची रोग प्रतिकार शक्ती वाढते. हिवराच्या वृक्षाला काळ्या गाठी असतात. या गाठीसुध्दा कर्करोगाच्या उपचारासाठी उपयुक्त असल्याचं त्यांनी सांगितलं. सध्या दासरवार काका वैदू मंडळाच्या कारखान्याचं कामही बघतात. आपण कधीही एका जागेवर राहून रूग्णांवर उपचार करत नाही. मी स्वत:च एक चालता बोलता दवाखाना आहे, असं ते हसून सांगतात.

**डॉ. विठ्ठल तुकाराम घोगरे :-** वैदूंमध्ये सर्वात उच्च शिक्षित असलेले डॉ. विठ्ठल घोगरे यांना वैदू म्हणण्याऐवजी वैद्यराज म्हणायला हवं. त्यांनी बी.ई.एम.एस., एन.डी.ए बी.एम.पी.पी.एस, सी.सी.एन.वाय अशा पदव्या व पदविका प्राप्त केल्या आहेत. आधुनिक वैद्यकीय शिक्षण घेतल्यानंतरही त्यांनी ॲलोपॅथीच्या नादी न लागता वैदूंकडील वनौषधीचं ज्ञान आत्मसात केलं. बालपणापासून डॉ. घोगरे चौकस बुध्दीचे होते. त्यांची आत्या आनंदाबाई श्रीहरी घोटेकर महासुदर्शन काढा व अन्य आयुर्वेदिक औषधी तयार करायच्या. आपल्या आत्याकडून त्यांनी आयुर्वेदातील विविध औषधींचं ज्ञान प्राप्त झालं. आपण ज्याला अंधश्रध्दा समजतो त्यामागेही काहीतरी कारणं असावीत, असं त्यांना नेहमी वाटायचं. म्हणून त्यांनी प्रथा, परंपरांचं बारकाईनं निरिक्षण केलं. पूर्वी उन्हाळ्यत बालकांना माता अर्थात गोवर, कांजण्या असे आजार झाल्यावर नागरिक गावकुसावर असलेल्या मरीआईला किंवा शीतला मातेला पाणी घालायचे व तिथली माती घरी आणायचे. त्यांनी यावर नीट संशोधन केल्यानंतर त्यांच्या लक्षात आलं की, या मरीआईचं मंदिर नेहमी निंबाच्या झाडाखालीच असतं. तिची मुर्तीही निंबाच्या खोडापासून तयार करतात. कडूनिंब शांत गुणाचा व त्वचारोगनाशक आहे. यायाच अर्थ कडूनिबांच्या सहवासाने त्या परीसरातील मातीतही औषधी गुण येत असावेत. लोकं श्रध्देने ही माती नेतात. त्यांची श्रध्दा आणि मातीतला कडूनिंबाचा औषधी गुण यामुळे रूग्णाला आराम मिळतो हे त्यांच्या लक्षात आलं. अशा अनेक परंपरांमागील वैज्ञानिक कारणं त्यांनी शोधली आहेत. बालपणी ते चंद्रपूर जिल्ह्यातील सावलीचे डॉ. झेंडे, डॉ. गेडाम, निष्णात वैद्य असलेले शिक्षक श्री. आभारे यांच्या संपर्कात आले. अशा अनेक गुरूंकडून त्यांनी वैद्यकीचं ज्ञान घेतलं. अनेक प्राचीन ग्रथांचं वाचन केलं. त्यांनी जन स्वास्थ्य रक्षक म्हणून शासनाच्या आरोग्य प्रकल्पात काम केलं. तेव्हा ते रूग्णांना ॲलोपॅथीच्या औषधी द्यायचे. पण, नंतर विविध पदव्या प्राप्त करून आयुर्वेदाचा सखोल अभ्यास करून १९८३ पासून त्यांनी रूग्णसेवेसाठी स्वत:ला वाहून घेतलं. संकल्प शिवार या संस्थेची स्थापना करून आज ते स्वत:च्या औषधी तयार करतात. डॉ. भरणे हे त्यांचे खास मित्र. बीएएमएसचं शिक्षण सुरू असताना डॉ. भरणे त्यांच्या संपर्कात आले व त्यांची मैत्री झाली. आयुर्वेदातील विविध संकल्पनांवर चर्चा करताना अनेक प्रयोगही त्यांनी केले. डॉ. घोगरे जिल्हा वनौषधी मंडळाचे सहसचिव आहेत. भुईनिबं ५ पत्र, तुळस १० पत्र, निर्गुडी ३ पत्र याचा काढा करून सकाळ, दुपार, सायंकाळ अशा तीन मात्रा घेतल्यास ताप, दाह त्वरीत बरा होत असल्याची माहिती त्यांनी दिली. अंडेलकर नावाचे एक पोलीस कर्मचारी पौरूषहीनतेने ग्रस्त होते. त्यांच्यात शुक्राणूंची कमतरता होती. अनेक डॉक्टरांकडे तपासणी व उपचार झाले. पण, काहीच फायदा झाला नाही. उलट डॉक्टरांनी तुम्ही संतती निर्माण करण्यास अक्षम असल्यामुळे लग्नच करू नका, असा सल्ला दिला. पण, डॉ. घोगरे यांनी त्यांच्यावर योग्य उपचार केले. एक वर्षाच्या दीर्घ उपचारानंतर अंडेलकरांची समस्या दूर झाली. त्यांचं लग्न झालं असून एक मुलगा आणि एक कन्यारत्न त्यांना प्राप्त झालं. अशा अनेकांच्या समस्या त्यांनी दूर केल्या आहेत. डॉ. घोगरे यांचे सुपुत्र राजीव घोगरे फिजिओ थेरपिस्ट असून सीसीएनवाय, डीएमएलटी अशा पदव्या प्राप्त केल्या आहेत. त्यांनी मुलालाही पारंपारिक वनौषधींचं ज्ञान देऊन त्याव्दारे

रूग्णांचा उपचार करण्याची प्रेरणा दिली. आज हे पितापुत्र वनौषधींचा प्रचार व त्यापासून रोगमुक्तीसाठी प्रयत्नशील आहेत.

**नंदाजी रामजी चलाख :-** गडचिरोली जिल्ह्यातील चामोर्शी तालुक्यात राहणारे नंदाजी चलाख एक हरहुन्नरी वैद्य म्हणून प्रख्यात आहेत. अल्प शिक्षित असले, तरी त्यांचं वनौषधींचं ज्ञान प्रचंड आहे. विशेष म्हणजे विविध औषधींच्या स्थानिक नावांसह त्यांना शास्त्रीय लॅटिन नावही तोंडपाठ आहेत. साध्या कपड्यातला हा वैद्य जेव्हा वनौषधींच्या स्थानिक नावांसह त्यांची लॅटिन भाषेतील शास्त्रीय नावंही दणादण सांगू लागतो तेव्हा वनस्पतीशास्त्रज्ञही अचंबित झाल्याशिवाय राहात नाहीत. शिक्षणासाठी विशिष्ट शाखेची पदवीच असावी असं नाही. आपण ज्या व्यवसायात आहोत त्यातील सर्व प्रकारचं ज्ञान आपण मिळवायलं हवं, असं त्यांच ठाम मत आहे. म्हणून ते रानावनात फिरून स्थानिक नागरिक, आदिवासींकडून माहिती घेत अनेक दुर्मिळ औषधी शोधून काढतात. विविध वनस्पतीशास्त्रज्ञ, आयुर्वेदिक डॉक्टर्सशी चर्चा करून सर्वप्रकारची माहिती मिळवून आपलं ज्ञान वृध्दींगत करतात. त्यांचा संत साहित्याचाही चांगला अभ्यास आहे. अनेक संतांच्या ओव्या, अभंग त्यांच्या ओठी खेळत असतात. मधुमेह, कर्करोग, दमा, मुळव्याध, विषमज्वर आदी आजारांवरील उपचारात त्यांचा हातखंडा आहे. याशिवाय दमा, संधीवात, कोणत्याही प्रकारच्या ट्युमरवरही सफल उपचार करतात. त्यांनी आजोबा, वडील तसेच गुरू परंपरेतून हे ज्ञान प्राप्त केलं आहे. केवळ गडचिरोलीतच नव्हे, तर अन्य भागातील नागरिकही त्यांच्याकडे उपचारासाठी येतात. अनेक भागातून त्यांना उपचारासाठी आमंत्रित करण्यात येतं. त्यांनी शोधलेल्या औषधी व उपचारांचा वापर अनेक वैदूही करत असतात. गंडमाळा, शरीरावरच्या गाठी, सर्पदंशांवरही प्रभावी उपचार करतात. डोमा चुनारे या व्यक्तीला दम्याचा त्रास होता. फार जुनाट दमा असल्यानं कोणत्याचं डॉक्टरांचे उपचार उपयोगी पडले नाहीत. अखेर नंदाजी चलाख यांनी त्यांना रोगमुक्त केलं. आरोग्य जपण्याचा मुलमंत्र ते एका म्हणीच्या रूपात देतात. 'यकृत ठिक, तर प्रकृती नीट'. 'शरीरात पित्त, संसारात वित्त आणि परमार्थात चित्त' आवश्यक असल्याचंही ते आवर्जून सांगतात. कोरफड ही ६४ दिव्य वनस्पतीपैकी एक आहे.ती ३६ प्रकारचे आजार बरे करते. शरीरातील विशाक्त पदार्थ बाहेर टाकते. याशिवाय गुळवेल, तुळस, भुईनिंब या वनस्पतीही रोगमुक्तीसाठी अत्यावश्यक असल्याचं ते सांगतात. त्यांना प्रिती आणि प्रज्ञा अशा दोन मुली आहेत. मोठी प्रिती औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) मध्ये शिक्षण घेत आहे. तर, लहान प्रज्ञा विज्ञान शाखेत ११ वीत शिकत आहे. आपल्या दोन्ही मुलींना नंदाजी चलाख रोगोपचाराचं ज्ञान देत आहेत.

**राकेश पुरूषोत्तम जुआरे :-** गडचिरोली जिल्ह्यातील ठाणेगावचे प्रसिध्द हाडवैद्य पुरूषोत्तम जुआरे यांचे पुत्र राकेश जुआरे आपल्या वडीलांचा वारसा चालवित आहेत. पुरूषोत्तम जुआरे निष्णात हाडवैद्य आहेत. पूर्वी हाडवैद्यांची संख्या खुप होती. पण, आता हे हाडवैद्य दुर्मिळ झाले आहेत. जुआरे यांच्याकडे विविध राज्यातून रूग्ण येतात. अॅलोपॅथीच्या डॉक्टरांकडून उपचार करूनही काहीच फायदा न झालेले रूग्णही त्यांच्याकडून बरे होतात. अपघातात विविध ठिकाणी हाडं मोडलेले रूग्ण खाटेवर येतात. पण, जुआरे यांनी वनौषधींचा वापर करून कौशल्याने बांधलेल्या बँडेजनंतर स्वत:च्या पायावर उभे राहून घरी जातात. डॉक्टरांना हाड मोडल्याचं निदान करण्यासाठी एक्स रे ची आवश्यकता असते. आतातर तर सीटी स्कॅन, एमआरआयसारखं आधुनिक तंत्रज्ञान आलं आहे. पण, जुआरे पितापुत्र रूग्णाला बघताच हाड कुठून आणि कसं मोडलं असेल हे लगेच सांगतात. दहावी नापास असलेला राकेश अनेक ऑर्थोपेडीक डॉक्टरांशी आत्मविश्वासानं चर्चा करतो. पांढरकवडा येथील दिलीप वसंत नरताम याच्या गुडघ्याच्या वाटीचे दोन तुकडे झाले होते. डॉक्टरांनी महागडी शस्त्रक्रीया सांगितली. आधीच गरीब असलेल्या दिलीपने नुकतच मुलीचं लग्न केलं होतं. त्यामुळे घरातला होता नव्हता तो पैसाही लग्न कार्यात खर्च झाला होता. शेवटी ठाणेगावात आला. जुआरे यांनी त्याला स्पष्ट सांगितलं. तू चालू शकशील, धावूसुध्दा शकशील. पण, तुझी वाटी जुळणार नाही. आज त्यांच्या उपचाराने दिलीप स्वत:च्या पायांवर चालत आहे. अनेक वैदूंप्रमाणे जुआरे यांची खासीयत म्हणजे हे काम ते पैशांसाठी करत नाहीत. अनेक रूग्ण खुप गरीब असतात. दूर गावातून आलेले असतात. त्यांना उपचारानंतर देण्यासाठी पैसे नसतात. अशावेळेस जुआरे त्यांच्याकडून पैसे

न घेता उलट त्यांनाच गावी परत जाण्याचं बस भाडं देऊन निरोप घेतात.

**कालिपद शहापद मलिक :-** गडचिरोली जिल्ह्यातील चामोर्शी तालुक्यातील सुंदरनगर येथे राहणारे कालिपद शहापद मलिक एटापल्ली येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेत शिक्षक आहेत. विद्यार्थ्यांना घडविणा—या आदर्श शिक्षकासोबत निष्णात वैद्य म्हणूनही त्यांची सर्वदूर ओळख आहे. विशेष म्हणजे अनेक दुर्धर आजारावर यशस्वी उपचार करणारे श्री. मलिक रूग्णाकडून एकही पैसा घेत नाहीत. अनेक गोरगरीब रूग्णांची सेवा करून त्यांना रोगमुक्त करणं हेच त्यांचं ध्येय आहे. बी.एस.सी. गणित, डी.एड. बी.एड., असं शिक्षण घेतलेले मलिक वैदूंमध्ये व त्यांच्या वनौषधी विश्वातच अधिक रमतात. त्यामुळे त्यांची ओळखही वैदू अशीच आहे. गडचिरोली जिल्ह्यातील दुर्गम भागात रूग्णसेवा देतानाच दिल्ली येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय आयुर्वेद परिषदेतही त्यांनी सहभाग घेतला. त्यांना वैद्यकीचा वारसा त्यांचे वडील कालिपद मलिक यांच्यापासून मिळाला. पूर्वी वैद्यांना कविराज म्हणायचे. त्यामुळे ते आपल्या वडीलांना कविराज या पदवीनेच संबोधण्यात आनंद मानतात. त्यांचे वडील अतिशय प्रसिध्द वैद्य होते. त्यांचे शुल्क त्या काळात सव्वा रूपया असायचे. अनेक रूग्ण बरे झाल्यावर त्यांना धोतरी जोडी, बनियान किंवा अन्य वस्त्रे द्यायचे. त्यांचे परोपकारी वडील ती वस्त्रे दान करायचे. गरीबांसाठी झटण्याचा संस्कार त्यांच्यावर याच कृतितून झाला. सर्दी, जुलाब, दाढदुखीपासून गॅंगरीन ते कर्करोगापर्यंतच्या असाध्य आजारावर ते उपचार करतात. दाढदुखीसाठी तर ते खुप प्रसिध्द आहेत. गंमत म्हणजे दाढदुखीवर उपचार करताना रूग्णाची ज्या बाजुची दाढ दुखत असेल त्या बाजुच्या पायाच्या अंगठयाला नेल पॉलिशप्रमाणे ते एक औषध लावतात आणि दाढदुखीने रडकुंडीस आलेला रूग्ण काही क्षणात हसत हसत त्यांचे आभार मानत घरी जातो. चंदनवेली गावातील एक जेमतेम पाच ते सहा वर्षाचा मुलगा झाडावरून पडला. त्याचा पाय मोडला. शस्त्रक्रिया झाली. पण ती यशस्वी झाली नाही. मुलाच्या पायावरचं मांस खराब झालं. तेव्हा डॉक्टरांनी त्याच्या मांडीचं मांस काढून पायाला लावलं. पण काही उपयोग झाला नाही. उलट या सर्व प्रकारात तीन लाखाहून अधिक खर्च झाला. अखेर श्री. मलिक यांनी उपचार सुरू केल्यावर तीन दिवसात त्या मुलात सुधारणा दिसून आली. अशाच एका गॅंगरीनच्या रूग्णाचा पायाचा पंजा खराब झाला होता. काही बोटं निघून गेली होती. डॉक्टरांनी त्याला पाय कापण्यास सांगीतलं. पण, आता श्री. मलिक यांच्या उपचाराने त्याची जखम भरत आली आहे. या सर्व रूग्णाची छायाचित्रेही त्यांच्याकडे उपलब्ध आहे. ते वर्गात शिकत असतांना एका मुलापासून सर्व मुलं दूर बसली होती. त्यांनी कारण विचारल्यावर त्या विद्यार्थ्याच्या कानातुन पू आणि दुर्गंधी येत असल्यानं कुणी त्याच्याजवळ बसत नाही, असं इतर विद्यार्थ्यांनी सांगीतलं. तेव्ही श्री. मलिक यांनी एका विद्यार्थ्याला पानफुटीचं पान आणायला सांगीतलं. या वनस्पतीच्या पानाला गरम करून त्याचा रस काढून विद्यार्थ्याच्या कानात घातला. त्याला हा उपचार काही दिवस करायला सांगीतला. या मुलाचा कानाचा रस आश्चर्यकारकरित्या दूर झाला. श्री. मलिक त्यांचे ज्ञान सतत इतरांना देत असतात. त्यामुळे गावात कुणी आजारी पडलं, तर त्यांचे विद्यार्थीसुध्दा त्या आजारावरच्या वनस्पती आणून रूग्णांचा उपचार करतात. अनेक ठिकाणी ते आपल्या वनौषधींची प्रदर्शनी भरवून त्याचं महत्त्व पटवून देतात. त्याच्या या कार्यावर काहीजण टिकाही करतात. सुशिक्षित शिक्षण असून जडीबूटी कशाला घेवून बसतो, म्हणून चिडवतात. तेव्हा श्री. मलिक एकच म्हणतात. या ज्ञानानं जर इतरांचे प्राण वाचत असतील, त्यांची पीडा दूर होत असतील, तर मला जडीबूटीवाला म्हटलं, तरी चालेल. नुकतेच ते मध्यप्रदेश राज्यात जावून आले. त्यांच्या ज्ञानानं प्रभावित होवून तिथल्या सागर इंस्टिट्यूट ऑफ रिसर्च टेक्नालॉजी एन्ड सायंसचे संचालक डॉ. जितेंद्र बनवीर यांनी त्यांच्या महाविद्यालयात श्री. मलिक यांना व्याख्यानासाठी खास आमंत्रित केलं. योगगुरू रामदेवबाबा व आचार्य बालकृष्णजी यांच्या ज्ञानाचा त्यांच्यावर खूप प्रभाव आहे. आचार्य बालकृष्णजी यांच्या टिव्ही कार्यक्रमातील प्रत्येक भाग पाहून त्यांनी वनौषधीविषयी बरचं ज्ञान मिळवलं. त्यामुळे ते पतंजलि योग सेवा समितीचंही काम करतात. योगशास्त्राचाही त्यांचा चांगला अभ्यास आहे. त्यांनी खोकल्यावर सांगितलेला एक उपचार सर्वांनीच करून पाहण्यासारखा आहे. पारीजातकाची तीन पानं, पाच ते सात फुलं घेवून दोन कप पाण्यात उकळायची. एक कप पाणी उरल्यावर ते गरम गरम चहासारखं प्यायचं. हा उपाय रोज सकाळ, संध्याकाळ

१५ दिवस करायचा. कोणत्याही प्रकारचा खोकला नक्की बरा होईल.

**पुंडलिक गांडोजी गावळे :-** गडचिरोली जिल्ह्यातील केळीगट्टा या दुर्गम गावातील पुंडलिक गावळे व्यवसायाने शिक्षक असले तरी त्यांनी परीश्रमाने वैद्यकीचे ज्ञान प्राप्त केले आहे. जन्माने आदिवासी असलेल्या श्री. गावळे यांचा प्रारंभी आदिवासी समाजातील चालीरीती, रूढी परंपरा आणि वैद्यकीय ज्ञानावरही फारसा विश्वास नव्हता. त्यांचे वडील धार्मिक क्षेत्रात कार्यरत होते. ते देवकरणी करायचे. विविध अनुष्ठानात मग्न असायचे. हा प्रकार श्री. गावळे यांना आवडत नव्हता. मध्यंतरी त्यांच्या वडीलांना कर्करोग झाला. त्यानंतर त्यांचे तीन बैल अचानक मृत्यूमुखी पडले. तेसुध्दा आजारी राहू लागले. या सर्व संकटांचा सामना करताना त्यांचा धार्मिक, आध्यात्मिक क्षेत्राकडे कल वाढू लागला. आपल्या प्राचीन गोंडी धर्माचा अभ्यास त्यांनी सुरू केला. ते जवळपास १५ दिवस आजारी होते. त्यांनी शहरातील नामवंत डॉक्टरांकडून उपचार घेतले. पण, तब्बेतीत काही फरक पडला नाही. अखेर गावातीलच एका वैदूने उपचार करताच ते पूर्णपणे बरे झाले. तेव्हापासून त्यांचा ओढा वैदूंच्या वनौषधींकडे वाढला. आरमोरी तालुक्यातील कुरूंडी मेंढा या गावातील श्री. कुमरे यांच्या ते संपर्कात आले. श्री. कुमरे कर्करोगावर प्रभावी उपचार करतात. त्यांच्यापासूनच श्री. गावळे यांना प्रेरणा मिळाली. श्री. गावळे यांच्या म्हणण्यानुसार गोंडी संस्कृतीत विविध क्षेत्र असतात. पहिले असते सात्विक क्षेत्र. यात होमहवन, मंत्र, तंत्राचा समावेश असतो. दुसरा असतो गोंडी परंपरेनूसार भाव देणे, देव आणणे तर तिसरे असते औषधी क्षेत्र. सुरवातीला गावळे यांनी धार्मिक, आध्यात्मिक विधिंचा वापर करून पाहिला. पण, त्यामुळे रूग्ण पूर्ण बरा होत नव्हता. शेवटी ते औषधी क्षेत्राकडे पर्यायाने वैदूंच्या विश्वाकडे वळले. आता ते गडचिरोली जिल्हा वैदू मंडळाचे अध्यक्ष आहेत. सुरवातीला ते वैदूंकडे माहिती घ्यायला जायचे, तेव्हा ते वैदू औषधी सांगण्यास नकार देत. कारण वैदू वनस्पती जिवंत जिव असतात असं मानतात. त्यामुळे विधिवत पूजापाठ करून रोपाची परवानगी घेवूनच ते रोपे काढतात. त्यामुळे ते अशी माहिती देण्यास उत्सूक नसतात. पण, गावळे यांनी अतिशय मेहनतीने वैदूंची मने जिंकून विविध औषधींचं ज्ञान मिळविलं. यासोबतच विविध पुस्तकांचा अभ्यास केला. डॉ. प्रशांत भरणे त्यांचे बालमित्र आहेत. त्यामुळे त्यांकडूनही बरच ज्ञान मिळत गेलं. आता ते निष्णात वैदू असून कर्करोग, सिकलसेल, क्षेयरोग आदी विविध आजारांवर प्रभावी उपचार करतात. विशेष म्हणजे गर्भाशयातील कितीही मोठा गोळा असो ते शस्त्रक्रियेविणा पूर्णपणे बरा करतात. दहावी, डी. एड. पर्यंत शिक्षण झालेले श्री. गावळे भामरागड तालुक्यातील हिंदेवाडा येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शिक्षक आहेत. या गावातील एक महिलेला मासिक पाळीचा त्रास होता. श्री. गावळे यांनी औषध देताच तिचा त्रास दूर झाला. असे अनेक आजारांचे रूग्ण त्यांनी बरे केले आहे. बाळ गौरवर्णी होण्यासाठी त्यांनी खास औषध तयार केले आहे.

**वैद्य रजनिश नंदेश्वर व सौ. यशोधरा सहारे-नंदेश्वर :-** कुरखेडा तालुक्याच्या अतिदुर्गम गावातील हे पति–पत्नी दोघेही निष्णात वैदू आहेत. ताप, वातविकार व अन्य अनेक आजारांवर ते प्रभावी उपचार करतात. श्री. नंदेश्वर यांचा आयुर्वेदशास्त्राचा सखोल अभ्यास आहे. भारतात बौध्द काळात आयुर्वेद शास्त्राचा परम उत्कर्ष झाला होता. त्याकाळात अनेक बौध्द भिख्खू पारंगत वैद्य होते. मानवी आरोग्यावर सखोल संशोधन झाले होते. नालंदा, तक्षशीला, विक्रमशीला आदी बौध्द विद्यापीठात आयुर्वेदशास्त्र शिकविण्यात येत होते. बौध्द पर्वासोबत लुप्त झालेला आयुर्वेदशास्त्राचा हा दुवा पुन्हा जोडण्यसाचा ते मनापासून प्रयत्न करीत आहेत. त्यामुळे वैदिक काळापासून बौध्दकाळ व अर्वाचिन आरोग्यशास्त्राचा ते आपल्या परीने अभ्यास करतात. अनेक गोरगरीब रूग्णांवर उपचार करून हे दांम्पत्य त्यांना आरोग्य प्रदान करतं.

असे अनेक वैदू आपल्या परंपरागत ज्ञानाव्दारे असंख्य रूग्णांना रोगमुक्त करीत आहेत. जागेची मर्यादा असल्यानं केवळ उदाहरणादाखल काहीजणांची माहिती दिली. पण, दुर्गम, अतिदुर्गम भागात आपल्या परंपरागत ज्ञानाच्या बळावर रोगमूक्तीचं यज्ञकुंड प्रज्वलित करून बसलेल्या या प्राचीन ऋशीमुनींच्या वारसांना आता उजेडात आणणं गरजेचं आहे.

# प्रकरण ७

# शिलेदारांच्या मुलाखती

आपण वैदूंच्या विश्वाची ही भ्रमंती करत असताना या विश्वाला खऱ्या अर्थाने आकार देणारे व जंगलातील दुर्गम भागात विखुरलेल्या वैदूंना एकत्र आणून त्यांच्या माध्यमातून आरोग्यक्षेत्रातील या आगळ्या लोकचळवळीला प्रारंभ करणाऱ्या शिलेदारांविषयी जाणून घेणं आवश्यक आहे. म्हणूनच या उपक्रमातील बिनिच्या निवडक शिलेदाराच्या मुलाखती घेण्यात आल्या आहेत.

**श्री. टी.एस.के.रेड्डी, मुख्य वनसंरक्षक : -** गडचिरोली जिल्ह्याच्या वनविभागाला एक वेगळी दिशा देतानाच शासकीय नियमांच्या चौकटीतच नावीन्य निर्माण करीत अनेक विधायक कामे करणाऱ्या निवडक अधिकाऱ्यांपैकी गडचिरोलीचे मुख्य वनसंरक्षक श्री.टी.एस.के. रेड्डी एक महत्त्वाचे अधिकारी आहेत. एरवी गडचिरोलीसारख्या नक्षलग्रस्त, मागास जिल्ह्यात स्थानांतरण म्हणजे 'काळ्या पाण्याची शिक्षा' असाच समज प्रशासकीय सेवेतील अनेक अधिकाऱ्यां मध्ये असताना मुख्य वनसंरक्षक रेड्डी यांनी मात्र या जिल्ह्यातील आपल्या स्थानांतरणाकडे एक संधी, एक आव्हान म्हणूनच पाहिले. 'क्रियेविण वाचाळता व्यर्थ आहे' हे समर्थ रामदासांचं वचन त्यांनी आपल्या कार्यातून सार्थ ठरविलं आहे. गडचिरोलीसारख्या दुर्लक्षित जिल्ह्यातील एकमेव स्मृति उद्यानाची वाताहत होऊन आता हे उद्यान स्मृतिशेष होईल की काय, असं वाटत असताना श्री. रेड्डी यांनी आपल्या कुशल मार्गदर्शनात गडचिरोली शहरालगत पवित्र सेमाना देवस्थान परीसरात सेमाना उद्यान या अप्रतिम उद्यानाची निर्मीती केली. महानगरातील उद्यानालाही लाजवेल अशी या उद्यानाची वैशिष्ट्ये आहेत. एवढ्यावरच न थांबता सेमाना उद्यानाप्रमाणेच देसाईगंज, चामोर्शी, घोट, सिरोंचा, आलापल्ली या भागातही त्यांनी अशीच उद्याने विकसित केली. सामाजिक वनिकरण विभागाकडून शहरातील स्मृति उद्यानाची जबाबदारी मिळाल्यानंतर या उद्यानाचाही त्यांनी कायापालट केला. अनेक वर्षानंतर भारताला विश्वचषक जिंकून देणारा भारतीय क्रिकेट संघाचा कर्णधार महेंद्रसिंह धोनी याच्या हाताला 'मिडास टच' अर्थात हात लावेल तिथे सोने करण्याची किमया आहे, असं म्हणतात. श्री. रेड्डी यांच्याबाबतीतही असच म्हणता येईल. त्यांच्या परीसस्पर्शाने आज जिल्ह्यातील अनेक दुर्लक्षित उजाड जमिनींचं भाग्य उजळलं आहे. मितभाषी, कर्तव्यकठोर आणि कार्यतत्पर अशी ओळख असलेल्या या अधिकाऱ्याशी केलेली ही बातचित.



**लेखक :-** गडचिरोली जिल्ह्यात आजवर उपेक्षेचे जिणे जगत असलेल्या वैदूंची एक अभिनव चळवळ वनविभागाच्या माध्यमातून सुरू झाली आहे. या उपक्रमाची सुरवात कशी झाली?

**श्री. रेड्डी :-** गडचिरोली जिल्ह्यात येण्यापूर्वी या जिल्ह्याबद्दल बरच ऐकलं होतं. पण, जे काही ऐकलं त्यात नकारात्मक किंवा निराशेचा सुरू जास्त होता. मी मुख्य वनसंरक्षक म्हणून पदाची सुत्रे हाती घेतल्यानंतर या जिल्ह्याचा अभ्यास सुरू केला. शासकीय, प्रशासकीय स्तरावर या जिल्ह्याच्या कल्याणासाठी विविध उपक्रम राबविण्यात येतात. महसूल, कृषी, पोलीस आदी विभागांसह वनविभागही या जिल्ह्यातील नागरिकांसाठी योजना राबवितो. वन विभागाचा अधिक भर वनसंरक्षणावर असतो. ते आवश्यकच आहे. पण, त्यासोबत वनविभागानं मनात आणलं तर, वन व वनाशी संबंधित नागरिकांचं कल्याण होऊ शकतं हे मला लक्षात आलं. आपण भारताच्या प्राचीन इतिहासाचा विचार केला, तर प्राचीन काळात आपल्याकडे प्रचंड ज्ञान संपदा होती, असं लक्षात येईल. कृषीपासून गणित, विज्ञान, भुगोल,

आरोग्य, खगोलशास्त्र अशा विविध क्षेत्रात नेत्रदीपक प्रगती झाली होती. समृध्द सिंधू संस्कृती याच भुमीत नांदली. आर्यभट्ट, कणाद, वराहमिहीर, भास्कराचार्य सारखे शास्त्रज्ञ, ऋषीमुनी आपल्या देशात होते. नालंदासारख्या विद्यापीठात अनेक देशांचे विद्यार्थी ज्ञानार्जनासाठी यायचे. बौध्दकाळात नागार्जुन, जिवकसारखे महान शास्त्रज्ञ व निष्णात वैद्य होते. म्हणजे प्राचीन काळात भारत देश हा जगाला ज्ञान देणारा विश्वगुरू होता. पण, ग्रिक, हूण, मोगल, डच, फ्रेंच, इंग्रज अशा अनेकांच्या परकीय आक्रमणामुळे आपली समृध्द संस्कृती व ज्ञान लोप पावत गेले. त्यातही मोगल आणि ब्रिटिशांच्या दीर्घ राजवटीत एत्तदेशीय ज्ञानाची उपेक्षाच झाली. ब्रिटिशांनी इथल्या ज्ञानाचा स्वत:च्या प्रगतीसाठी वापर करून घेतला. आपले प्राचीन ज्ञान थोतांड आहे, असं सतत जनमानसावर बिंबवित स्वत:च्या ज्ञानाचा पगडा बसविला. गोबेल्स नावाच्या मानसशास्त्रज्ञाचा एक सिध्दांत आहे. एखाद्या व्यक्तीला एखादी खोटी गोष्ट शंभरदा सतत सांगितली, तर ती खोटी गोष्ट तो खरी मानू लागतो. इंग्रजांनी भारतात याच गोबेल्स तत्त्वज्ञानाचा वापर करून येथील प्राचीन ज्ञान सुप्तावस्थेत नेलं. आजही आपण त्या मानसिकतेतून बाहेर आलेलो नाही. म्हणूनच आपल्याला स्थानिक स्वदेशी ज्ञानापेक्षा विदेशी ज्ञानाची भुरळ लवकर पडते. आरोग्यक्षेत्रातील वैदूंचं स्थानिक ज्ञान आमच्या लक्षात आलं आणि त्यांना एकत्र आणायचे प्रयत्न सुरू केले.

**लेखक :-** सर्वप्रथम कोणता उपक्रम हाती घेतला ?

**श्री. रेड्डी :-** जिल्ह्यातील वैदू आणि त्यांच्या ज्ञानाबद्दल स्थानिक अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून बरीच माहिती मिळाली होती. या वैदूंना एका व्यासपीठावर एकत्र आणावं ही इच्छा होती. पण, तिला मुर्तरूप कसे आणायचे, या विवंचनेत होतो. दरम्यान आयुर्वेदाचार्य डॉ. प्रशांत भरणे यांच्याशी परीचय झाला. वैदूंच्या विकासासाठी ते विविध पातळीवर झटत होते. त्यांची वैदूंविषयीची आत्मीयता बघून मी माझा मनोदय व्यक्त केला. त्यातूनच वैदूंना एकत्र आणण्यासाठी वैदू संमेलनाची कल्पना सुचली. वैदूंशी संपर्क साधण्याची जबाबदारी डॉ. भरणे यांनी आनंदाने घेतली. सोबत आमच्या विभागाच्या उपवनसंरक्षक श्रीलक्ष्मी अण्णाबत्तुला, अन्य उपवनसंरक्षक, वनपरीक्षेत्र अधिकारी श्री. डोंबाळे, वनपरिक्षेत्र अधिकारी (मुख्यालय) श्री. नरेंद्र चांदेवार व अन्य अधिकारीही सोबत होते. या कार्यात वरीष्ठ अधिकाऱ्यांपासून वनरक्षक ते वनमजुरापर्यंत सर्वांनी हिरीरीने सहभाग घेतला. तत्कालीन जिल्हाधिकारी अभिषेक कृष्णा यांनाही ही कल्पना खुप आवडली. त्यांनी पूर्ण सहकार्य करण्याचं आश्वासन दिलं. आम्ही पहिलं संमेलन घेतलं, तेव्हा १५० वैदू सहभागी झाले. हा आमचा पहिलाच प्रयत्न होता. वैदू आपलं पारंपरिक ज्ञान कुणालाही सांगायला उत्सूक नसतात, अशी आमची माहिती होती. तसंच हे वैदू अशा मोठ्या मंचावर कधी आले नसल्याने आत्मविश्वासाअभावी बोलतील की, नाही अशी शंका होती. त्यामुळे या संमेलनात केवळ तीन वैदूंना मनोगत व्यक्त करण्याची संधी मिळाली. पण, संमेलनानंतर अनेक वैदूंनी भेटून आपणही बोलण्यास उत्सूक असल्याचं सांगितलं. हा आमच्यासाठी वेगळा व उत्साहित करणारा अनुभव होता. म्हणून मी लगेच दुसऱ्या वैदू संमेलनाची घोषणा केली.

**लेखक :-** दुसऱ्या संमेलनाचा अनुभव कसा होता ?

**श्री. रेड्डी :-** पहिल्या संमेलनाच्या अनुभवातून आम्ही बरच काही शिकलो होतो. त्यामुळे दुसऱ्या संमेलनाची तयारी चांगलीच झाली. यावेळी जास्तीत जास्त वैदूंना बोलतं करण्याचा आमचा प्रयत्न होता. या संमेलातून वैदूंच्या ज्ञानाचा अनमोल खजिना आश्चर्यजनकरित्या आमच्या पुढ्यात आला. अल्पशिक्षित वैदू जेव्हा त्यांच्या विद्येविषयी भरभरून बोलायला लागले तेव्हा आमचं आधुनिक ज्ञानही थिटं वाटलं. वैदूंच्या विश्वातील अनेक रहस्य या संमेलनातून उलगडत गेली. वनविभाग आणि वैदूंमध्ये एक अनुबंध निर्माण झाला. त्यांचेही वनविभागाविषयीचे अनेक गैरसमज गळून पडले. खरंतर आजवर त्यांच्यापर्यंत पोहचून त्यांना कुणी असं व्यासपीठ उपलब्ध करून दिलं नव्हतं. या संमेलनातून अनेक विषयांवर सखोल चर्चा झाली. वैदूंच्या अफाट ज्ञानाची प्रचीती आलीच पण, त्यांना निसर्ग व वनाबद्दल खुप कळवळा असल्याचही जाणवलं. ही दोन्ही संमेलनं या मैत्रीपूर्ण संवादात कशी संपली कळलं नाही. अजुनही वैदूंना व्यक्त व्हायचं होतं. आम्हालाही त्यांच्या ज्ञानाची ओढ लागली होती. काहीतरी वेगळं घडतय याची जाणीव होत होती. म्हणून मग तिसरं

संमेलनही आयोजित केलं. आमच्या कार्याला जणू एक लय प्राप्त झाली होती. वनविभागाने काहीतरी हरविलेले अनेक वर्षानंतर जणू पुन्हा मिळाले होते. 'भेटीलागी जिवा, लागलीसे आस' या अभंग ओळीप्रमाणे काहीसं वातावरण झालं होतं. या तिनही संमेलनातून वैदूंच्या आजवर अस्पष्ट असलेल्या अननुभूत विश्वाचं दर्शन झालं.

**लेखक :-** या संमेलनांची फलश्रुती काय झाली ?

**श्री. रेड्डी :-** या तिनही संमेलनातील अनुभव आम्हाला समृध्द करणारे होते. वैदू आजवर दुर्लक्षितच होते. आपण वरच्या पातळीवरून विकासाचा प्रयत्न करताना 'सब घोडे बारा टक्के' अशा न्यायाने अनेकदा योजना राबवित असतो. त्यामुळे मग योजनांचेही बारा वाजतात. म्हणून समाजाचं सुक्ष्म अध्ययन, समाजातील विविध घटकांची वैशिष्ट्ये, त्यांचं महत्त्व व गरजा समजून घेण्याची आवश्यकता असते. वैदू या समाजातील दुर्लक्षित घटकावर आम्हाला आता नीट लक्ष केंद्रीत करता येणार होतं. बरं यात फक्त वैदूंचाच लाभ होता असं नाही, त्यांना विविध वृक्ष व वनस्पतींचं सखोल ज्ञान असल्यामुळे कोणत्या वनस्पती दुर्मिळ होत आहेत, याची माहिती मिळून आमच्या वनसंरक्षणाच्या कामाला गती येणार होती. म्हणून आम्ही संमेलनामध्ये वैदूंना आवाहन केलं की, जंगलात दुर्मिळ किंवा नामशेष होत असलेले वृक्ष व वनस्पतीची माहिती त्यांनी आम्हाला द्यावी. आम्ही असे वृक्ष व वनस्पतींची लागवड आमच्या रोपवाटिकेत करून त्या वनस्पती वैदूंना उपचारासाठी उपलब्ध करून देऊ. ही कल्पनाही वैदूंना खुप आवडली. वैदूंना वनौषधी संकलनासाठी जंगलात जावं लागतं तेव्हा वनकायद्याचा अडसर निर्माण होतो. म्हणून आम्ही वैदूंची रितसर नोंदणी करून त्यांना ओळखपत्र दिले. हे ओळखपत्र दाखविल्यानंतर त्यांना जंगलात प्रवेश मिळतो. अशा ३३० वैदूंना ओळखपत्रे दिली आहेत. शिवाय वैदूंचं ज्ञान लक्षात घेऊन सेमाना उद्यान येथे आम्ही खास दवाखाना सुरू केला. येथे प्रत्येक वैदूला विशिष्ट दिवस नेमून दिला आहे. उद्यानात फिरायला येणारे पर्यटक त्यांच्याकडे नाडी परीक्षा व आरोग्य तपासणी अल्प दरात करू शकतात. तसेच औषधोपचारही घेऊ शकतात. इथेच डॉ. प्रशांत भरणे व वैदूंच्या माध्यमातून पंचकर्म चिकित्सा केंद्रही सुरू झालं आहे. वैदूंचे असे दवाखाने व पंचकर्म चिकित्सा केंद्र जिल्ह्यातील इतर भागातही सुरू करायचे आहेत. सर्वात महत्त्वाचं म्हणजे या संमेलनातील विचारमंथनातून वैदूंची एक सशक्त संघटना स्थापन करायचा निर्णय झाला. गडचिरोली जिल्हा वैदू मंडळाची आता स्थापना झाली आहे. उपवनसंरक्षक कार्यालय परीसरात गडचिरोली गोंडवाना हर्ब्स प्रकल्प उभा राहिला आहे. वैदूंच्या मार्गदर्शनात त्यांच्या ज्ञान व अनुभवावर आधारीत विविध औषधी इथे तयार होत आहेत. असं बरच काही या संमेलनातून मिळालं. नुकतच आमचं चौथं संमेलनही पार पडलं. यातूनही अनेक कल्पना पुढे आल्या. कार्याची प्रेरणा मिळाली.

**लेखक :-** आणखी काय उपक्रम राबवित आहात ?

**श्री. रेड्डी :-** वैदूंच्या माध्यमातून आम्हाला जिल्ह्यातील विविध वनौषधी व वनोपजाची माहिती मिळाली. हे वनोपज अनेक व्यापारी येऊन कवडीमोल दराने गरीब आदिवासींकडून घेऊन जातात हे सुध्दा माहित झालं. आम्ही या विषयाच्याही खोलात शिरलो. आयुर्वेदिक त्रिफळा चुर्णात वापरण्यात येणारे हिरडा, बेहडा ही आयुर्वेदिक फळे अवघ्या चार ते पाच रूपये किलो दराने विकण्यात येत होती. आम्ही बाजारपेठेत माहिती घेतल्यावर ही किंमत तब्बल १०० रूपयांपर्यंत असल्याचं निदर्शनास आलं. ही फसवणूक थांबविण्यासाठी शासनानेच हे वनोपज खरेदी करावे, असा विचार पुढे आला. जिल्हाधिकारी अभिषेक कृष्णा यांच्याशी चर्चा केली. त्यांची मान्यता घेऊन आम्ही या वनोपजाची आधारभूत किंमत जाहिर केली. त्यामुळे वैदूंसह गोरगरीब नागरिकांची फसवणूक थांबली. शास्त्रशुध्द मधसंकलनासाठीही गावातील नागरिकांना प्रशिक्षण आणि मधसंकलनाचा विशिष्ट पोषाख देण्यात येत आहे. गिधाड या दुर्मिळ पक्ष्याच्या संरक्षणाचे प्रयत्न होत आहेत. याशिवाय इतरही अनेक उपक्रम राबविण्यात येत आहेत.

**लेखक :-** गोंडवाना हर्बसंदर्भात काय सांगाल ?

**श्री. रेड्डी :-** गोंडवाना हर्ब्स ही वैदूंसाठी आम्ही करीत असलेल्या कामाची महत्त्वपूर्ण फलश्रृती आहे. अलिकडच्या काळात आयुर्वेदिक औषधींना बरेच महत्त्व प्राप्त होत आहे. गडचिरोलीसारख्या वनसंपन्न जिल्ह्यात अशा वनौषधींची रेलचेल आहे. त्याचं ज्ञान असलेले वैदू आहेत. मग, व्यावसायिक तत्त्वावर त्यांनीच औषधी निर्मीती का करू नये?, हा प्रश्न आम्हाला पडला. बहुसंख्य वैदू गरीब असतात. ते उपचाराचेही अनेकदा पैसे घेत नाहीत किंवा नाममात्र घेतात. एखाद्या महत्त्वाकांक्षी ध्येयवादी वैदूने मोठा व्यवसाय स्थापन करण्याचा प्रयत्न केला, तर त्याला अपेक्षित कर्ज सहज मिळत नाही .म्हणून आम्हीच गोंडवाना हर्बची संकल्पना मांडली. वैदूंनी स्वत:च औषध निर्मीती करावी, असं ठरलं. त्यासाठी आम्ही उपवनसंरक्षक कार्यालय परिसरात लीजवर जागा उपलब्ध करून दिली. वैदूंना शेड आणि खोल्या बांधून दिल्या. बायोडीझेल मशिन, चुर्ण तयार करण्याची तसेच मच्छर अगरबत्ती तयार करण्याची यंत्रे दिली. आता हा प्रकल्प छान बाळसं धरत आहे. सध्या याला वनविभागाचं सहकार्य असलं, तरी पुढे जिल्ह्यातील वैदूंनी स्वतंत्रपणे व्यवसाय करून जिल्ह्याच्या विकासात भर घालावी, हे आमचं ध्येय आहे. अनेक मान्यवरांनी या प्रकल्पाला भेटी दिल्या आहेत. औषध विभागाचे आयुक्त नुकतेच येऊन गेले. या प्रकल्पाला अन्न व औषधी विभागाचा परवाना मिळावा म्हणून आम्ही विनंती केली. त्यांना हा प्रकल्प इतका आवडला की, अर्ज सादर केल्यास अवघ्या १५ दिवसात परवाना देण्याचं आश्वासन त्यांनी दिलं. इथे निर्माण होणाऱ्या औषधींना बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी आमचे प्रयत्न सुरू आहेत. त्यासाठी येत्या काळात 'ग्राहक—विक्रेता' संमेलनाचं आयोजनही करणार आहोत. प्रधान सचिव (वने) श्री. प्रविणसिंह परदेसी यांनी या प्रकल्पाला भेट देऊन प्रकल्पाचं कौतुक केलं. तसंच काही महत्त्वाच्या सूचनाही दिल्या. विशेष म्हणजे आम्ही या प्रकल्पाची वेबसाईटही तयार केली आहे. या वेबसाईटच्या लिंकवरून थेट औषधांसाठी मागणी नोंदविता येते. नुकतेच राज्याचे नवे मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस गडचिरोलीच्या दौऱ्यावर आले होते. त्यांनीही या प्रकल्पाविषयी माहिती घेतं आमच्या उपक्रमाची प्रशंसा केली.

**लेखक :-** तुमच्या मार्गदर्शनात निर्माण झालेल्या उद्यानांची लोकप्रियता खुप आहे. त्यासाठी काय प्रयत्न केले?

**श्री. रेड्डी :-** मी गडचिरोलीत आल्यानंतर इथे नागरिकांना व्यायाम, विरंगुळा, करमणूकीची सुविधा असणारं व पर्यटकांना आकर्षित करणारं उद्यान नसल्याचं लक्षात आलं. मग, आम्ही सेमाना देवस्थान परीसरात वनविभागाच्या जागेवर भव्य उद्यान निर्मीतीचा संकल्प केला. हे उद्यान केवळ करमणूकीसाठी तयार न करता त्यातून आपली प्राचीन भारतीय संस्कृती, आपले अस्सल ज्ञानही दिसावे म्हणून आम्ही प्रयत्नरत होतो.या उद्यानाचं सर्वात मोठं वैशिष्ट्य म्हणजे इथे आम्ही तयार केलेली प्राचीन ग्रंथात उल्लेख असलेली वने. नक्षत्रवन, राशीचक्रवन, गणेशवन, चरकवन अशी विविध वने आम्ही तयार केली. तुमचा विश्वास बसणार नाही, पण आपल्या देशाच्या राष्ट्रपती भवन परीसरात असलेल्या मुगल गार्डनमधील हर्बल गार्डनच्या धर्तीवर किंबहुना हुबेहुब तसेच गार्डन इथे तयार करण्यात आले आहे. छत्तीसगडचे मुख्य वनसंरक्षक जे.ए.सी.एस.राव माझे चांगले मित्र आहेत. त्यांचा वनांचा प्रचंड अभ्यास आहे. तत्कालीन राष्ट्रपती डॉ. ए. पी.जे. अब्दुल कलाम यांच्या काळात मुगल गार्डन परीसरात एक वैशिष्ट्यपूर्ण वनौषधी उद्यान तयार करण्याचं ठरलं होतं. ही जबाबदारी श्री. राव यांना देण्यात आली होती. या प्रकल्पाचा उल्लेख डॉ. कलाम यांच्या 'व्हिजन २०२०' या पुस्तकातही आहे. श्री. राव यांच्या कार्याची मला माहिती असल्यानं मी त्यांना गडचिरोलीत असं उद्यान निर्माण करण्याची विनंती केली. त्यांना आमच्या उपक्रमांची माहिती होती. त्यांनाही आमचं कार्य आवडल्यानं लगेच होकार देत ते कामाला लागले. त्यामुळेच हे अद्‌भुत उद्यान साकार होऊ शकलं. इथे नक्षत्रवन, राशीचक्र वनासोबत दशमुलारिष्ट या आयुर्वेदिक औषधीत वापरण्यात येणारे औषधी वृक्षांचे दशमुल वनही आहे. सिता अशोक हा अतिशय दुर्मिळ वृक्ष. आपल्या भागात आढळत नाही. आम्ही या उद्यानात त्याची लागवड केली. या भागात त्याच्या लागवडीत आम्हाला अपेक्षेहून अधिक यश मिळालं. अशा अनेक दुर्मिळ वनस्पती या उद्यानात आहेत. इथे वन व वन्यजीवांची सचित्र माहिती देणारं निसर्ग परिचय केंद्रसुध्दा आहे. अशीच उद्याने आम्ही देसाईगंज, चामोर्शी, घोट, सिरोंचा, आलापल्ली अशा भागात निर्माण केली आहेत.

**लेखक :-** तुम्हाला कधी वैदूंच्या औषधोपचारांचा अनुभव आला आहे का ?

**श्री. रेड्डी :-** होय. मी असे अनेक अनुभव घेतले आहेत. प्राचीन भारतीय ज्ञानावर व त्याचा वारसा चालविणाऱ्या वैदूंच्या ज्ञानावर माझा विश्वास आहे. एका व्यक्तीच्या पायावरून ट्रक गेला होता. पायाला अनेक ठिकाणी फ्रॅक्चर झालं. तो डॉक्टरकडे गेल्यावर त्याला शस्त्रक्रीया सांगितली. त्यासाठी दोन लाख रूपये खर्च येणार होता. त्या व्यक्तीला एका वकीलाने आपल्या गडचिरोलीच्या आरमोरी तालुक्यातील ठाणेगावचे हाडवैद्य श्री. जुआरे यांची माहिती सांगितली. तो श्री. जुआरे यांच्याकडे आला. त्याच्या उपचाराने शस्त्रक्रीयेशिवाय बरा झाला. एका व्यक्तीच्या मुलालाही अनेक ठिकाणी फ्रॅक्चर होते. त्याला श्री. जुआरे यांनी विशिष्ट वनौषधींनी तयार केलेल्या लाडूंचा डबा दिला. सकाळ, संध्याकाळ एक, एक लाडू खायला सांगितलं. केवळ २८ दिवसात तो मुलगा बरा झाला. अशा गुणी वैदूंना प्रकाशात आणणं आवश्यक आहे. आम्ही सेमाना उद्यानात नक्षत्रवन साकारलं आहे. ही नक्षत्रवनाची संकल्पना यवतमाळचे बापू सहस्त्रबुध्दे यांनी सांगितली. मी यवतमाळ जिल्ह्यात पांढरकवडा इथे उपवनसंरक्षक असताना सहस्त्रबुध्दे यांच्या आश्रमात गेलो होतो. त्यांच्या अफाट ज्ञानानं थक्कच झालो. बापू सहस्त्रबुध्दे एकदा अमरावतीला गेले होते. तिथे एका घरी एक ४५ वर्षांची महिला दम्याच्या आजारानं बेजार झाली होती. डॉक्टरांनीही हात टेकले. दमा शेवटच्या स्टेजवर होता. फार फार तर बाई दहा दिवस जगेल असं डॉक्टरांनी सांगितलं होतं. बापू सहस्त्रबुध्दे यांनी त्या महिलेची कुंडली मागगितली. तिचं राशी नक्षत्र शमी वृक्षाशी संबंधित होतं. त्यांनी शमी वृक्षाची फांदी बोलवून त्याची धुनी त्या महिलेच्या खोलीत केली. सुरवातीला तिला धुरामुळे खोकल्याची उबळ आली. खुप त्रास झाला. अखेर अतित्रासाने तिने उलटी केली आणि ती तशीच झोपी गेली. बराच वेळ शांत झोपल्यानंतर ती जेव्हा जागी झाली तेव्हा तिचा आजार नाहिसा झाला होता. असे अनेक अनुभव सांगता येतील. म्हणूनच वैदूंच्या व आपल्या प्राचीन ज्ञानाला कमी लेखता येणार नाही. आपला संबंध आपल्या जन्मवेळच्या नक्षत्राशी व पयार्याने त्या नक्षत्राच्या विशिष्ट वृक्षाशी निश्चितच असतो.

**लेखक :-** गडचिरोलीसाठी तुमचं पुढचं ध्येय काय आहे ?

**श्री. रेड्डी :-** आपल्या भारतात पुन्हा एकदा प्राचीन भारतीय ज्ञान विशेषत: आयुर्वेदिक ज्ञान प्रकाशात येत आहे. या ज्ञानाचा प्रचार, प्रसार होणं आवश्यक आहे. देशातील अन्य भागात यासंदर्भात बरीच जागृती होत आहे. देशाच्या दक्षिणेतील केरळसारखे राज्य आता वनौषधी व आयुर्वेदिक उपचारांचं प्रमुख केंद्र म्हणून ओळखलं जात आहे. गडचिरोली असंच आयुर्वेदिक हेल्थ डेस्टिनेशनच्या रूपात जगाच्या पटलावर यावं, अशी माझी मनस्वी इच्छा आहे. केरळमधील आयुर्वेदिक ज्ञानाची माहिती व्हावी म्हणून आम्ही गडचिरोली जिल्ह्याच्या वैदूंचा एक केरळ दौरा आखत आहोत. वैदूंसाठी राबविलेले उपक्रम या ध्येयाकडे जाणारं छोटसं पाऊल आहे. आजपर्यंत वनविभागानं या दिशेनं काम केलं नव्हतं. पण, एक चांगली सुरवात झाली आहे. आतापर्यंत आम्ही केलेलं काम समुद्राचा एक थेंब एवढच म्हणता येईल. अद्याप बरच काम बाकी आहे. या जिल्ह्याला निसर्गाने वरदान रूपात दिलेल्या वनसंपत्तीला नष्ट न करता वनाधारित शाश्वत विकास करायचा आहे. वैदूंचं विश्व त्या ध्येयाचं एक प्रतिक आहे. पुढेही हे विश्व विस्तारत राहिल आणि भारताला आयुर्वेदिक ज्ञानात विश्वगुरू म्हणून स्थापित करण्यात आपला सिंहाचा नाही, तर खारीचा तरी वाटा उचलेल, अशी मला आशा आहे.

**डॉ. प्रशांत भरणे :-** आपल्या आधुनिक आयुर्वेद शिक्षणाचा उपयोग आपल्याच गडचिरोली जिल्ह्याच्या विकासासाठी करण्याचा मानस मनाशी बाळगून डॉ. प्रशांत भरणे मागील अनेक वर्षांपासून कार्यरत आहेत.



आजच्या काळात बी.ए.एम.एस.ची पदवी घेतल्यानंतरही आयुर्वेद पध्दतीने उपचार न करता रूग्णांना लगेच बरे करण्यासाठी ॲलोपॅथीला शरण जाणारे अनेक डॉक्टर्स आहेत. पण, डॉ. भरणे यांनी आपल्या आयुर्वेद ज्ञानावरच ठाम विश्वास ठेवत ॲलोपॅथीला दुरच ठेवलं. प्राचीन भारतीय आयुर्वेदिक ज्ञानाचा प्रचार, प्रसार हेच ध्येय ठेऊन ते कार्यरत आहेत. या कार्याच्या माध्यमातून त्यांना आपल्या महाविद्यालयीन शिक्षणाच्या मर्यादाही लक्षात आल्या. आपल्या

महाविद्यालयीन पुस्तकी शिक्षणाच्या परीघापलिकडेही विस्तृत ज्ञान असल्याचं त्यांच्या लक्षात आलं. याच काळात रानावनात आपल्या पारंपरिक ज्ञानाव्दारे असाध्य आजार लीलया बरे करणाऱ्या वैदूंशी त्यांचा संपर्क आला. अशा अनेक वैदूंना त्यांनी गुरूस्थानी मानून त्यांची विद्या ग्रहण केली. पण, त्यांच्या विद्येचा वापर स्वार्थासाठी न करता इतरांच्या भल्यासाठी करीत आहेत. याच घडामोडीतून त्यांना वैदूंमधील निरक्षरता, गरीबी, उपेक्षा, दुर्लक्षिता, अशा अनेक समस्या दिसून आल्या. आपसूकच ते वैदूंच्या वेदनांशी एकरूप झाले. त्यांच्या कल्याणासाठी आपण काही करावं या धडपडीतून त्यांनी कार्य सुरू केलं. स्वत:च्या स्वयंसेवी संस्थेच्या माध्यमातून कार्य करताना वनविभागाशीही त्यांचा संपर्क आला. मुख्य वनसंरक्षक श्री. टी.एस.के. रेड्डींसारख्या वनाधिकाऱ्यांमुळे वनविभागाचा वैदूंबद्दलचा दृष्टीकोन बदलत असल्याचं त्यांना जाणवत होतं. म्हणून त्यांनी वनविभाग व वैदूंच्या विश्वातील दुवा म्हणून कार्य करण्याची तयारी दर्शविली. आज वैदूंच्या विश्वाचा जो विस्तार दिसत आहे त्यामागे डॉ. भरणे यांचे अथक परीश्रम आहेत. वनविभाग व वैदूंमधील महत्त्वाचा दुवा असलेले डॉ. भरणे यांच्याशी केलेली ही बातचित.

**लेखक :-** आपल्या घराण्यात आयुर्वेदाचा वारसा होता का ?

**डॉ. भरणे :-** हो. माझे पणजोबा वैद्य अप्पाजी नारायण सोनार (भरणे) प्रख्यात वैद्य होते. ते आडनाव फार कमी वापरायचे. त्याकाळात राज्यातील अनेक भागात निजामांची राजवट होती. गडचिरोलीपासून जवळच असलेले पोर्ला हे आमचे गाव. त्या काळात ३६ गावांचा प्रमुख असलेला निजामांचा नवाब येथे राहायचा. आजही त्या नवाबाची हवेली भग्नावस्थेत उभी आहे. याच हवेलीच्या पुढे पणजोबांचं घर होतं. ते नवाबाचे खास वैद्य होते. नवाबाचा उपचार करतानाच ते अनेक सर्वसामान्यांचाही उपचार करायचे. आपला देश स्वतंत्र होण्यापूर्वी पोर्ला व कढोली येथे नवाब होते. कुरखेडा येथे फत्तेलालशहा हे गोंडराजे होते. तसेच एक केंद्र चंद्रपुरात होते. नवाबाचे वैद्य असल्यामुळे त्यांना बराच मान होता. त्याकाळात आरोग्याची सुविधा नसल्याने नवाबानेच त्यांच्या हवेलीपुढे पणजोबांना जागा दिली होती. पणजोबा मध्यम बांध्याचे होते. गोरा वर्ण, डोक्यावर फेटा आणि कपाळाला टिळा असायचा. त्यांनी त्या काळात आयुर्वेदातील औषधींवर बरच अध्ययन आणि संशोधन केलं होतं. त्यांच्या औषधांची व हस्तलिखिताची पेटी मी आजही सांभाळून ठेवली आहे. त्यांच्या कार्यापासून मला प्रेरणा मिळाली. मला आमच्या परीवारातील सारे गंमतीने मी पणजोबांचाच पुनर्जन्म असल्याचं म्हणतात.

**लेखक :-** तुमच्या कार्याची सुरवात कशी झाली ?

**डॉ. भरणे :-** बालपणापासूनच मला आयुर्वेदाविषयी आवड होती. पणजोबांचे व घरी असलेले आयुर्वेदिक ग्रंथ वाचनात आले. म्हणून याच क्षेत्रात काही करावे, अशी इच्छा होती. २००० मध्ये मी बी.ए.एम.एस.ची पदवी प्राप्त केली. वडील कृषी पदविधर (बी.एस.सी. ॲग्रीकल्चर) आहेत. त्यांनी गडचिरोलीच्या शिवाजी हायस्कूल येथेच आयुष्यभर अध्यापनाचं कार्य केलं. ते प्राचार्य म्हणून निवृत्त झाले. त्यांनाही आयुर्वेदिक वृक्ष व वनस्पतींचं सखोल ज्ञान व आवड आहे. म्हणून त्यांचाच सल्ला व मार्गदर्शनात मी संकल्प कृषी आयुर्वेद केंद्र सुरू केलं. पोर्ला इथे दीड एकर जागेत फार्म हाऊस उभारलं. इथे अनेक दुर्मिळ आयुर्वेदिक वनस्पती जपल्या आहेत. बी.ए.एम.एस. झाल्यानंतर प्रॅक्टिस करताना आधीच ठरवलं इंजेक्शन, सलाईन, ॲलोपॅथीच्या गोळ्यांचा वापर करण्याऐवजी रूग्णांना चूर्ण, काढा, वनौषधींनी सिध्द तेल, अन्य आयुर्वेदिक औषधीच द्यायच्या. या अट्टाहासामुळे सुरवातीला खरंतर मी थट्टेचा विषय झालो होतो. एवढा शिकला, सवरलेला हा तरूण काय जडीबुटी देतो? म्हणून रूग्णही काहीशा नाराजीनं बघायचे. पण, पुढे त्यांचे आजार दूर पळू लागल्यानंतर त्यांनाही आयुर्वेदाचं महत्त्व कळू लागलं. याच काळात माझा वैद्य विठ्ठल तुकाराम घोगरे यांच्याशी संपर्क आला. त्यांच्याकडून बरच शिकायला मिळालं. त्यांच्या माध्यमातून अन्य वैदूंशी परीचय होऊ लागला. महाविद्यालयीन पुस्तकाबाहेर ज्ञानाचं एक मोठं भंडार असल्याचा साक्षात्कार झाला. तिथूनच मी जिल्हाभर भटकंती सुरू केली. अनेक वैदूंच्या भेटी घेऊन त्यांच्यापासून ज्ञानकण गोळा करू लागलो. आधुनिक वैद्यकशास्त्रासाठी आव्हान ठरणारे

आजारही बरे करणारे वैदू किती हलाखीचं जीवन जगत आहेत हे सुध्दा दिसत होतं. म्हणून त्यांना मानाचं स्थान मिळवून देण्याचे प्रयत्न सुरू केले.

**लेखक :-** या कार्याची प्रेरणा कुठून मिळाली ?

**डॉ. भरणे :-** माझे पणजोबा आणि वडील माझे प्रेरणास्थान आहेत. पण, या कार्याची सुरवात करताना भेटलेले अनेक वैदूही माझे स्फूर्तीस्थान व प्रेरणास्थान झाले. वैद्य दिवंगत नामदेव तानूजी मडावी यांच्यामुळे मी खुप प्रभावित झालो. आज ते हयात नाहीत. पण, त्यांनी या क्षेत्रात केलेलं कार्य अजरामर आहे. त्यांच्या कार्यावर एक लेख मी लिहिला होता. ते नाडी चिकित्सेचे तज्ञ होते. त्यांच्या गळ्यात एक जुन्या पध्दतीचा स्टेथोस्कोप असायचा. पण, हा स्टेथोस्कोप छातीवर न ठेवता ते रूग्णांच्या नाडीवर ठेवायचे. महिला आर्थिक विकास महामंडळ असो की, वनविभाग किंवा कृषी विभाग. कुठल्याही विभागाच्या प्रदर्शनात त्यांचा आयुर्वेदाचा स्टॉल थाटात उभा असायचा. आपली पूर्ण हयात त्यांनी आयुर्वेदाच्या प्रचार व प्रसारासाठी वेचली. जिल्ह्यात पहिल्यांदा पल्व्हनायझर (चूर्ण तयार करण्याचं यंत्र) त्यांनी आणलं. वनौषधींनी सिध्द तेल तयार करताना अनेकदा पोर्ल्याला त्यांचा मुक्काम असायचा. तलम कापडाचा कुर्ता, धोतर आणि काळा कोट घातलेले भारदस्त आवाजाचे वैद्य नामदेव मडावी आजही आठवतात. आपल्या खड्या आवाजामुळे ते पोवाडा गायक म्हणूनही प्रसिध्द होते. २००३ मध्ये आमच्या आयुर्वेद विकास व संशोधन संस्थेव्दारे आयोजित आयुर्वेद नाडी चिकित्सा शिबिरात त्यांचा सत्कार केला. त्यांची आयुर्वेदाबद्‌दलची तळमळ मला आजही या क्षेत्रात कार्य करण्याची प्रेरणा देते. त्यांच्यासारखे असंख्य वैदू मला प्रेरणास्थानी आहेत.

**लेखक :-** वैदूंसाठी कोणते कार्य केले ?

**डॉ. भरणे :-** संकल्प आयुर्वेदा रिसर्च फाऊंडेशन व असोसिएशन फॉर सोशिअल अवेअरनेस या संस्थांच्या माध्यमातून आयुर्वेदाचा प्रचार, प्रसारासाठी विविध उपक्रम राबवित होतो. विविध ठिकाणी नाडी परीक्षण, आरोग्य तपासणी शिबिरांचं आयोजन केलं. शालेय विद्यार्थ्यांना आयुर्वेदाची माहिती होण्यासाठी शाळांमध्येही कार्यक्रम दिले. आपल्या प्राचीन भारतीय संस्कृतीत दिवाळीत उटण्यानं अंघोळ करण्याची परंपरा आहे. त्यामागील आरोग्यविषयक कारणांची माहिती देण्यासाठी स्वत: विविध प्रकारची उटणी तयार करून नागरिकांना त्याचं प्रात्यक्षिकही देत होतो. आयुर्वेदिक वनौषधींचा आहारात उपयोग करण्यासाठी त्यापासून खाद्यपदार्थ कसे तयार करायचे याचही प्रात्यक्षिक देत होतो. दरम्यान वैदूंच्या संपर्कात आल्यानंतर त्यांच्यासाठी कार्य करण्याची मनस्वी इच्छा जागृत झाली. म्हणून त्यांच्या समस्यांचा अभ्यास सुरू केला. संकल्प आयुर्वेदा रिसर्च फाऊंडेशन व असोसिएशन फॉर सोशिअल अवेअरनेस, पोर्ला या संस्थांच्या माध्यमातून त्यांच्या समस्यांना वाचा फोडण्यास सुरवात केली. अनेक वैदूंकडे पारंपरिक ज्ञान प्रचंड होते. कित्येक आजार बरे करण्याची क्षमता होती. पण, त्यांच्यात गैरसमजही खुप होते. म्हणजे काहींना आपण उपचारासाठी पैसे घेतले, तर आपली विद्या नष्ट होईल, अशी भिती होती. काहीजण इतरांना आपले ज्ञान सांगण्यास उत्सूक नसायचे. काहींची आपल्या व्यवसायाचा विस्तार करण्याची इच्छा होती. पण, आर्थिक मदत मिळत नव्हती. मग, एकीकडे वैदूंमधील गैरसमज दूर करून त्यांच्यात जनजागृती करतानाच अनेकांना व्यवसायासाठी मदत मिळवून देण्याचं काम सुरू केलं. विविध शासकीय विभागांशी संपर्क साधून त्यांच्यासाठी मदत मिळवली. बँकांकडून कर्ज मिळविण्यासाठी मदत केली. प्रसिध्दीपासून कोसो दूर राहून आपले कार्य करणाऱ्या वैदूंची ओळख सर्वांना व्हावी म्हणून वृत्तपत्र व अन्य प्रसारमाध्यमांव्दारे त्यांना प्रकाशात आणण्याचं काम सुरू केलं. त्यांच्या समस्यांना शासनदरबारी वाचा फोडण्यासाठी प्रयत्न केले. पण, आजपर्यंत केलेलं काम केवळ हिमनगाचा तुकडा आहे. अजून बरच काम बाकी आहे.

**लेखक :-** वनविभागासोबतच अनुभव कसा होता ?

**डॉ. भरणे :-** वैदूंसाठी कार्य करताना माझा अनेक शासकीय विभागांशी संपर्क यायचा. त्यात वनविभागही होता. मुख्य वनसंरक्षक टी.एस.के. रेड्डी यांच्याशी भेट झाल्यानंतर त्यांना या विषयात प्रचंड आवड असल्याचं लक्षात आलं. मी

करत असलेल्या कार्याची माहिती त्यांना होती. हेच कार्य पुढे नेण्यासाठी त्यांनी वैदू संमेलनाची संकल्पना सांगितली. ही संकल्पना फार पूर्वीपासून मनात घोळत होती. अनेक वैदू संपर्कात होते. त्यामुळे लगेच कामाला लागलो. सुरवातीला वैदूंमध्ये साशंकता होती. पण, त्यांना पूर्ण सखोल माहिती दिल्यावर त्यांनीही संमेलनात सहभागी होण्याचं मान्य केलं. यापूर्वीही मी वैदूंना एकत्र आणण्याचं, त्यांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचं ठरवलं होतं. त्यासाठी बरेच प्रयत्न केले होते. पण, काही बाबतीत नाईलाज व्हायचा. वनविभागाचा भक्कम पाठींबा मिळाल्यानंतर मी व माझे सहकारी कामाला लागले आणि एक नव्हे, तर तब्बल चार वैदू संमेलनं आम्ही यशस्वी करून दाखविली. अर्थात यात वनाधिकारी व कर्मचारी यांचाही मोठा वाटा आहे. याच माध्यमातून गोंडवाना हर्ब्स हा आयुर्वेदिक औषधांचा प्रकल्प प्रारंभ झाला आहे. सेमाना उद्यानात वैदूंचा दवाखाना व पंचकर्म चिकित्सा केंद्र सुरू झालं आहे. आम्ही गोंडवाना हर्ब्स प्रकल्पात नव नव्या संकल्पना राबवित आहोत. गडचिरोलीसारख्या वनसमृध्द जिल्ह्यातील वनौषधींव्दारे तयार औषधींनी असंख्य रूग्णांना बरे करणे आणि वैदूंच्या विश्वात नवी उमेद निर्माण करणे हे आमचे ध्येय आहे. प्राचीन ज्ञानाची आधुनिक तंत्रज्ञानाशी सांगड घालण्यासाठी विविध यंत्रे मागवित आहोत. इथल्या औषधी कुठल्याही अन्य आयुर्वेदिक औषधींच्या तुलनेत कमी पडू नये, यावर माझा कटाक्ष असतो. शिवाय वैदूंचं प्राचीन पारंपरिक ज्ञान बरचसं मौखिक रूपात आहे. ते शब्दबध्द करण्याचं कामही अनेक वर्षांपासून करीत आहे.

**लेखक :-** या कार्यात काही अडचणी आल्या का ?

**डॉ. भरणे :-** अडचणी अनेक आल्या. शेवटी अडचणींचे काटे बोचल्याशिवाय यशाच्या गुलाबाचा सुगंध कळत नाही. मी बी.ए.एम.एस. झाल्यावर आयुर्वेदाला बाजूला ठेऊन थेट ॲलोपॅथीची प्रॅक्टिस करावी किंवा शासकीय नोकरीत रमावे, असा अनाहूत सल्ला अनेकांनी दिला. पण, मी आपल्या निर्णयावर ठाम होतो. दवाखाना सुरू केल्यावर त्यातील जडीबुटी बघितल्यानंतर मलाही अनेकजण अल्पशिक्षित ग्रामीण वैद्य समजायचे. पण, त्याकडे लक्ष दिलं नाही. आयुर्वेदाचं ध्यास होताच. खरं म्हटलं, तर आयुर्वेदिक वनस्पती गोळा करणे, त्यांच्यावर प्रक्रीया करून औषधी तयार करणे हे प्रचंड मेहनती, वेळखाऊ आणि खर्चिक काम आहे. शिवाय ॲलोपॅथीच्या चार, पाच रंगीत कॅप्सूलसाठी पाचशेची नोट सहज काढून देणारे रूग्ण आयुर्वेद औषध, काढे बघून नाक मुरडायचे. औषधांची किंमत ऐकून घासाघीस करायचे. हे प्रकार अद्यापही काही प्रमाणात अनुभवास येतात. त्यानंतर मी वैदूंच्या भेटी घेण्यात मग्न झाल्यावर हे काय नवं खुळ यांनी सुरू केलं, अशा नजरेनही अनेकजण बघायचे. आयुर्वेदिक ज्ञानाचा उपयोग केवळ पैसे मिळविण्यासाठी करणे हा माझा उद्देश नव्हताच. वैदूंची परिस्थिती पाहिल्यावर मी अधिकच जिद्दीने त्यांच्या समस्या निवारणासाठी या क्षेत्रात उतरलो. अनेक उपक्रमात सहभागी होताना वैदूंचं कार्य करताना कित्येकदा दवाखाना बंद करून जावं लागतं. या सर्व कामात आर्थिक ओढाताणही सहन करावी लागली. अद्यापही ती करावी लागतेच. पण, आयुर्वेदाला प्रतीष्ठा आणि वैदूंना आत्मसन्मान मिळवून देण्याचं माझं स्वप्न आहे. याच स्वप्नांचा पाठपुरावा करताना येणाऱ्या अडचणींचा सामना करण्याचं बळही मिळत गेलं.

**लेखक :-** तुमचं पुढचं ध्येय काय आहे ?

**डॉ. भरणे :-** आमच्या प्रयत्नांनी काही प्रमाणात का होईना रानावनातील वैदू एकत्र आले आहेत. त्यांच्या संघटनशक्तीतून गोंडवाना हर्ब्सचं रोपटं आता रूजलं आहे. या रोपट्याचं भव्य वृक्षात रूपांतर व्हावं हिच इच्छा आहे. गडचिरोली जिल्हा आयुर्वेदिक औषधी निर्मीतीचं केंद्र म्हणून ओळखला जावा. इथल्या वैदूंच्या ज्ञानाचं आणि कष्टांचं चिज व्हावं. त्यांच्या आर्थिक अडचणी दूर व्हाव्या. त्यांच्या ज्ञानाचा सन्मान, संकलन व अध्ययन व्हावं. त्यासाठी या कार्याचा अधिकाधिक विस्तार करणं हेच माझं ध्येय आहे. आज गोंडवाना हर्ब्सचं रोपटं वनविभागाच्या जागेत रूजलं असलं, तरी पुढे त्याचा वैदूंच्या संघटनेव्दारे स्वतंत्र विस्तार होईल. या रोपट्यातून भविष्यात साकारणाऱ्या भव्य वृक्षाची गोड फळे वैदूंना चाखायला मिळतील. त्यांच्या या यशात आपलाही वाटा असेल हेच माझं सर्वांत मोठं समाधान आहे.

**श्रीलक्ष्मी अन्नाबत्तुला, उपवनसंरक्षक, गडचिरोली :-** कर्तबगार आणि कल्पक वनाधिकारी म्हणून श्रीलक्ष्मी अन्नाबत्तुला यांची ओळख आहे. विज्ञान (प्राणीशास्त्र) पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या अन्नाबत्तुला यांना प्राणी, पक्ष्यांसोबतच विविध वनस्पतींची चांगली माहिती आहे. त्यांनी समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहचून शासकीय योजना राबविण्याचा नेहमीच प्रयत्न केला आहे. गडचिरोली जिल्ह्यातील निसर्ग व पर्यटन क्षेत्राची माहिती देणारा माहितीपट तसेच दुर्मिळ गिधाडांच्या संरक्षणसाठी व जंगल परीसरातील नागरिकांना मध संकलनाचे प्रशिक्षण देण्यासाठी वनविभागाने केलेल्या प्रयत्नांवर त्यांनी उत्तम माहितीपट तयार केले आहेत. वैदूंच्या विकासाच्या उपक्रमातही त्यांचा महत्त्वपूर्ण सहभाग आहे. याविशयी त्यांच्याशी केलेली बातचित.



**लेखक :-** एक वनाधिकारी म्हणून गडचिरोली जिल्ह्याचा अनुभव कसा आहे ?

**अन्नाबत्तुला :-** मी २००८ मध्ये भारतीय वनसेवा ( आय.एफ.एस.) उत्तीर्ण झाल्यानंतर सेवेची सुरवात सिरोंचा येथे डेप्युटी कंझर्वेटर ऑफ फॉरेस्ट म्हणून केली. मला हा जिल्हा मनापासून आवडतो. सिरोंचातील पहिल्याच पोस्टीगंचा अनुभवही अविस्मरणीय होता. तिथूनच या जिल्ह्याबद्दलची आत्मीयता वाढली. इथली समृध्द वनश्री आजही आपले वैभव टिकवून आहे. या जिल्ह्याचा शाश्वत वनाधारित विकास शक्य आहे. त्या दिशेने योग्य प्रयत्न झाल्यास जिल्ह्याचा कायापालट होण्यास वेळ लागणार नाही. या जिल्ह्यातील नागरिक मनमिळावू आणि मेहनती आहेत. वनविभाग राबवित असलेल्या प्रत्येक योजनेला त्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळतो. वैदूंसाठी आम्ही प्रारंभ केलेल्या कार्याने आता व्यापक रूप घेतले आहे. या उपक्रमाची प्रगती बघून खूप समाधान वाटतं. वनसंरक्षणासोबतच वनांशी निगडीत किंवा वनांवर अवलंबून असलेल्या नागरिकांचा सर्वांगीण विकास या दोन परस्पर विरोधी बाबी वाटत असल्या, तरी त्या तशा नाहीत. या दोन्ही बाबींना परस्पर पुरक बनविता येतं. त्यासाठीच अनेक कल्पक उपक्रम राबविण्याची गरज आहे.

**लेखक :-** वैदूंच्या बाबतीत यापूर्वी असा विचार झाला नाही का ?

**अन्नाबत्तुला :-** वैदूंसाठी कार्य करताना आम्ही बरीच माहिती घेतली. यापूर्वी काही संघटनांनी वैदूंना संघटीत करण्याचं, त्यांना मदत करण्याचं कार्य केलं असून ते निश्चितच कौतुकास्पद आहे. पूर्वी वनविभाग याबद्दल फारसा उत्सूक नव्हता. कारण, वनविभागात अनेक बाबी प्रतिबंधित आहेत. ब्रिटीश राजवटीपासून वनविभागाची विशिष्ट रचना करण्यात आली आहे. वैदू वापरत असलेल्या वनौषधींचा प्रचार झाल्यास या वनौषधी नष्ट होतील, अशीही एक भीती फार पूर्वीपासून पसरविण्यात आली आहे. पण, प्रत्येक नाण्याला दुसरी बाजू असते तशीच या गोष्टीलाही आहे. रानावनात उपचार करणाऱ्या वैदूंसाठी वनौषधी पैसे कमविण्याचं किंवा व्यवसायाचं साधन नाही. तो त्यांच्या जीवनशैलीचा भाग आहे किंबहुना त्यांचं जीवनच आहे. त्यामुळे त्याचा वापर ते काटकसरीनेच करतात. वैदूंना या वनौषधी पुढेही आवश्यक असल्याने या वनौषधींच्या जतनाकडे त्यांचा कल अधिक असतो. त्यातून अनेक दुर्मिळ वनस्पतीचं संरक्षण होतं. म्हणूनच वैदूंच्या कल्याणाच्या विचारातच वनसंरक्षणाचाही उद्देश दडलेला आहे.

**लेखक :-** या कार्याला आणखी पुढे नेण्यासाठी काय करायला हवं ?

**अन्नाबत्तुला :-** या कार्याला पुढे नेण्यासाठी बरच काही करता येईल. पण, बदलत्या जगाचा विचार करून जाणीवपूर्वक पावले उचलायला हवीत. आपल्या भागात अनेक दुर्मिळ वनस्पती आहेत. त्याचे पेटंट अन्य देश घेत असतात. म्हणून जागरूक राहणं आवश्यक आहे. आंध्रप्रदेश राज्यातील एक गावाने मातीतून बी.टी. जिवाणूचा शोध लावला. ते एवढ्यावरच थांबले नाहीत, तर त्यांनी आपल्या शोधाचं पेटंट घेतलं. त्यामुळे ते गाव विकसित झालं. गडचिरोली जिल्ह्यातील वैदूंनाही अनेक दुर्मिळ वनौषधींची माहिती आहे. त्यावर अधिक संशोधन करून पेटंटसाठी प्रयत्न

झाल्यास त्यांचं जीवनच बदलू शकतं. आम्ही या उपक्रमात अधिकाधिक वैदूंना सोबत घेण्याचा प्रयत्न करत आहोत. वैदूंचं संघटन जेवढं मजबूत होईल, तेवढाचा त्यांच्या प्रगतीचा पाया मजबूत होईल.

**लेखक :-** या उपक्रमानंतर काय बदल जाणवतो ?

**अन्नाबत्तुला :-** या उपक्रमांमुळे केवळ वैदूंच्या जीवनातच बदल झाला नाही, तर आमचे अधिकारी, कर्मचारीऱ्यांनाही लाभ झाला. त्यांना वैदूंच्या औषधीशास्त्रात विशेष रूची उत्पन्न झाली. आम्ही वैदूंना वन्यजीव सप्ताह, वसुंधरा दिन, जागतिक वनदिन, अशा अनेक उपक्रमात सहभागी करून घेत असतो. अधिकारी, कर्मचाऱ्यांसोबत त्यांचे दौरे असतात. आता आमचे कर्मचारीही अनेक वनौषधी ओळखण्यात तरबेज झाले आहेत. कधी एखादा कर्मचारी सांगतो, 'मॅडम, आमच्या बिटात सफेद मुसळी आहे.' कुणी म्हणतो 'आमच्या जंगल क्षेत्रात अमुक अमुक दुर्मिळ वनस्पती दिसली.' तेव्हा खूप आनंद होतो. 'एकमेकां साह्य करू, अवघे धरू सुपंथ' या ओळीचा प्रत्यय येतो.

**लेखक :-** तुमच्या घराण्यात आयुर्वेदाची परंपरा आहे का?

**अन्नाबत्तुला :-** आयुर्वेदाची परंपरा म्हणता येणार नाही. पण, माझी आजी. आईची आई अनेकांना वनौषधींव्दारे बरे करायची. माझी आईपण घरी विविध प्रकारच्या औषधी द्यायची. आजही आमच्याकडे बाहेरून आल्यानंतर धने, आलं, जिऱ्याचं आयुर्वेदिक पाणी पाजतात. माझे वडील बी.एस.सी. (बॉटनी) असल्यामुळे त्याचं वनस्पतीचं ज्ञान प्रचंड आहे. त्यांच्यासोबत फिरताना मलाही वनस्पतीचं ज्ञान मिळालं. प्लॅंट प्रेझेंटेशनचं एक सॉफ्टवेअरही मी तयार केलं आहे. आयुर्वेदशास्त्राचाही थोडाफार अभ्यास केला. वैदूंसाठी विविध उपक्रम राबविताना माझ्या ज्ञानात बरीच भर पडत गेली.

**लेखक :-** या उपक्रमात काही अडचणी आल्या का ?

**अन्नाबत्तुला :-** कोणताही उपक्रम म्हटला की, अडचणीही येतातच. आम्ही वैदूंसाठी गोंडवाना हर्ब्स हा प्रकल्प सुरू केला आहे. पण, वनौषधीपासून विविध औषधी तयार करण्यासाठी आवश्यक कच्चा माल, साठविण्याची सोय, विक्री अशा अनेक अडचणी येत आहेत. त्यातून आम्ही शिताफीने मार्गही काढत आहोत. शेवटी जीवन अनंत सुख आणि तेवढ्याच अनंत समस्यांनी भरलेलं असतं. ही एक प्रकारची रोलरकोस्टर राईडच असते. कधी खाली, कधी वर, कधी उलट, कधी सुलट. पण, कोणत्याही समस्येमुळे आमचा किंवा वैदूंचा उत्साह कमी झाला नाही. उलट दुप्पट जोमानं आम्ही कामाला लागलो. जशा अडचणी येतात तसेच त्यावरचे उपयाही येत असतात. म्हणून अडचणींचा फार बाऊ करण्यात अर्थ नाही.

**लेखक :-** महिला वैदूंना या उपक्रमात सहभाग आहे का ?

**अन्नाबत्तुला :-** हो. या उपक्रमात महिला वैदूही आहेत. आज प्रत्येक क्षेत्रात महिलांनी आपली स्वतंत्र ओळख निर्माण करून प्रगती साधली आहे. या क्षेत्रातही अनेक महिला आहेत. या उपक्रमात त्यांचा सहभाग वाढविण्यावर आमचा भर आहे. आपल्याला माहितच आहे. जेव्हा बाळ आजारी पडतं तेव्हा सर्वप्रथम त्याची आईच त्याच्यावर घरगुती आयुर्वेदिक उपचार करते. म्हणून आयुर्वेदातही महिलांचं महत्त्व आहे. आम्हीही या भूमिकेतून काम करत आहोत. गडचिरोली जिल्ह्यात अनेक महिला वैदू आहेत. त्यांच्यापर्यंत पोहचून त्यांच्या अडअडचणी सोडविण्यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत.

**लेखक :-** हा जिल्हा मागास असल्याची चर्चा सतत होत असते. त्याविषयी का सांगाल ?

**अन्नाबत्तुला :-** हा जिल्हा मुळीच मागास नाही. उलट आपले विचारच मागास आहेत. सर्वकाही आपल्या दृष्टीकोनावर अवलंबून असतं. प्रत्येक समस्येसोबत उपायही असतात. अनेकजण वनविभागाला विकासाच्या मार्गातील

धोंड समजतात. जर वनविभाग विकासात समस्या असेल, तर या समस्येतच त्याचे उपायही आहेत. त्यासाठी आपण सकारात्मक दृष्टीने विचार करणं खूप आवश्यक आहे. या जिल्ह्याचा विकास वनाव्दारे पर्यायाने वनविभागाव्दारे निश्चितच होऊ शकतो. कोणत्याही भागाचा विकास करण्यासाठी तेथील समस्यांची जाणीव असणं आवश्यक आहे. गडचिरोलीच्या दुर्गम भागातील माणूस गरीब असला, तरी तो आपल्या आयुष्यात आनंदी आहे. तो तुम्हाला काहीच मागायला येत नाही. या भागाचा विकास करण्यासाठी नागरिकांच्या खऱ्या मागण्या समजून घेणं आवश्यक आहे. केवळ योजनांचा भडीमार करून चालणार नाही. त्यासाठी नागरिकांशी सुसंवाद साधणं महत्त्वाचं आहे. मी सिरोंचा तालुक्यात कार्यरत असताना एक दिवस गाडीने बाहेरगावी जात होते. मुसळधार पाऊस सुरू होता. एका नाल्याजवळ आमची गाडी बंद पडली. त्या भागात नागरिक पावसात भिजताना आनंदाने नाचत होते. मला आश्चर्य वाटलं. इतक्यात त्या गावातील एका व्यक्तीने आम्हाला त्याच्या घरी येण्याची विनंती केली. आम्ही त्याच्या घरी गेल्यावर त्यानं आमचं छान स्वागत केलं. त्याला पावसामुळे लोकांच्या आनंदी होण्याचं कारण विचारलं तेव्हा तो म्हणाला की, पावसामुळे नाला तुडूंब भरला आहे. आता काही दिवस आम्हाला मासे खाता येतील. या नाल्यावर छोटासा पक्का बंधारा झाला, तर पावसाळ्यासोबत अन्य काळातही आम्हाला मासे खायला मिळतील. तेव्हा मी त्यांच्यासाठी एक बंधारा बांधून दिला. त्यावेळेस त्या नागरिकांच्या चेहऱ्यावरच समाधान बघण्यासारखं होतं. एका छोट्या बंधाऱ्यानं त्यांच्या चेहऱ्यावर हास्य आणि समाधान फुलवलं.

**लेखक :-** वैदूंच्या संमेलनाबद्दल काय सांगाल ?

**अन्नाबत्तुला :-** आतापर्यंत वैदूंची चार संमेलने झाली आहेत. पहिल्या संमेलनापासून या चौथ्या संमेलनापर्यंत आम्हाला बरच शिकायला मिळालं. अनेक कामं करता आली. पहिल्या संमेलनात वैदूंविषयी फारशी माहिती नव्हती. ते आपलं ज्ञान सांगत नाहीत, असा समज होता. तो पहिल्याच संमेलनात वैदूंनीच दूर केला. त्यानंतर दुसऱ्या संमेलनात वैदूंशी सविस्तर चर्चा करता आली. त्याचं ज्ञान व कार्याविषयी जाणून घेता आलं. वैदूंचा दवाखाना, वैदूंचं ओळखपत्र, वनस्पतींची यादी असं बरच काम झालं. तरीही भाषेची समस्या होतीच. कारण वैदूंना वनस्पतींची स्थानिक किंवा त्यांच्या भाषेतील नावं माहित असायची. शास्त्रीय माहितीच्या संकलनासाठी त्या विशिष्ट वनस्पतीचं शास्त्रीय नाव माहित असणं आवश्यक होतं. मग, तिसऱ्या संमेलनात वनस्पती शास्त्रज्ञांची मदत घेऊन वनस्पतींच्या नावांचं कोडं सोडविण्यात आलं. चौथ्या संमेलनापर्यंत अनेक उपक्रम आकाराला आले. प्रत्येक वैदूंचं खास वैशिष्ट्य असतं. कुणी बालरोगाचा उपचार करतो, कुणी स्त्रीरोग, कुणी दमा, तर कुणी अर्धांगवायूचा. त्यामुळे रोगानुसार अशा तज्ञ वैदूंचे गट केले. आता वैदूंचा केरळ दौरा आखण्यात आला आहे. या दौऱ्यात वैदूंना अनेक वनौषधींचे प्रकल्प दाखविण्यात येतील. याशिवाय श्री श्री रविशंकर गुरूजींच्या बेंगलोर येथील आर्ट ऑफ लिव्हिंगच्या आश्रम परीसरातील प्रकल्पही दाखविण्यात येणार आहेत. पुढच्या संमेलनात आम्ही तालुका वैदू संघावर भर देणार आहोत. ज्याप्रमाणे जिल्हा वैदू संघ निर्माण झाला. त्याप्रमाणे प्रत्येक तालुक्यात तालुका संघ निर्माण करायचा आहे.

०००००००००००००००००००००००००००००००००००००००००००००००००००००००००००

# प्रकरण ८

# काही अद्भूत वनौषधी

वैदूंच्या विश्वाची ओळख करून घेताना काही अद्भुत वनौषधींचीही माहिती करून घेऊया. यातील काही वनौषधींचा प्रभाव अगदी चमत्कारिक आहे. काही वनौषधींच्या भोवती अंधश्रध्देचं वलय गुंफलं आहे, तर काही वनौषधी स्वत:च एक दंतकथा झाल्या आहेत. काही वनौषधींची नावे वैदूंच्या चर्चेतून येतात. पण, आता त्यांच्याकडे त्या दिसत नाहीत. खरतर या अद्भुत वनौषधींवर संशोधन होणं अत्यावश्यक आहे. त्यांना दंतकथा किंवा अंधश्रध्दा म्हणून सोडून देता येणार नाही. अनेक वनौषधीबद्दल वैदू अतिशयोक्तीपूर्ण बोलताना दिसतात. त्यातील अतिशयोक्तीचा भाग सोडला, तरी त्या वनौषधींचा काही तरी उपयोग नक्कीच असतो. महत्त्वाचं म्हणजे अशा वनौषधी दुर्मिळसुध्दा असतात. चला जाणून घेऊया अशाच काही अद्भुत वनौषधींबद्दल....

**ताडवा : -** ताडवा ही वनौषधी आहे की, अन्य काही याबद्दल अद्यापही खात्रीपूर्वक सांगता येत नाही. सुमारे ११ वर्षांपूर्वी इतिहास संशोधक अ.ज. राजुरकर लिखित 'चंद्रपुरचा इतिहास' हा ग्रंथ माझ्या वाचनात आला तेव्हापासून या ग्रंथात उल्लेख असलेले थोर आदिवासी क्रांतिकारक शहिद वीर बाबूराव पुल्लेसूर शेडमाके यांचा व त्यांनी ग्रहण केलेल्या ताडवा या अद्भुत वनौषधीचा ध्यास मला लागला आहे. तेव्हापासून अनेकांकडून या ताडवाविषयी जाणून घेतलं. कित्येक वैदूंना माहिती विचारली. पण, काही रोमांचक कथांशिवाय फारसं काही हाती पडलं नाही. चंद्रपुरचा इतिहास या ग्रंथाच्या व्दितीय आवृत्तीच्या पृष्ठ क्रमांक ३७१ वर वीर बाबूराव यांनी 'ताडवा' खाल्ला होता व त्यामुळे ते वज्रदेही झाले होते, असा उल्लेख आहे. स्वातंत्र्यवीर वि.दा. सावरकरांनी ज्या १८५७ च्या ब्रिटिश विरोधी लढ्याचा 'भारताचे प्रथम स्वातंत्र्यसमर' असा गौरवपूर्ण उल्लेख केला होता त्या स्वातंत्र्यलढ्यातील देशभक्तांचे एकामागून एक बलिदान जात असताना चंद्रपुरसारख्या (तेव्हा चंद्रपूरातच गडचिरोली जिल्हा समाविष्ट होता.) मागास जिल्ह्यातील घोट या भागातून एक आदिवासी नरवीर इंग्रजांशी झुंज घेत होता. या आदिवासी विराचं नाव होतं वीर बाबूराव पुल्लेसूर सेडमाके. खरंतर त्यांच्या ब्रिटिशविरोधी लढ्याच्या घटनांचा प्रारंभ १३ मार्च १९५८ रोजी झाला त्यामुळे १८५७ च्या स्वातंत्र्य युध्दाशी त्यांचा संबंध फारसा जोडता येत नाही. पण, त्यांनी दिलेला लढा भारताच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहावा असाच आहे. त्यांच्यासोबत व्यंकटराव राजेश्वराव हे क्रांतिकारक आदिवासी वीरसुध्दा होते. हे दोघेही सेडमाके वंशातील असून ४ देवे होते. या विरांची इंग्रजांशी १३ मार्च १८५८ रोजी नांदगाव–घोसरी, १९ एप्रिल १८५८ ला सगनापूर, तर २७ एप्रिल १८५८ ला बामनपेठ येथे लढाया झाल्या. विशेष म्हणजे यातील प्रत्येक लढाई वीर बाबूराव व व्यंकटराव यांनी जिंकली. वीर बाबूरावांबद्दल वाचताना आपल्या आयुष्यातील एकही लढाई न हरणारे वीर राजे छत्रपती संभाजी यांची आठवण येत राहते. असं म्हणतात की, बाबूरावने ताडवा ग्रहण केल्यामुळे कोणत्याच शस्त्राचा प्रभाव त्यांच्यावर पडत नव्हता. शस्त्रांचा मारा होत असताना ते थेट पुढे येऊन शत्रूंना पिटाळून लावत. ब्रिटिशांचा तत्कालिन जिल्हाधिकारी कॅप्टन क्रिक्टन याला त्यांनी धुळ चारली. लॉर्ड डलहौसीने देशात तारांचं दळणवळण सुरू केलं होतं. याच दरम्यान मोलमपल्ली या उप–जमीनदारीत तारा लावण्याचं काम सुरू होतं. हे तारांचं जाळं म्हणजे गुलामगिरीचं जाळं असं म्हणत बाबूराव व व्यंकटराव यांनी २९ एप्रिल १८५८ रोजी चुचगुंडीवर हल्ला चढविला. या हल्ल्यात टेलिग्राफ ऑपरेटर्स गार्टलंड व हॉल ठार झाले. तर, त्यांचा एक सोबती पिटर निसटला. बाबूरावला समोरासमोरच्या लढाईत पराभूत करणं शक्य नसल्यानं इंग्रजांनी कपटनितीचा प्रयोग केला. जिल्हाधिकारी क्रिक्टन याने नागपूरहून नव्या दमाचा सेनापती कॅप्टन शेक्सपियर याला त्याच्या सैन्यासोबत बोलविले. बाबूराव व व्यंकटराव यांची नातलग असलेली अहेरीची जमीनदारी लक्ष्मीबाई हिच्याकडे पिटरला एक गुप्त खलिता देऊन पाठविले. त्यात व्यंकटराव व बाबूराव यांना पकडून देण्याविषयी सांगितलं होतं. तसच त्यांना पकडून न दिल्यास जमीनदारी जप्त करण्याची धमकीही दिली होती. शेवटी 'घरका भेदी

लंका ढाए' या म्हणीप्रमाणे तिने वीर बाबूरावला घरी जेवणाचे आमंत्रण देऊन तो नि:शस्त्र असताना इंग्रजांना पकडून दिले, असं आजही गडचिरोलीतील अनेकजण सांगतात. तर, चंद्रपुरचा इतिहास या ग्रंथानुसार लक्ष्मीबाईच्या माणसांनी भोपालपट्टणम येथे छापा घालून बाबूरावला जुलै १८५८ मध्ये पकडले. त्याला कुठेही पकडलेलं असो पण, ज्याप्रमाणे छत्रपती संभाजीराजास संगमनेरला विश्वासघाताने जेरबंद करण्यात आले, उमाजी नाईक या क्रांतिवीरास त्याच्या बहिणीनेच पकडून दिलं, सेनापती तात्या टोपे यांना त्यांचा जिवलग मित्र नरवरचा राजा मानसिंग यानं पकडून दिलं तोच प्रकार बाबूरावच्याबाबतीतही घडला. पण, बाबूरावही कच्च्या गुरूचा चेला नव्हता. अहेरी येथे बेड्या घालून नेत असताना तो शिताफिने पळून गेला आणि पुढे दोन महिने ब्रिटिश साम्राज्यात धुमाकूळ घालत राहिला. पण, लक्ष्मीबाईच्या माणसांनी त्यांना पुन्हा सप्टेंबर १८५८ मध्ये पकडलं. तिथून त्यांना चंद्रपुरात आणण्यात आलं. इथे २१ ऑक्टोबर १८५८ रोजी त्यांना मरेपर्यंत फाशीची शिक्षा ब्रिटिशांनी सुनावली. चंद्रपुर जिल्हा कारागृह जिथे आहे तिथे पूर्वी गोंडराजांचा बालेकिल्ला होता. इंग्रजांनी चंद्रपूर जिंकल्यानंतर या किल्ल्याचंच रूपांतर कारागृहात केलं. या कारागृह परीसरात एक पिंपळाचा वृक्ष आहे. याच वृक्षावर बाबूरावांना फाशी देण्यात आल्याचं सांगण्यात येतं. इथून खऱ्या आख्यायिकेला सुरवात होते. बाबूरावला मरण कसं आलं, याबद्दल अनेक मत मतांतरे आहेत. पण, सर्वांचं एका गोष्टीवर एकमत आहे, ते म्हणजे बाबूरावांना फासावर लटकवले, तेव्हा चारदा फाशीचा दोर तुटला. म्हणजे इंग्रज बाबूरावांना फासावर लटकवायचे.पण, लटकवल्यानंतर फाशीचा दोर तुटायचा पण, बाबूराव काही मरायचे नाहीत. असं एक दोन नव्हे तब्बल चारदा झालं. शेवटी बाबूराव असा मरत नाही म्हणून त्याच परीसरात चुन्याची निवळी ठेवण्यासाठी मोठ मोठे टाके होते त्या टाक्यात बाबूरावाला जिवंत पुरण्यात आलं. तर, दुसऱ्या एका मतानुसार त्या चुन्यातही बाबूराव मेले नाहीत. पण, त्यांना असह्य यातना होत होत्या. अखेर आपण बांबूचा ताडवा खाल्ला असून बांबूनेच आपण मरू शकतो हे आपल्या मृत्यूचं रहस्य त्यांनीच इंग्रजांना सांगितलं. (ज्या वस्तूचा ताडवा खाल्ला असेल फक्त त्याच वस्तूने ताडवा खाणाऱ्यावर आघात केल्यास त्याचा मृत्यू होतो अन्यथा नाही) त्यानंतर काहीजण म्हणतात की, बांबूच्या कांबींचा फास करून बाबूरावांना त्या पिंपळाला लटकवण्यात आलं, तर काही म्हणतात की, फासाच्या दोराला बांबूचा स्पर्श होईल, अशी व्यवस्था केली तेव्हा बाबूरावांचे प्राण गेले. ते काहीही असो पण, भारतमातेला स्वतंत्र करण्यासाठी पेटलेल्या यज्ञकुंडात या आदिवासी विरानं आपल्या प्राणची समिधा अर्पण केली हे विशेष. भगवान बिरसा मुंडा असो की, बाबूराव व व्यंकटराव अनेक आदिवासी विरांनी भारतमातेसाठी प्राणाचं बलिदान दिलं, पण, निरक्षर, मागास असलेल्या आदिवासी समाजाच्या हौतात्याची दखल इतिहासानं फारशी घेतली नाही. कधी संधी मिळाली, तर संशोधन करून वीर बाबूराव सेडमाके यांचं संपूर्ण चरीत्र लिहायची माझी इच्छा आहे. असो. बाबूरावांना ताडवा कसा मिळाला याचीही रोचक कथा आहे. याबद्दल दोन कथा सांगण्यात येतात. दोन्ही कथांमध्ये बरचसं साम्य आहे. पहिल्या कथेनुसार बाबूराव आपल्या बहिणीसोबत जंगलात फिरत असताना त्याला भूक लागली. एका बांबूच्या रांजीखाली बहिण, भावांनी शिदोरी काढून खाण्यास सुरवात केली. त्यांनी भाजल्या मासोळ्यांची रस्सेदार भाजी केली होती. बाबुरावने ताटात भाजी घेतली. त्याच्या मागे असलेल्या बांबूच्या टोकावर ताडवा होता. या ताडव्याची सावली पडताच ताटातील मासोळ्या जिवंत झाल्या. बाबूरावला ताडवाबद्दल आधीच माहिती असल्यानं त्यानं लगेच ताडवा मिळविण्याचा निर्णय घेतला. पण, हा ताडवा ग्रहण करण्यापूर्वी त्याला रक्त द्यावं लागतं. म्हणून बाबूरावनं स्वत:च्या शस्त्रानं स्वत:चंच शिर कापलं. पण, ताडव्याच्या प्रभावानं तो जिवंत झाला. अशा प्रकारे तो ताडवावीर झाला. दुसऱ्या एका कथेनुसार इंग्रजांशी लढत असताना बाबूरावने आपल्या साथीदारासह सुरजागडच्या पहाडीवर एका गुहेत आश्रय घेतला होता. तो या गुहेत लपून असताना त्याची पत्नी त्यांच्यासाठी शिदोरी घेऊन निघाली. तिने डोक्यावर भाताचा गंज घेतला आणि त्यावर भाजल्या मासोळ्याच्या रस्सेदार भाजीचा गंज होता. पण, भाजीच्या भांड्यावर परात किंवा झाकणी ठेवली नव्हती. ती शिदोरी घेऊन जात असताना अचानक पाऊस लागला म्हणून ती एका बांबूच्या रांजीखाली थांबली. या बांबूवर ताडवा होता. पावसाचे पाणी ताडव्याचा स्पर्श होऊन भाजीच्या भांड्यात पडलं. बाबूरावची पत्नी गुहेत आली. तिने भाजी वाढली तेव्हा मासोळ्या रश्श्यात चक्क पोहताना बाबूरावला दिसला. हा सर्व ताडव्याचा प्रभाव असल्याचं त्याच्या लक्षात आलं. त्यानं पत्नीला वाटेत कुठे थांबली ते विचारलं.

त्यानंतर तो त्या बांबूच्या रांजीजवळ आला. त्यानंतर त्यान ताडवा हातात धरून आपली मांडी चिरून काढली. (हातात ताडवा घेऊन स्वत:च्या शरीरावर वार केलं, तर काही जाणवत नाही) त्यात तो ताडवा ठेवला. मी या ताडवा विषयी बरीच शोधाशोध केली. हा शोध अजुनही सुरूच आहे. ताडवाबद्दल अनेक मतं आहेत. कुणी म्हणतं की, ताडवा एक विशिष्ट कंद आहे, कुणी म्हणतं की, ते फुलं आहे, कुणाच्या मतानुसार तो बांबूवर उगविणाऱ्या दुर्मिळ अळींबीचा एक प्रकार आहे. काहीजण तर, चक्क तो एक लाल रंगाचा पक्षी असल्याचंही सांगतात. आदिवासी ताडव्याला कोंबडा असं म्हणतात. कारण कोंबड्याच्या डोक्यावर असलेल्या लालभडक तुऱ्याप्रमाणे दिसतो म्हणून तो कोंबडा. पण, अनेकांच्या मतानुसार कोणत्याही वस्तूला फुटलेला अतिरिक्त भाग म्हणजे ताडवा. हा ताडवा बांबूचाच असतो असं नाही, तो खैराचा असू शकतो व चक्क दगडाचाही असू शकतो. ज्याने जो ताडवा खाल्ला असेल त्याला फक्त त्याच वस्तूने आघात होऊ शकतो आणि मरू शकतो. म्हणजे बांबूचा ताडवा खाणाऱ्याचा बांबूने, खैराचा खैराने तर, दगडाचा ताडवा ग्रहण करणारा दगडानेच मरू शकतो. काहीजण बांबूमध्ये चमकदार तेजस्वी डोळ्यांची, मनगटाएवढी जाड हिरवी अळी असते तिच ताडवा आहे, असं म्हणतात. काही प्राचीन तंत्रसाधनेच्या ग्रंथांमध्ये कृत्रिम ताडवा निर्मीतीचा उल्लेख असल्याचं काही वैदू सांगतात. असो. यातील अंधश्रध्देचा भाग वगळला, तरी ताडवा ही एखादी दुर्मिळ व बलवर्धक वनौषधी असण्याची शक्यता नक्कीच आहे. ताडवा खाणाऱ्याला ताडवावीर म्हणतात. ताडवा ग्रहण केलेल्या सैनिकांना ताडवेलाचं सैनं असं म्हणतात. 'चंद्रपुरचा इतिहास' या ग्रंथात पृष्ठ क्रमांक १२१ वर या बाबीचा उल्लेख आहे. बल्लाळपूर (आताचे चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारपूर किंवा बल्लारशा) येथील शेवटचा गोंडराजा खांडक्या बल्लाळशहा होता. त्यानेच चंद्रपुरातील किल्ल्याची पायाभरणी केली. तो बल्लाळपुरातून आपला राज्यकारभार करीत असे. पण, त्याच्यानंतर गोंडराजानी राजधानी चंद्रपुरला हलविण्यात आली. या खांडक्या बल्लाळशहा संदर्भातही अनेक आख्यायिका प्रसिध्द आहेत. या खांडक्या बल्लाळशहाचे वडील सुर्जा बल्लाळसिंह ऊर्फ शेरशहा (कारकिर्द इ.स.१४४७ ते १४७२) हा महापराक्रमी होता. तो आपल्या साथीदारांसह काशीला गेला. तिथून लखनौ येथे गेला. तो युध्दकलेत निपूण होता. त्याच्या गोंड लोकांनी त्या परीसरात धुमाकूळ घातल्यामुळे दिल्लीच्या सुलतानाने त्याला सैन्याकरवी पकडले. ही वार्ता जेव्हा सुरजचा माणिकगड किल्ल्यावरचा सेनापती जरबा याच्या कानावर पडली तेव्हा त्याच्याजवळ ७० हजार ताडवेलाचं सैन्य होतं. त्यापैकी १० हजार ताडवेलांना घेऊन तो दिल्लीला गेल्याचा उल्लेख या ग्रंथात आहे. पुढे सूर्जाने सुलतानाला आपल्या पराक्रमाने खुश केल्यामुळे त्याला सुलतानाने शेरशहा ही पदवी देत सन्मानित केलं. तेव्हापासूनच गोंडराजे आपल्या नावामागे 'सिंह' ऐवजी 'शहा' ही पदवी लावायला लागले.

**भुलनवेल : -** या दुर्मिळ वनस्पतीबद्दल अनेक आख्यायिका आहेत. असं म्हणतात की, जंगलातून एखादी व्यक्ती जात असताना ही वनस्पती पार केली, तर त्या व्यक्तीचं दिशाभान हरपतं. ती व्यक्ती जंगलात भटकते, भुलून जाते म्हणून तिला भुलनवेल म्हणतात. काहीजण ती चकवते म्हणून चकवा म्हणतात. गडचिरोली जिल्ह्यात खोब्रामेंढा येथे गेलो असताना या घनदाट जंगलात माझे मित्र वनस्पतीशास्त्रज्ञ वसंत कहालकर यांनी ही वनस्पती दाखवली होती. त्यांनी या वनस्पतीबद्दलची मतं तपासण्यासाठी अनेकदा तिला पार केलं, डोक्यावर घेऊन फिरले, पण, त्यांना चकव्याचा अनुभव आला नाही. कदाचित ही वनस्पती अतिदुर्मिळ असावी लोकांनी ती तोडू नये म्हणून तिच्या संरक्षणासाठी जुन्या वैदूंनीच अशा कथा रचल्या असाव्या, असं वनस्पतीशास्त्रज्ञ श्री. कहालकर यांनी सांगितलं.

**खंडूचक्का : -** मोडलेलं हाड जोडण्यात अतिशय उपयुक्त अशी ही वनस्पती आहे. तिच्याबद्दल असं सांगितलं जातं की, बकऱ्याचं मटन या पानात गुंडाळलं, तर त्यातील सर्व हाडं जुळून त्याचा गोळा होतो. या पुस्तकाच्या लेखनादरम्यानच माझा अपघात होऊन पायाला फ्रॅक्चर झालं. त्यामुळे या वनस्पतीचा अनुभव मी घेतला. तिच्यामुळे मला खुप आरामही वाटला. पायाची सूज कमी झाली.पण, पानात गुंडाळलेली हाडं लगेच जुळतात हा अतिशयोक्तीचाच भाग वाटतो. ती अतिशयोक्ती असली, तरी ही वनस्पती दुर्मिळ आणि अतिमहत्त्वाची आहे.

**पोट्या अस्वल : -** पोट्या अस्वल ही फारच गमतीशीर वनस्पती आहे. हिचा कंद जमीनीखाली असतो आणि तो कोंबड्यासारखा आवाज काढतो. ही वनस्पती खोदताना हा कंद जागा बदलतो, असही वैदूंचं म्हणणं आहे. अनेक दुर्मिळ आजारात या वनस्पतीचा उपयोग होत असल्याचं वैदू सांगतात.

**रत्नपुरूष : -** आयुर्वेदात रत्नपुरूष या वनस्पतीचा उल्लेख आहे. वनस्पतीशास्त्रज्ञ श्री. कहालकर व डॉ. भरणे यांनी मला देसाईगंज येथे ही वनस्पती दाखवली. पण, मी अनेक वैदूंकडून ऐकलेल्या वनस्पतीपेक्षा ही भिन्न वाटली. वैदू सांगतात की, ही वनस्पती जमीनीत खूप खोलवर जाते. विशेषत: नदीपात्राच्या परीसरात आढळते. या वनस्पतीला ग्रहण करणारा मनुष्य रत्नाप्रमाणे तेजस्वी होतो. कदाचित ही आयुर्वेदात वर्णीत वाजीकरण चिकित्सेत उपयोगात येणारी वनस्पती असावी.

**जलजैमिनी : -** ही एक विशिष्ट वनस्पती आहे. अनेक विकारांवर गुणकारी असलेल्या या वनौषधीचा एक चमत्कारिक अनुभव कुणीही घेऊ शकतो. ही वनस्पती पाण्यात घातली, तर काही वेळात पाणी गोठायला लागतं. पाण्याचं स्वरूप बदलून त्याचं शेवाळासारख्या हिरव्या ठोस पदार्थात रूपांतर होतं. या वनस्पतीवर अधिक संशोधन होण्याची नितांत आवश्यकता आहे.

**पांढरा पळस : -** सामान्यत: पळसाच्या फुलांचा रंग केशरी, भगवा असतो. पण, काही भागात पळसाच्या वृक्षाला पिवळी व पांढरी फुलेही असतात. पिवळा पळस दुर्मिळ तर, पांढरा पळस अतिदुर्मिळ मानला जातो. या पांढऱ्या पळसाची मुळी तिजोरीत ठेवल्यास धनाची वाढ होते, असा पूर्वापार समज आहे. पण, त्याला काही शास्त्रीय आधार नाही. मात्र या पांढऱ्या पळसाचा विविध आजारांवर चांगला उपयोग होतो.

**काळी हळद : -** आपण आहारात पिवळ्या हळदीचा वापर करतो. जंगलात जांभळ्या फुलांची रानहळद फुलते. तसाच एक काळ्या हळदीचाही प्रकार असतो. ही हळद ज्या वस्तूवर ठेवली ती वस्तू दुप्पट होते, असा पूर्वापार समज आहे. अनेक दुर्मिळ वनस्पती, प्राण्यांबद्दल अशा अंधश्रध्दा प्रचलित असतात. त्यामागे वेगळी कारणे असू शकतात. पण, हा अंधश्रध्देचा भाग हटवून या वनस्पतींच्या गुणांचा शोध घेणे आवश्यक आहे.

०००००००००००००००००००००००००००००००००००००००००००००००००००००००००००००००००००

# गोंडवाना हर्बस् प्रकल्पातील काही बोलकी छायाचित्रे











# जिल्हा वनौषधी वैद्य मंडळ, गडचिरोली

ता. जि. गडचिरोली (रजि. नं. महा./56/2014 गडचिरोली)

## -: सभासद मंडळ :-

| अ. क्र. | सभासदाचे नाव | पद | संपर्क | गांव |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. पुंडलिक गांडो गावळे | अध्यक्ष | ९४२१०३८५६९ | केरीगट्टा |
| २ | श्री. गणपती दासरवार | उपाध्यक्ष | ७७४१९५९०३० | गडचिरोली |
| ३ | श्री. डॉ. प्रशांत दि. भरणे | सचिव | ९७६५५९६६६५ | गडचिरोली |
| ४ | श्री. विठ्ठल तु. घोगरे | सहसचिव | ९४२३४२२३११ | गडचिरोली |
| ५ | श्री. नेताजी अनपत्रवार | खजिनदार | ९०२१४२६७६५ | रामसागर |
| ६ | श्री. देवेंद्र मुनघाटे | सदस्य | ९४२१७३४०२१ | कुरुडवाही |
| ७ | श्री. प्रकाश उरकुडे | सदस्य | ९९२३९६१०४५ | खुर्सा |
| ८ | श्री. नंदाजी चलाख | सदस्य | ८२७५२८६७१३ | चामोर्शी |
| ९ | श्री. हनूमंत नरोटे | सदस्य | ९४०४५५६३७८ | चव्हेला |
| १० | श्री. राजेश शुक्ला | सदस्य | ९५९५३५८५३४ | पडोली |
| ११ | श्री. रमेश दूबे | सदस्य | ८९७५७०३१९२ | वायगांव |
| १२ | श्री. कालिपद मल्लीक | सदस्य | ९४०४७९४४५६ | सुंदरनगर |
| १३ | श्री. रजनिश नंदेश्वर | सदस्य | ९४२०९३७१६४ | मालदुगी |